## घटक १
# ऐतिहासिक पर्यटन

**अनुक्रमणिका**

१.० उद्दिष्टे

१.१ प्रस्तावना

१.२ विषय विवेचन

१.२.१ पर्यटनाच्या व्याख्या

१.२.२ पर्यटकांचे प्रकार

१.२.२.१ पर्यटकांच्या वर्गीकरणाचे घटकावरून प्रकार

१.३ ऐतिहासिक पर्यटन

१.३.१ ऐतिहासिक पर्यटन अर्थ

१.३.२ ऐतिहासिक पर्यटनाचे स्वरूप

१.३.३ ऐतिहासिक पर्यटनाची व्याप्ती

१.४ ऐतिहासिक पर्यटन केंद्रांचे वर्गीकरण

१.४.१ ऐतिहासिक स्थळे

१.४.२ ऐतिहासिक स्मारके

१.४.३ ऐतिहासिक संग्रहालये

१.५ सारांश

१.६ स्वयं अध्ययन प्रश्नांची उत्तरे

१.७ पारिभाषिक शब्द

१.८ सरावासाठी स्वाध्याय

१.९ संदर्भ ग्रंथ

## १.० उद्दिष्टे

या घटकाच्या अभ्यासानंतर आपल्याला खालील बाबी लक्षात येतील.

१) पर्यटनाच्या शास्त्रीय व्याख्यांचे ज्ञान होईल.

२) पर्यटकांच्या वर्गीकरणानुसार पर्यटकांच्या प्रकाराची माहिती होईल.

३) ऐतिहासिक पर्यटनाचा अर्थ समजेल.

४) ऐतिहासिक पर्यटनाच्या स्वरूप व व्याप्तीवरून त्याचे महत्व लक्षात येईल.

५) भारतातील महत्वाच्या ऐतिहासिक पर्यटन स्थळांची माहिती होईल.

६) पर्यटनातील ऐतिहासिक स्मारकाचे महत्व समजेल.

७) पर्यटनाच्या दृष्टीने ऐतिहासिक संग्रहालयाचे महत्व लक्षात येईल.

## १.१ प्रस्तावना

प्राचीन काळामध्ये मानव अन्नासाठी भटकंती करीत होता. त्याला प्रवास करण्याची आवड होती. तो चालत, बैलगाडी, घोडागाडी व नंतर स्वयंचलित वाहनाने सर्वदूर प्रवास करू लागला. प्राचीन काळापासून आजपर्यंत मानवाच्या प्रवासाचा उद्देश हा वेगवेगळा होता. त्यांच्या प्रवासाला पर्यटन, तीर्थाटन व देशाटन असे वेगवेगळे शब्द वापरले जातात. आज वाहतुकीची अत्याधुनिक सुविधा निर्माण झाल्यामुळे प्रवास सुव्यवस्थित, सुलभ व आनंददायी होतो त्यामुळे आज पर्यटनाला विशेष महत्त्व प्राप्त झाले आहे. मौज मजा करणे, आनंद मिळवणे, अभ्यास व संशोधन करणे इत्यादी अनेक कारणासाठी पर्यटन केले जाते. पर्यटनाचे स्वरूप भौगोलिक, धार्मिक व ऐतिहासिक आहे. देशातील व परदेशातील इतिहास प्रसिद्ध असलेली स्थळे, पुरातन काळातील वास्तू, निसर्गरम्य स्थळे, वाहतूक, दळणवळण, निवासव्यवस्था, प्राचीन कला केंद्रे, पवित्र तीर्थस्थळे, औद्योगिक शहरे, नवीन प्रकल्प इत्यादी घटक पर्यटनामागील प्रेरणा बनली आहे. आज पर्यटन हा राष्ट्रीय व आंतरराष्ट्रीय उद्योग म्हणून विकसित होत आहे. त्यामुळे पर्यटनाचा विस्ताराने अभ्यास करणे गरजेचे आहे.

## १.२ विषय विवेचन

### १.२.१ पर्यटनाच्या व्याख्या

पर्यटन म्हणजे प्रवास असा सर्वसाधारण अर्थ सर्व लोक लावतात. पर्यटन या शब्दाला इंग्रजी मध्ये Tourism असे म्हणतात. Tour या शब्दापासून Tourism हा शब्द तयार झाला आहे आणि Tour हा शब्द लॅटिन भाषेतील Tornus या शब्दापासून तयार झाला आहे. Tornus याचा अर्थ Journey प्रवास असा होतो. मानवाने जे ऐकले किंवा पाहिले आहे त्या ठिकाणी जाण्यासाठी प्रवास केला जातो. तसेच नवीन जागेचा शोध घेणे, शिकणे, अभ्यास करणे तसेच व्यवसाय किंवा आनंद यासाठीही हा प्रवास केला जातो.

इ.स १३ व्या शतकामध्ये पर्यटन हा शब्द प्रचलित झाला. सर्वसाधारणपणे एका ठिकाणाहून दुसऱ्या ठिकाणी प्रवास करणे आणि मूळ ठिकाणी ठराविक काळात परत येणे म्हणजे पर्यटन होय. याशिवाय पर्यटनाच्या अचूक शास्त्रीय व्याख्यांचा अभ्यास करणे आवश्यक आहे.

**१) हर्मर**

परदेशी माणसाचे एखाद्या देशात प्रदेशात वा शहरात आगमन, वास्तव्य, भ्रमंती आणि तिथून परत जाणे म्हणजे पर्यटन होय.

**२) जोस ॲरीलागा**

सायकल वरून फिरणे, खेळ, गिर्यारोहण करणे, इतर ठिकाणी नौका विहार करणे इत्यादीसाठी भ्रमंती करणे म्हणजे पर्यटन होय.

**३) प्रा. हुंजीकेर व फ्रॅंक**

कायम स्वरूपाची वस्ती न करण्याच्या हेतूने व उत्पादनाशी संबंधित नसलेली अपरिचित व्यक्तीच्या भ्रमंतीतून प्रस्थापित झालेली अपूर्ण घटना व संबंध म्हणजे पर्यटन होय.

**४) डॉ जेभीडडीन**

पर्यटन हे एक सामाजिक आंदोलन असून त्यामध्ये आराम, विनोद, क्रीडा व सांस्कृतिक गरजांची पूर्तता होते.

**५) राष्ट्रसंघ**

राष्ट्रसंघाने इ.स.१९३७ मध्ये पर्यटनाची व्याख्या केली आहे. पर्यटन ही अशी एक सामाजिक गतिविधि आहे की, ज्यामध्ये एक व्यक्ती कोणत्याही देशात आपल्या निर्धारित कार्यक्रमाशिवाय २४ तास किंवा त्यापेक्षा अधिक काळ थांबू शकतो. यामध्ये राष्ट्रसंघाने आंतरराष्ट्रीय पर्यटनावर भर दिला आहे. इ.स. १९५३ मध्ये या व्याखेमध्ये बदल करून देशांतर्गत पर्यटनालाही महत्व दिले.

६) इ.स. १९७६ मध्ये ब्रिटनमधील पर्यटन संस्थेने पर्यटनाची व्याख्या केली आहे. व्यवसाय, संशोधन, मनोरंजन आणि ऐशआराम करण्यासाठी लोकांनी त्यांच्या राहत्या ठिकाणापासून विशिष्ट ठिकाणी काही कालावधीसाठी केलेले स्थलांतर म्हणजे पर्यटन होय.

थोडक्यात एखाद्या ठिकाणाहून दुसऱ्या ठिकाणी विशिष्ट हेतूने जाण्यासाठी करण्यात आलेला प्रवास म्हणजे पर्यटन होय.

## १.२.२ पर्यटकांचे प्रकार

पर्यटनात पर्यटक हा मुख्य घटक आहे. पर्यटकाला इंग्रजीमध्ये Tourist असे म्हणतात. इ.स. १२९२ मध्ये Tourist या शब्दाची उत्पत्ती झाली. Tour या शब्दापासून Tourist हा शब्द तयार झाला. पर्यटक

म्हणजे जो आनंद मिळवण्यासाठी प्रवास करतो तसेच जो करमणूक, आनंद व निसर्गसौंदर्य पाहण्यासाठी भ्रमंती करतो तो म्हणजे पर्यटक होय. पर्यटक भिन्न हेतूने प्रवास करीत असतात.

पर्यटकांचे प्रामुख्याने देशी पर्यटक व विदेशी पर्यटक असे दोन प्रकार पडतात. याशिवाय पर्यटकांचे आंतरराष्ट्रीय, राष्ट्रीय, प्रादेशिक व स्थानिक पर्यटक असेही प्रकार आहेत. पर्यटकाला पर्यटन स्थळी आर्थिक मोबदल्यात जास्तीत जास्त सेवा सुविधा व समाधान दिले आणि सर्व प्रकारच्या सुखसोयी आणि माहिती पुरवली तर अशा ठिकाणी पर्यटकांची संख्या वाढते. तेथे स्थानिक व प्रादेशिक विकास उत्तम प्रकारे होतो. म्हणून पर्यटन विकासात पर्यटकाची भूमिका अतिशय महत्त्वाचे आहे.

**१.२.२.१ पर्यटकांच्या वर्गीकरणाच्या घटकावरून प्रकार**

पर्यटकांचे वर्गीकरण खालील घटकावरून केले जाते. त्यानुसार पर्यटकांचे विविध प्रकार पडतात.

**१) राष्ट्रीयत्व**

राष्ट्रीयत्व या घटकाच्या आधारे पर्यटकांचे खालील दोन प्रकार पडतात.

**अ) राष्ट्रीय किंवा देशी पर्यटक**

देशातल्या देशात प्रवास करणाऱ्या व्यक्तीस राष्ट्रीय किंवा देशी पर्यटक असे म्हणतात.

देशी पर्यटक आपल्या कायमच्या वास्तव्यापासून लांब परंतु देशाच्या सीमारेषेच्या आत प्रवास करतात, त्यासाठी त्यांना परवाना व परकीय चलनाची गरज नसते. परंतु भारतीय बेटावर म्हणजे लक्षद्वीप, अंदमान व निकोबार या बेटांमध्ये जाण्यासाठी सरकार परवाना घ्यावा लागतो. तो परवाना देखील सहज प्राप्त होतो. देशी पर्यटनामध्ये स्थानिक भाषा व संस्कृती यामध्ये फारसा बदल नसल्याने खूप अडचणी येत नाहीत. देशी पर्यटक म्हणजे महाराष्ट्रातील पर्यटक सांची, वाराणसी, पटना या उत्तर भारतातील स्थळांना भेटी देतो किंवा उत्तर भारतातील व्यक्ती दक्षिण भारतातील स्थळांना भेटी देते.

**ब) आंतरराष्ट्रीय किंवा विदेशी पर्यटक**

आपल्या देशाच्या सीमा ओलांडून दुसऱ्या देशात अल्पकाळ राहून परत आपल्या देशात येणारी व्यक्ती म्हणजे विदेशी पर्यटक होय.

विदेशात पर्यटन करण्यासाठी पर्यटकांना पारपत्र परवाना, परकीय चलन, विनिमय, परकीय भाषा इत्यादी बाबींची पूर्तता करून घ्यावी लागते. त्यांच्यासाठी आलिशान निवास व्यवस्था, टॅक्सी वाहतूक व हवाई वाहतूक, राहण्यासाठी पंचतारांकित हॉटेल्स आवश्यक असतात. त्यांचे राहणीमान उच्च दर्जाचे असल्यामुळे ते प्रचंड पैसा खर्च करतात. त्यामुळे असे पर्यटन ज्या देशात जातात त्या देशाला मोठ्या प्रमाणात परकीय चलन प्राप्त होते. भौतिक परिस्थितीप्रमाणे नैसर्गिक परिस्थितीचा विदेशी पर्यटकांवर परिणाम होतो. राजकीय घडामोडी दोन देशातील युद्ध नैसर्गिक आपत्ती म्हणजे चक्रीवादळ, भूकंप, ज्वालामुखी, महापूर, हिमवर्षा याचा परिणाम पर्यटन व पर्यटकांवर होतो.

**२) प्रवास काळ**

प्रवासाच्या काळानुसार पर्यटकांचे दोन प्रकार पडतात.

१) दुरस्थ पर्यटक

२) सामीप्य स्थानी पर्यटक

**अ) दुरस्थ पर्यटक**

जे पर्यटक हजारो किलोमीटर अंतर पार करून पर्यटन करतात त्यांना दुरस्थ पर्यटक म्हणतात. उदा. इंग्लंड मधून भारतात येणे किंवा भारतातून दुबईला जाणे.

दुरुस्थ पर्यटक बहुसंख्येने विमान मार्गाचा वापर करतात त्यांचा हजारो किलोमीटरचा प्रवास दोन तासापासून ते बारा तासापर्यंत असतो. काही वेळा त्यापेक्षा अधिकही असू शकतो. विमान प्रवास महाग व खर्चिक असतो त्यामुळे पर्यटक आर्थिक परिस्थितीनुसार प्रवासाचा काळ निश्चित करतो. या पर्यटनासाठी पर्यटक विमान, बोटी, रेल्वे व मोटारी अशा आधुनिक व जलद साधनांचा वापर करतात.

**ब) सामीप्य स्थानी पर्यटक**

जवळपास आजूबाजूच्या परिसरात पर्यटन करणाऱ्या व्यक्तीस सामीप्य स्थानी पर्यटक असे म्हणतात. उदा. कोल्हापूर ते महाबळेश्वर, मुंबई ते पुणे, नाशिक ते अहमदनगर, संभाजीनगर ते कोल्हापूर इ.

**३) प्रादेशिक पर्यटक व स्थानिक पर्यटक**

प्रवासाच्या अंतरावरून प्रादेशिक पर्यटक, स्थानिक पर्यटक व जागतिक खंडांतर्गत पर्यटन असे उपप्रकार पडतात. प्रवासाचे अंतर ही पर्यटकांची आर्थिक परिस्थिती व पर्यटन केंद्राचे आकर्षण यावर अवलंबून असते. या प्रवासाचे अंतर शंभर किलोमीटर पासून ते हजारो किलोमीटर पर्यंत असू शकते.

जगातील संयुक्त संस्थांने, कॅनडा, इंग्लंड, फ्रान्स, जर्मनी, स्विझर्लंड देशातील लोकांची आर्थिक स्थिती चांगली असते. त्यामुळे येथील पर्यटक प्रत्येक खंडात जातात. दरडोई हजारो डॉलर्स पर्यटनावर खर्च करतात. अशा पर्यटनाला जागतिक खंडांतर्गत पर्यटन म्हणतात.

**४) प्रवासाचा हेतू (हौशी पर्यटक, संशोधक पर्यटन)**

प्रवासाचा निश्चित हेतू ठरवून पर्यटक प्रवास करतात. मनोरंजन, करमणूक, विविध पर्यटन स्थळांची माहिती व अभ्यास, संशोधन अशा विविध कारणांनी पर्यटन केले जाते. त्यामध्ये हौशी पर्यटक, संशोधक पर्यटन इ. चा समावेश होतो.

अशा प्रकारे पर्यटकांचे विविध प्रकार आहेत. प्रत्येक पर्यटकांचा पर्यटनाचा उद्देश स्वतंत्र असतो. स्थलांतर, संशोधन, व्यवसाय, मनोरंजन, आनंद, ऐशआराम यासाठी पर्यटक पर्यटन करत असतात.

**स्वयं अध्ययनासाठी प्रश्न**

अ) योग्य पर्याय निवडून विधाने पुन्हा लिहा.

१) Tornus या ..........भाषेतील शब्दापासून Tour हा शब्द तयार झाला.

अ) फ्रेंच    ब) इंगजी    क) लॅटिन    ड) अमेरिकन

२) जवळपास आजूबाजूच्या परिसरात पर्यटन करणाऱ्या व्यक्तीस .....पर्यटक म्हणतात.

अ) दूरस्थ    ब) सामीप्य स्थानी    क) विदेशी    ड) संशोधक

३) मनोरंजन, करमणूक यासाठी पर्यटन करणाऱ्यांना.............पर्यटक म्हणतात.

अ) संशोधक    ब) हौशी    क) प्रादेशिक    ड) दूरस्थ

ब) जोड्या जुळवा

| | |
|---|---|
| १. राष्ट्रीय पर्यटक | अ) देशाच्या सिमेबाहेरील पर्यटन |
| २. आंतरराष्ट्रीय पर्यटक | ब) देशांतर्गत पर्यटन |
| ३. सामिप्य स्थानी पर्यटक | क) दुसऱ्या खंडामध्ये केलेले पर्यटन |
| ४. प्रादेशिक खंडांतर्गत पर्यटक | ड) जवळपास आजूबाजूच्या परिसरात पर्यटन |

क) योग्य विधान निवडा

विधान १ प्रत्येक पर्यटकांचा पर्यटनाचा उद्देश स्वतंत्र असतो.

विधान २ देशातल्या देशात प्रवास करणाऱ्या पर्यटकाला विदेशी पर्यटक म्हणतात.

अ) फक्त १ बरोबर

ब) फक्त २ बरोबर

क) दोन्ही विधाने बरोबर

ड) दोन्ही विधाने चूक

## १.३ ऐतिहासिक पर्यटन

प्राचीन काळापासून मानवाला प्रवासाची आवड व आकर्षण आहे. प्रारंभीच्या काळामध्ये पर्यटनाचा उद्देश न ठेवता प्रवास केला जात असे. यामध्ये यात्रेकरू, खलाशी, शास्त्रज्ञ, अभ्यासक आणि संशोधक असत. प्रारंभी व्यापाराच्या निमित्ताने प्रवास केला जात असे. व्यापारामुळे दूरवरच्या लोकांशी सांस्कृतिक संबंध निर्माण झाले होते. व्यापारामुळे प्रवासाचे प्रमाण वाढत गेले आणि मानवी संस्कृतीचा विकास झाला.

जगातील विविध प्रदेशांच्या शोधासाठी आणि जगातील प्रदेशांच्या पाहणीसाठी हेतूपूर्वक प्रवास करण्यात येऊ लागला.

इतिहास आणि पर्यटन यांचा घनिष्ठ संबध आहे. ऐतिहासिकदृष्ट्या पर्यटनाचा उगम मानवाच्या मूलभूत गरजा आणि दैनंदिन गरजांशी संबंधित होता. कालांतराने पर्यटन बहुआयामी स्वरूपात लोकप्रिय झाले. पर्यटक सर्वात जास्त ऐतिहासिक पर्यटन स्थळांना भेटी देतात. त्यामुळे पर्यटन उद्योगात ऐतिहासिक पर्यटनाचे महत्व वाढत आहे.

### १.३.१ ऐतिहासिक पर्यटन अर्थ

रॉबिन्सन यांच्या मते, जेव्हा एखाद्या क्षेत्रातील ऐतिहासिक घटकांना भेट देण्यास पर्यटक येतात तेव्हा त्या पर्यटनास ऐतिहासिक पर्यटन असे म्हणतात.

कोणत्याही देशाला प्रदेशाला किंवा शहराला ऐतिहासिक पार्श्वभूमी असते त्यामुळे पर्यटन व ऐतिहासिक स्थाने यांची अतूट नाते आहे. ऐतिहासिक घटकांचा पर्यटन व्यवसायावर मोठा प्रभाव पडतो.

काही पर्यटक ऐतिहासिक आठवणी जपण्यासाठी निरीक्षण व पाहणी करण्यासाठी किंवा ऐतिहासिक अभ्यास करण्यासाठी येतात. भारताचा विचार केला असता एकूण पर्यटनापैकी सुमारे ६० टक्के पर्यटन हे ऐतिहासिक व सांस्कृतिक स्थानांना भेटी देण्यासाठी होते. उदाहरणार्थ भारतातील भुईकोट किल्ले, गड व जलदुर्ग यामध्ये रायगड, प्रतापगड, शिवनेरी, जंजिरा, सिंधुदुर्ग, विजयदुर्ग, देवगिरी, चित्तोडगढ, ग्वाल्हेर, आग्रा इत्यादी तर ऐतिहासिक राजवाडे व वास्तूमध्ये शाहू पॅलेस, गेटवे ऑफ इंडिया, ऐतिहासिक शहरामध्ये हम्पी, जयपूर, जैसलमेर व जोधपुर, कुरुक्षेत्र व पानिपत युद्धभूमी इत्यादी.

ऐतिहासिक पर्यटनामुळे प्रेक्षणीय स्थळांच्या इतिहासाची माहिती मिळते. संबंधित ठिकाणाचा इतिहास जाणून घेतल्यानंतर आपण काही काळ स्वत:ला त्या इतिहासाचा एक भाग समजू लागतो. त्या ठिकाणच्या भूतकाळाशी स्वतःला जोडताना अभूतपूर्व आनंद होतो. त्या ठिकाणी आनंदाची अनुभूती येते. आपले मन प्रसन्न होते. आपल्या दैनंदिनीच्या काळजीतून आपण काही काळ मुक्त होतो आणि संबंधित जागेच्या भूतकाळात हरवून जातो. अशा अनुभवातून आपण सामाजिक गुण विकसित करतो. मानवी संवेदनशीलता विकसित करतो.

ऐतिहासिक पर्यटनामुळे योग्य दृष्टीकोन ठेवून आपण सहिष्णू, करुणा, दया, सहानुभूती इत्यादी गुणांनी युक्त माणूस बनतो. प्रेक्षणीय स्थळांच्या इतिहासातून आपल्याला जगातील अनेक प्रमुख संस्कृती, शहरी विकास, युद्धे, चित्रकला, स्थापत्य, शिल्पकला इत्यादी कलेच्या विविध प्रकारांची माहिती मिळते. तसेच मानवी जीवनाच्या विविध पैलूंची माहिती होते.

### १.३.२ ऐतिहासिक पर्यटनाचे स्वरूप

इ.स.पू. ४००० मध्ये बॅबीलोनियातील गुप्त खजिन्याचा शोध लागला. स्थानिक व परदेशी व्यापारामध्ये प्रगती झाली. हा काळ म्हणजे प्रारंभीचे ऐतिहासिक युग आहे. बॅबीलोनियाचा एक राजा शुल्गी याने सुरक्षित

मार्गावर भर  दिला. प्रवासी व वाटसरू यांच्यासाठी ठीकठिकाणी विश्रांतीगृह बांधली. होमर ओडिसी मध्येही प्राचीन काळातील ग्रीकांच्या प्रवासवर्णनाच्या नोंदी मिळतात. प्राचीन काळापासून आधुनिक काळापर्यंत प्रवासाच्या कारणांमध्ये अनेक बदल झाले.

**१)    व्यापारासाठी प्रवास**

फोअनेशियन हे खऱ्या अर्थाने आधुनिक प्रवासी समजले जातात. यांनी व्यापारानिमित्त दूरदूरच्या ठिकाणी प्रवास केला. प्रारंभीच्या काळात भारत व चीनमध्ये झालेले प्रवास हे व्यापारावर आधारित होते तसेच पूर्वेकडील देशांनी भारताकडे केलेला प्रवास हा सुद्धा व्यापाराच्या निमित्ताने झालेला होता. अशा व्यापारामुळे धाडसी लोकांना नवीन नवीन प्रदेशाचा शोध घेणे आणि त्याची माहिती मिळवणे यासाठी प्रोत्साहन मिळाले. याच उद्देशाने इ.स.पू. ३ मध्ये अलेक्झांडरने  ग्रीस पासून वायव्य भारतापर्यंत आपले साम्राज्य निर्माण केले होते. नवनवीन प्रदेश शोधून तेथे साम्राज्यविस्तार केला होता. मार्कोपोलो याचा जन्म व्हेनिस मध्ये  झाला. त्याने भारत व  इतर आशियाई देशांमध्ये प्रवास केला. चीनपर्यंत प्रवास करून पूर्वेकडील देशांमधील निसर्ग, सांस्कृतिक जीवन, व्यापार इत्यादीविषयी बारीक माहिती मिळवली. या माहितीच्या आधारामुळे युरोपियन लोकांचा आशियाई लोकांशी संवाद आणि व्यापार सुरू झाला.

**२)    मनोरंजनासाठी प्रवास**

१८ शतकाच्या सुरुवातीला प्रवासाचे स्वरूप बदलले. प्रवास हा मनोरंजनासाठी होऊ लागला. मनोरंजनासाठी प्रवास कल्पना रोमन साम्राज्याची संबंधित मानली जाते. रोमन हे मनोरंजनासाठी प्रवास करणारे जगातील पहिले प्रवासी होते. रोमन साम्राज्यात उत्तम दळणवळण व्यवस्था व सुरक्षितता होती. त्यामुळे प्रवासाला उत्तेजन मिळाले. या काळात प्रवाशांना राहण्यासाठी समुद्राच्या काठी आरोग्यधामे बांधण्यात आली होती. त्यानंतर युरोपमध्येही मनोरंजनासाठी प्रवास होऊ लागला

**३)    समुद्रकाठी पर्यटन**

१८ व्या शतकाच्या मध्यात समुद्राच्याकाठी  भ्रमंती करणे, समुद्रात पोहणे या प्रकारचे  पर्यटन होऊ लागले. त्यामुळे युरोपीय देशांच्या किनाऱ्याजवळ विश्रामगृहे निर्माण झाली. यातूनच पर्यटनाला सुरुवात झाली. १८ व्या शतकाच्या अखेरीस युरोपमध्ये वार्षिक सुट्टीची कल्पना पुढे आली. वार्षिक सुट्टीमुळे दूर दूरच्या प्रवासाला प्रोत्साहन मिळाले.

**४)    धार्मिक दृष्टीने प्रवास**

१८ व्या शतकाच्या उत्तरार्धात धार्मिक दृष्टीने होणाऱ्या प्रवासाला अतिशय महत्त्व प्राप्त झाले. जगात ख्रिश्चन धर्माचा प्रसार सुरू झाला. त्यावेळी धार्मिक दृष्टीने प्रवासाची पद्धत अधिक प्रचलित झाली. ख्रिश्चन धर्माप्रमाणेच बौद्ध, जैन, हिंदू आणि मुस्लिम धर्मातील धार्मिक ठिकाणांना लोकांच्या भेटी होऊ लागल्या. यातून धार्मिक पर्यटनाला महत्त्व प्राप्त झाले.

### ५) आधुनिक दळणवळणाच्या सोयी

१९ व्या शतकात रेल्वे मार्गाचा प्रारंभ झाला. ही घटना पर्यटनाच्या इतिहासातील महत्त्वाची घटना मानली जाते. इ.स. १८३० मध्ये जगात सर्वप्रथम इंग्लंडमध्ये लिव्हरपूल ते मँचेस्टर या दरम्यान रेल्वे सुरू झाली. इ.स. १८५३ मध्ये भारतात प्रथमच ठाणे ते मुंबई या दरम्यान रेल्वे धावली. युरोपातील इतर देशातही रेल्वे वाहतूक सुरू झाली. त्यामुळे पर्यटनाच्या दृष्टीने रेल्वेमार्गास खूपच महत्त्व प्राप्त झाले.

रेल्वेप्रमाणे सागरी वाहतुकीने ही पर्यटनाच्या क्षेत्रात केलेले कार्य महत्त्वाचे आहे. सागरी वाहतुकीमुळे अमेरिकेकडे लोकांचा प्रवास होऊ लागला. इ.स. १८६९ मध्ये सुएझ कालवा सुरू झाला आणि इ.स. १९१४ मध्ये पनामा कालवा सुरू झाला. त्यामुळे सागरी मार्गाने मोठ्या प्रमाणावर प्रवास होऊ लागला. रेल्वे व सागरी वाहतुकीमुळे पर्यटनाला वेगळी दिशा मिळाली.

२० व्या शतकात जगात पहिली मोटार निर्माण झाली. तरीसुद्धा पहिल्या महायुद्धापर्यंत मोटारी ची संख्या कमीच होती. दुसऱ्या महायुद्धानंतर मोठा प्रवासात मोठ्या प्रमाणात वाढ झाली. त्यामुळे पर्यटन अधिक प्रमाणात होऊ लागले.

इ.स. १९६० नंतर हवाई वाहतुकीमध्ये आमूलाग्र प्रगती झाली. त्यामुळे पर्यटनाचा खूपच विकास झाला.

अशाप्रकारे प्राचीन काळापासून आधुनिक काळापर्यंत पर्यटनाचे स्वरूप बदलत गेले. नवनवीन शोध व तंत्रज्ञानामुळे ऐतिहासिक पर्यटनाचा विकास झाला.

### ४.३.३ ऐतिहासिक पर्यटनाची व्याप्ती

प्राचीन काळी व्यापार म्हणून सुरू झालेले पर्यटन आता आधुनिक होत आहे. पूर्वी पर्यटन मर्यादित गोष्टींशी संबंधित होते आता त्यामध्ये अनेक घटकांचा अंतर्भाव होतो. यामध्ये ट्रान्सपोर्ट, एजंट, ज्या साधनांनी पर्यटन होणार आहे ते साधन, पर्यटकांचा प्रवास, त्यांचे पर्यटन केंद्राच्या ठिकाणचे वास्तव्य, वास्तव्याचे हॉटेल, भोजनालय, चालकांशी येणारे संबंध, पर्यटन केंद्रातील भ्रमंती, टॅक्सी ड्रायव्हरशी येणारे संबंध, पर्यटन केंद्रातील निरनिराळ्या आकर्षक गोष्टी, फोटो स्टुडिओ व फोटोग्राफर, बाजारपेठा इत्यादी सर्व गोष्टींचा पर्यटनात समावेश होतो.

साधारणपणे १७ व्या शतकापर्यंत पर्यटन हे शोध कार्य व व्यापार यासाठीच होत होते. त्यामुळे पर्यटनाची व्याप्ती मर्यादित होती. रोमन साम्राज्यामध्ये पर्यटन हे मनोरंजनासाठी होऊ लागले. १९ व्या शतकामध्ये दळणवळणाच्या मार्गामध्ये प्रगती झाली त्यामुळे ऐतिहासिक पर्यटनाचे महत्व वाढले.

ऐतिहासिक पर्यटन प्रकारात ऐतिहासिक राजवाडे, गड किल्ले, राजधानीची स्थळे, निवासस्थाने, ऐतिहासिक अवशेष, वस्तूसंग्रहालय, ऐतिहासिक स्मारके, ऐतिहासिक राजवाडे व वास्तू इत्यादींचा समावेश होतो.

**ऐतिहासिक पर्यटनाची उद्दिष्टे**

ऐतिहासिक पर्यटनामध्ये पुढील उद्दिष्टांचा समावेश होतो

१. देशाचा इतिहास व संस्कृती समजून घेणे

२. ऐतिहासिक कला स्थापत्य व मूर्तिकलांची पाहणी करणे,

३. आनंद मिळवणे

४. संशोधन करणे

५. ऐतिहासिक स्थळांचा अभ्यास करणे

६. शिक्षण घेणे

७. स्मारकांचा अभ्यास करणे

८. संग्रहालयांना भेटी देणे

ऐतिहासिक पर्यटन हा घटक पर्यटन उद्योगावर परिणाम करणारा आहे. अलीकडे ऐतिहासिक संशोधन करणाऱ्या विद्यार्थी व संशोधक पर्यटकांची संख्या वाढत आहे. ऐतिहासिक वास्तू, स्मारके, भुईकोट किल्ले, गड, जलदुर्ग, राजवाडे, इमारती यांना विशिष्ट असे वैभव असल्यामुळे पर्यटक भेट देण्यासाठी येतात. त्यामुळे अशा वास्तूंचे रक्षण व संवर्धन शासन किंवा पुरातत्व विभाग मार्फत केले जाते.

जगात युरोपला प्रदीर्घ इतिहास आहे. तेथील अनेक ऐतिहासिक स्थळे व स्मारके पर्यटकांची आकर्षणे आहेत. इंग्लंड देशातील लंडन येथील बंकीगहॅम पॅलेस प्रसिद्ध आहे. इजिप्त मधील पिरॅमिड जगप्रसिद्ध आहे तर भारतातील अनेक ऐतिहासिक वास्तू राजवाडे व गड किल्ले पर्यटनाची आकर्षणे आहेत.

अशाप्रकारे ऐतिहासिक पर्यटनाची व्याप्ती वाढली आहे व पर्यटन क्षेत्र विस्तृत झाले आहे.

**स्वयं अध्ययनासाठी प्रश्न**

अ) योग्य पर्याय निवडून विधाने पुन्हा लिहा.

१) बॅबीलोनियाचा राजा ..............प्रवाश्यांसाठी विश्रांतीगृहे बांधली.

अ) शुल्गी ब) सुमु क) सायरस ड) नोबोनीडस

२) ...............यांना आधुनिक प्रवासी म्हटले जाते.

अ) फोअनेशियन ब) बॅबीलोनियन क) आशियायी ड) भारतीय

३) ......हे मनोरंजनासाठी प्रवास करणारे जगातील पहिले प्रवासी होते.

अ) ग्रीक ब) सुमेरियन क) रोमन ड) युरोपियन

४) इ.स. १८३० मध्ये जगात सर्वप्रथम इंग्लंडमध्ये लिव्हरपूल ते ........ या दरम्यान रेल्वे सुरू झाली.

अ) लंडन ब) यार्क क) डोव्हर ड) मॅचेस्टर

५) ...........येथील पिरॅमिड जगप्रसिद्ध आहे.

अ) इटली ब) इंग्लंड क) इजिप्त ड) न्यूयार्क

ब) जोड्या जुळवा

| | |
|---|---|
| १. होमर ओडीशी | अ) व्हेनिस |
| २. मार्कोपोलो | ब) ग्रीक |
| ३. बंकिमहॅम पॅलेस | क) ऐतिहासिक पर्यटन |
| ४. गड किल्ले | ड) इंग्लंड |

क) योग्य विधान निवडा

विधान १ रोमन साम्राज्यात उत्तम दळणवळण व्यवस्था व सुरक्षितता होती.

विधान २ समुद्राकाठी पर्यटनामुळे युरोपियन देशाच्या किनाऱ्यावर विश्रामगृहांचा उदय झाला.

अ) फक्त १ बरोबर

ब) फक्त २ बरोबर

क) दोन्ही विधाने बरोबर

ड) दोन्ही विधाने चूक

## १.४ ऐतिहासिक पर्यटन केंद्रांचे वर्गीकरण

पर्यटनाच्या दृष्टीने ऐतिहासिक स्थळांना विशेष महत्त्व आहे. ऐतिहासिक स्थाने त्यांच्या ऐतिहासिक पार्श्वभूमीमुळे विकसित होतात. ऐतिहासिक पर्यटनाचे ऐतिहासिक स्थळे, स्मारक व संग्रहालय अशा तीन भागांमध्ये वर्गीकरण केले जाते.

### १.४.१ ऐतिहासिक स्थळे

भारताला ऐतिहासिक परंपरा लाभली आहे. त्यामुळे भारतामध्ये अनेक ऐतिहासिक स्थळे आहेत. त्यातील काही अवशेषाचा रुपात तर काही नष्ट होण्याच्या मार्गावर आहेत. काही ऐतिहासिक स्थळांनी आपले स्थान टिकवून ठेवले आहे. ऐतिहासिक स्थळांच्यामुळे भारतातील पर्यटन व्यवसाय विकसित होत

आहे. ही ऐतिहासिक स्थळे पर्यटकांचे आकर्षण बनलेली आहेत. यातील पर्यटनाच्या दृष्टीने काही ऐतिहासिक स्थळे महत्त्वाची आहेत.

## १) किल्ले

ऐतिहासिक स्थळांमध्ये किल्ले हा घटक प्रमुख आहे. सुरक्षिततेच्या दृष्टीने किल्ल्यांचे बांधकाम करण्यात आले. हे किल्ले दगडी व भक्कम असतात शिवाय त्याच्याभोवती भक्कम तटबंदी व खंदक असतात. काही किल्ले उंच पर्वतीय भागात, दुर्गम ठिकाणी, काही पाण्यात बांधले जात होते. पाण्यात बांधलेल्या किल्ल्यांना जलदुर्ग म्हटले जाते. जमिनीवर बांधलेल्या किल्ल्याला भुईकोट किल्ला असे म्हणतात. किल्ल्यामध्ये राजा त्यांचे सरदार व सैन्य राहत असे. याशिवाय किल्ल्यावर दारुगोळा, धान्य, घोडे इत्यादी युद्धाच्या दृष्टीने आवश्यक गोष्टी असत.

### रायगड

मराठ्यांच्या इतिहासामध्ये रायगड किल्ल्याला महत्त्वाचे स्थान आहे. रायगडावरील किल्ला रायगड जिल्ह्यातील महाड तालुक्यात आहे. महाड पासून २४ किलोमीटर अंतरावर रायगड हा किल्ला आहे. या किल्ल्याच्या बांधकामामध्ये शिवशाहीतील वास्तुशिल्पाचा नमुना पाहता येतो. कल्याणचा सुभेदार आबाजी सोनदेव याला हुकूम करून महाराजांनी रायगडावरील सर्व बांधकामे करून घेतली. इ.स. १६७० मध्ये छत्रपती शिवाजी महाराजांनी राजगड किल्ल्यावरून आपली राजधानी रायगडवर आणली. रायगड वर एकूण ३०० दगडी इमारती बांधल्या. त्यामध्ये राजवाडे, कचेरी, धान्याची कोठारे, दारूगोळ्याची कोठार, शिबंदीच्या राहण्याच्या जागा, व्यापाराची पेठ, पाण्याची हौद, तलाव इत्यादीचा अंतर्भाव होतो. रायगड किल्ल्याला युरोपियन लोक पूर्वेचा जिब्राल्टर असे म्हणत. रायगड किल्ला महाराष्ट्रातील ऐतिहासिक पर्यटनातील महत्वाचे स्थळ आहे.

तसेच महाराष्ट्रातील पन्हाळगड, विशाळगड, प्रतापगड, अजिंक्यतारा, सिंधुदुर्ग, मुरुड जंजिरा, पुरंदर, शिवनेरी, तोरणा, राजगड, सिंहगड, हरीशचन्द्रगड, दौलताबाद इ. ऐतिहासिक किल्ले प्रेक्षणीय आहेत.

## २) दिल्ली

दिल्ली हे भारतातील एक महत्वाचे ऐतिहासिक शहर आहे. भारताची राजधानी दिल्लीला ऐतिहासिक महत्त्व आहे. दिल्लीमध्ये पर्यटकांना पाहण्यासाठी अनेक ऐतिहासिक स्थळे उपलब्ध आहेत. त्या सर्वांमध्ये लाल किल्ला मुघल काळापासून प्रसिद्ध आहे. या किल्ल्यात अनेक राजवाडे व सार्वजनिक इमारती आहेत. तेथे लहानसे वस्तूसंग्रहालय आहे. याशिवाय जुन्या दिल्लीत एक पुरातन किल्ला आहे. प्रगती मैदान स्टेडियम, प्राणी संग्रहालय, उमाजी स्मारक यांचाही प्रेक्षणीय स्थळांमध्ये समावेश होतो. याशिवाय दिल्लीमधील जामा मशीद प्रसिद्ध आहे. कुतुबमिनार विजयस्तंभ ही मुघल काळातील वास्तू प्रसिद्ध आहे. तसेच ब्रिटिश काळातील अनेक स्मारके व वास्तु दिल्लीमध्ये पाहण्यास मिळतात. यामध्ये राष्ट्रपती भवन, इंडिया गेट,

पार्लमेंट हाऊस, कॅनॉट प्लेस व इतर वास्तूंचा समावेश आहे. इतर प्रेक्षणीय स्थळांमध्ये फिरोजशहा कोटला मैदान, जंतर-मंतर हे प्रमुख आहेत. त्यामुळे दिल्ली हे पर्यटनाच्या दृष्टीने महत्त्वाचे स्थळ आहे.

**३) झांसी**

झांसी हे ठिकाण राणी लक्ष्मीबाई यांच्यामुळे प्रसिद्ध आहे. राणी लक्ष्मीबाई यांच्या इ.स. १८५७ च्या उठावातील पराक्रमामुळे हे ठिकाण अजरामर झाले आहे. येथे ऐतिहासिक किल्ला असून त्यामध्ये धातूंची बिजली तोफ, आठ धातूपासून बनवलेली शंकर तोफ, राणीचा पाच मजली महाल, लहान मुलाला पाठीशी बांधून ज्या बुरुजावरून उडी घेतली तो बुरुज इत्यादी स्थळे प्रेक्षणीय आहेत.

**४) ग्वाल्हेर**

ग्वाल्हेर ही मध्य प्रदेशातील एक महत्वाचे ऐतिहासिक ठिकाण आहे. ही संस्थानाची राजधानी होती. येथे एका उंच टेकडीवर भव्य चिरेबंदी किल्ला आहे. तेथे तोमर, पठाण, मुघल, इंग्रज, मराठा अशा विविध राज्यकर्त्यांच्या खानाखूणा आढळतात. तोमर राजा मानसिंह यांनी ग्वाल्हेरच्या किल्ल्यावर अनेक स्मारके बांधली. त्यापैकी रंगीत चित्रांच्या सुशोभित भिंतीचा मनमंदिर राजवाडा हिंदू वास्तुकलेचा अजोड नमुना आहे.

**५) चितोडगड**

चितोडगड हे राजस्थान राज्यातील ऐतिहासिक स्थळ आहे. हे ठिकाण सिसोदिया वंशांच्या रजपुतांच्या राजधानीचे ठिकाण होते. येथे एका टेकडीवर भक्कम तटबंदी असलेला एक भव्य किल्ला आहे. त्यामध्ये सुंदर राजवाडे, मंदिर व तलाव आहेत. तेथे पद्मिनी महाल हा प्रेक्षणीय महाल आहे. या महालात एक आरसा विशिष्ट पद्धतीने बसवला आहे. त्यामुळे तलावातील महालाच्या पायरीवरील व्यक्तीचे पाण्यातील प्रतिबिंब आरशात दिसते. या किल्ल्यात इ.स. १४४० मध्ये उभारलेले दोन स्मारक विजयस्तंभ व कीर्ती स्तंभ आहेत.

**६) उदयपूर**

उदयपूर हे राजस्थान मधील एक ऐतिहासिक शहर आहे. उदयपूरला तलावांचे शहर असे म्हणतात. येथे महाराजांचा ग्रॅनाईट व संगमरवरी दगडाने बांधलेला एक भव्य राजवाडा आहे. या राजवाड्यात मोती महाल, शिश महाल, माणिक महाल इत्यादी ऐतिहासिक वास्तू आहेत. तसेच शहरांमध्ये ऐतिहासिक वास्तूंचे एक संग्रहालय आहे. राजवाड्याच्या मागील बाजूस १४ व्या शतकात बांधलेला पिचोला लेक (तलाव) आहे. या तलावाचे क्षेत्र दहा चौरस किलोमीटर आहे. या तलावात जय मंदिर व जय निवास असे दोन राजवाडे आहेत

**७) जयपुर**

जयपूर हे राजस्थानातील राजधानीचे ठिकाण आहे. जयपूर शहराला गुलाबी शहर म्हणून ओळखतात. येथील राजवाडे तांबड्या रंगाच्या दगडांनी बांधलेले असून त्यामध्ये भव्य कलाकुसर पहावयास मिळते. इ.स. १७२६ मध्ये महाराजा सवाई जयसिंह यांनी हे नगर बांधले. थोर वास्तुशास्त्रज्ञ विद्याधर भट्टाचार्य यांनी जैन व मुघल वास्तू रचनेच्या शैलीप्रमाणे या शहराची उभारणी केली.

जयपुर शहरांमध्ये राजवाडे, बागा व वस्तुसंग्रहालय आढळतात. येथील हवा महल ही वास्तू प्रेक्षणीय आहे. १८ व्या शतकात बांधलेली दगडी वेधशाळा सुद्धा एक प्रेक्षणीय स्थळ आहे. याशिवाय सिटी पॅलेस, जय महाल, अमर पॅलेस ही ठिकाणी महत्वाची आहेत. संगमरवरातून कोरलेली शिल्पे व समोर संपूर्ण संगमरवरी बांधकाम असलेले बिर्ला मंदिर प्रेक्षणीय आहे.

**८) जोधपुर**

जोधपूर हे राजस्थान मधील राठोड घराण्याच्या राजधानीचे ठिकाण आहे. जोधपूरच्या आजूबाजूला वाळवंट आहे. संरक्षणाच्या दृष्टीने येथील राजांनी किल्ले व राजवाड्यांचे बांधकाम केले. राठोड घराण्याचा प्रमुख राव जोधा यांनी इ.स. १४५९ मध्ये मेहेरगढ हा किल्ला बांधला. हा किल्ला तांबड्या दगडाचा असून प्रेक्षणीय आहे. याला सात दरवाजे आहेत किल्ल्याच्या आतील बाजूस मोती महाल, फुल महाल, शिश महाल आहे. किल्ल्यामध्ये राजघराण्याच्या दुर्मिळ वस्तूंचे संग्रहालय आहे. जोधपूर येथे उम्मेद भवन पॅलेस नावाचा एक राजवाडा आहे. हा राजवाडा उमेदसिंह यांनी बांधला. तसेच चित्तर पॅलेस हा राजवाडा चित्तर सॅडस्टोनने बांधला.

**९) हैदराबाद**

हैदराबाद हे आंध्रप्रदेशच्या राजधानीचे ठिकाण आहे. हे ऐतिहासिक पर्यटन केंद्र असल्यामुळे विदेशी पर्यटकांची गर्दी येथे पाहण्यास मिळते. हे शहर मुसी नदीच्या काठी वसलेले आहे, इ.स. १५९१ मध्ये गोवळकोंड्याचा सुलतान कुतुबशाह यांनी हे शहर वसविले. कुतुबशहाची राणी हैदर महल हिच्या नावावरून या शहरास हैदराबाद हे नाव दिले. हैदराबाद शहराभोवती तटबंदी होती. या शहरात अनेक ऐतिहासिक वास्तू आहेत.

गोवळकोंड्याचा कुतुबशहा यांनी इ.स. १५९१ मध्ये चारमिनार ही वास्तू हैदराबाद येथे बांधली. चारमिनारला चार खुल्या कमानी आहेत. त्याच्या प्रत्येक मिनारांची उंची ५६ मीटर आहे. चारमिनारच्या दुसऱ्या बाजूला एक छोटीशी मशिद आहे. चारमिनार जवळील या मशिदीमध्ये एका वेळी दहा हजार लोक प्रार्थना करू शकतील अशी व्यवस्था आहे.

हैदराबाद पासून १३ किलोमीटर अंतरावर गोवळकोंडा किल्ला आहे. या किल्ल्यामध्ये ध्वनीशास्त्र पद्धतीचा वापर केला आहे हे या किल्ल्याचे वैशिष्ट्य आहे. या किल्ल्यामध्ये राजप्रसाद, मशिदी, बाजारपेठ, तलाव इत्यादी गोष्टी आहेत. तसेच हैदराबाद येथील पर्यटकांचे मुख्य आकर्षण म्हणजे सालारजंग वस्तूसंग्रहालय हे होय.

**१०) विजापूर**

विजापूर हे ठिकाण कर्नाटक मध्ये आहे. १६ व्या शतकात विजापूर आदिलशाहीची राजधानी होती. विजापूरमधील गोलघुमट प्रसिद्ध आहे. या ऐतिहासिक वास्तूच्या चार बाजूला चार सात मजली मिनार आहेत व मध्यभागी ५१ मीटर उंच व ३७ मीटर व्यासाचा एक प्रचंड घुमट आहे. गोलघुमटमध्ये चढून गेल्यानंतर

प्रतिध्वनी निर्माण करणारी गॅलरी आहे. विजापूर मध्ये आदिलशहाची मुलुख मैदानी तोफ प्रेक्षणीय आहे तसेच येथे एक भव्य जामा मशीद आहे. या मशिदीला ३०० लहान-मोठे घुमट आहेत. कर्नाटकातील महत्त्वाचे ऐतिहासिक पर्यटन केंद्र म्हणून विजापूरकडे पाहिले जाते.

**११) हम्पी**

कर्नाटकातील हम्पी हे ठिकाण विजयनगर साम्राज्याची राजधानी होती. येथील बाजारपेठ, हत्तीपागा, कामराज महल इत्यादी ऐतिहासिक वास्तू महत्वाच्या आहेत. हम्पी येथील विठ्ठल मंदिर प्रेक्षणीय आहे. याचे बांधकाम सोळाव्या शतकात झाले. हे मंदिर म्हणजे वास्तु शिल्पकलेचा एक अप्रतिम नमुना आहे. या मंदिराला असलेल्या खांबातून निरनिराळ्या वाद्यांचे मधुर आवाज निघतात.

**१२) श्रीरंगपट्टणम**

कर्नाटकातील श्रीरंगपट्टण हे ठिकाण टिपू सुलतान यांच्या राजधानीचे ठिकाण होते. म्हैसूर पासून १६ किलोमीटर अंतरावर हे ठिकाण आहे. येथे टिपू सुलतानचा राजवाडा, त्यांचे आई, वडील आणि स्वतः टिपू सुलतान याची कबर आहे. तसेच तेथे एक मोठी जामा मशीद आहे.

**१.४.२ ऐतिहासिक स्मारके**

पर्यटनामध्ये ऐतिहासिक स्मारकांना महत्वाचे स्थान आहे. भारतातील अनेक स्मारके देशी पर्यटकाप्रमाणे विदेशी पर्यटकांना आकर्षित करतात. भारतातील काही स्मारके व वास्तू खालीलप्रमाणे

**१.४.२.१ दिल्ली येथील स्मारके**

दिल्लीमध्ये मेहरौलीचा लोखंडी स्तंभ, कुव्वत-उल-इस्लाम मशीद, कुतुबमिनार, अलाई दरवाजा, हौजखास, फिरोजशाह कोटला, हुमायूनचा मकबरा आणि लाल किल्ला यांसारख्या ऐतिहासिकदृष्ट्या महत्वाच्या अनेक वास्तू आहेत. या वास्तू पाहण्यासाठी पर्यटकांची गर्दी असते.

**१. मेहरौलीचा लोहस्तंभ**

हा लोहस्तंभ मेहरौली येथे कुतुबमिनारजवळ आहे. अनेक इतिहासकारांच्या मते तो गुप्त काळात उभारण्यात आला. गुप्त काळातील तंत्रज्ञान आणि कलाकुसरीचे हे एक अद्वितीय उदाहरण आहे. शतकानुशतके बांधलेल्या या स्तंभाला आजपर्यंत गंज लागलेला नाही, यावरून त्याची उच्च दर्जाची तांत्रिक कारागिरी दिसून येते. त्यावर कोरलेल्या शिलालेखावरून याची स्थापना चंद्र नावाच्या राजाने केल्याचे आढळते. या राजाबद्दल असे म्हटले जाते की त्याने आपल्या संघटित शत्रूंविरुद्ध बंग देश जिंकला आणि सिंधू नदीचे सात तोंड ओलांडून युद्ध करून बहलिकांवर विजय मिळवला. त्याच्या विजयाचा झेंडा दक्षिण समुद्रापर्यंत पसरला. आपल्या पराक्रमाने त्याने जगात आपली सर्वोच्च सत्ता स्थापन केली.

## २. कुव्वत–उल–इस्लाम मशीद

कुव्वत–उल–इस्लाम मशीद दिल्लीतील सुलतानशाहीच्या स्थापनेनंतर भारतात बांधलेली पहिली इमारत मानली जाते. सर जॉन मार्शल यांच्या मते, भारतीय स्थापत्यशास्त्राचा स्पष्ट प्रभाव त्याच्या स्तंभावर आणि कमानीवर दिसून येतो. त्याच्या स्तंभावर मानवी मूर्ती कोरलेल्या आहेत. या मशिदीच्या कमानी आकर्षक आहेत. मशिदीच्या पश्चिमेला इबादतखाना बांधण्यात आला आहे. मशिदीच्या तीन बाजूंनी नक्षीदार प्रवेशद्वार बांधण्यात आले आहेत. काही काळानंतर मशिदीचा प्रार्थना हॉल मोठा करण्यात आला. कमानीवर कुराणातील आयते कोरण्यात आली. हि मशीद म्हणजे वास्तुकलेच्या विविध शैलींचा संग्रह आहे. तेथे हिंदू–मुस्लिम शैलींचे स्पष्ट मिश्रण दिसून येते. फुले आणि पानांनी सजावट करण्याची शैली हिंदू आहे तर कुराणातील आयत तुगरा  शैलीत कोरलेले आहेत.

## ३. कुतुबमिनार

हा मिनार दिल्लीतील एक महत्त्वाचे पर्यटन स्थळ आहे. येथे दररोज शेकडो पर्यटक भेट देतात. मिनाराचा खालचा भाग ३५ फूट, दुसरा भाग ५१ फूट, तिसरा भाग ४१ फूट, चौथा भाग २६ फूट आणि पाचवा भाग २५ फूट उंच आहे. कुतुबमिनारचे बांधकाम कुतुबद्दीन ऐबकने सुरू केले होते. अल्तमशने कुतुबमिनारचे बांधकाम पूर्ण केले. सध्या त्याची उंची ७२.५ मीटर आहे. या मिनारचा व्यास ४८ फूट आहे.

## ४. अलाई दरवाजा

हा दरवाजा कुव्वत–उल–इस्लाम मशिदीच्या बाहेर दक्षिण बाजूने बांधला आहे. याचे बांधकाम अलाउद्दीन खिलजीने केले. हा दरवाजा उत्तम दर्जाच्या वाळूच्या दगडापासून बनवण्यात आला आहे. अलाउद्दीन खिलजीने बांधलेला हा दरवाजा सुलतान काळातील सर्व वास्तूंमध्ये सर्वोत्तम असल्याचे म्हटले जाते.

## ५. हौजखास मदरसा आणि फिरोजशाह कोटला किल्ला

हौजखास मदरसा आणि फिरोजशाह कोटला किल्ला ही दिल्लीतील प्रमुख पर्यटन स्थळे आहेत. हौजखास आणि फिरोजशाह कोटला तुघलक वंशातील सुलतान फिरोजशाह तुघलक याने बांधले होते. फिरोजशाह कोटला हा किल्ला बांधला गेला. त्या काळामध्ये हा महत्त्वाचा किल्ला होता. त्याला पाचवी दिल्ली असेही म्हणतात. त्याच्या राजवटीत अनेक शहरे वसवली. त्यामध्ये जौनपूर, फिरोजाबाद, हिस्सार इ. प्रमुख शहरे आहेत.

## ६. हुमायूनची कबर

ही कबर हुमायूनची पत्नी हाजी बेगम यांनी बांधली. ही वास्तू इराणी वास्तुविशारद मिर्झा गियासबेग यांच्या देखरेखीखाली बांधले गेली. कबरीच्या भिंतीभोवती चार दरवाजे आहेत. ही कबर २२ फूट उंच चबुतऱ्यावर बांधलेली आहे. पश्चिम दरवाजासमोर एक सुंदर बाग आहे. कबर १५६ फूट चौरस परिसरात

पसरलेली आहे. त्याचा घुमट बराच मोठा आहे. त्याभोवती खांबांचा आधार घेऊन घुमटासारख्या छत्र्या बांधल्या आहेत. दिल्लीतील पर्यटन स्थळांमध्ये ही कबर महत्त्वाची आहे.

**७. लाल किल्ला**

मुघल बादशाह शाहजहानने इ.स. १६३८ मध्ये दिल्लीमध्ये लाल किल्ला बांधला. याच वर्षी त्याने दिल्लीजवळ शाहजहानाबाद नावाचे एक नवीन शहर वसवले. लाल किल्ला याच शहरामध्ये आला. हा किल्ला आग्रा येथील लाल किल्ल्यासारखाच आहे. परंतु तितका मजबूत नाही. त्याची लांबी आणि रुंदी अनुक्रमे ३२०० फूट आणि १६५० फूट आहे. त्याच्या सभोवताली उंच भिंतीं आहेत. याला बाहेरील भिंतीत दोन दरवाजे आहेत. यातील एक पश्चिम भिंतीत आणि दुसरा दक्षिणेकडील भिंतीच्या मध्यभागी आहे. यातील पहिला दरवाजा म्हणजे मुख्य दरवाजा. या दरवाजावर उच्च दर्जाची वास्तुकला दर्शवते.

किल्ल्यात अनेक राजेशाही व इतर वास्तू आहेत. रंगमहाल, हिरामहल आणि मोतीमहाल यांना विशेष महत्त्व आहे. याशिवाय दिवान ए आम आणि दिवान ए खास या सरकारी इमारती आहेत. संगीत भवन आणि अनेक बाजारपेठा जवळच आहेत. प्रत्येक वाड्यासमोर सुशोभीकरण आणि मनोरंजनाच्या उद्देशाने सुंदर बागा बांधण्यात आल्या आहेत.

दिल्लीच्या लाल किल्ल्यात शाहजहानने अनेक इमारती बांधल्या होत्या. मुख्य म्हणजे दिवाण-ए-खास, दिवाण-ए-आम इ. या किल्ल्यात एक सुंदर मोती मशीद आहे. याचे बांधकाम औरंगजेबाने केले होते.

किल्ल्यात यमुना नदीतून एक कालवा काढण्यात आला आहे, त्याला नहर-ए-बहिश्त म्हणतात. त्यावेळी पाण्याच्या सर्व गरजा यातून पूर्ण होत होत्या. याशिवाय रंगमहाल हे शहाजहानचे हरम होते. रंगमहाल १५३ फूट लांब आणि ६९ फुट आहे. यामध्ये एक मुख्य हॉल आणि अतिरिक्त लहान खोल्या आहेत. मध्यभागी एक जलाशय आहे. ते अंदाजे २६ चौरस फूट आहे. जलाशय कमळाच्या आकाराचे आहे, त्यामध्ये उत्तम कलात्मकता आहे. हा महाल म्हणजे स्वर्ग आहे असे म्हटले जाते.

**८) दिल्लीची जामा मशीद**

भारतातील सर्वात मोठी जामा मशीद दिल्लीच्या लाल किल्ल्याजवळ आहे. हि मशीद शाहजहानने इ.स. १६५८ मध्ये बांधली. ही इमारत आकाराने खूप मोठी आणि कलेच्या दृष्टिकोनातून सुंदर आहे. उंच चबुतऱ्यावर मशीद बांधलेली आहे. त्याला मोठे दरवाजे आहेत. त्याच्या वेशींवर बुरुज आहेत. दरवाज्यापर्यंत जाण्यासाठी पायऱ्या आहेत. सामान्य लोकांच्या प्रवेशासाठी उत्तरेकडील आणि दक्षिणेकडील दरवाजे वापरण्यात आले आहेत. राजघराण्यातील व्यक्तींच्या प्रवेशासाठी पूर्वेकडील दरवाजे वापरण्यात आले आहेत. २८६ फूट लांब आणि ९० फूट रुंद ही मशीद आहे.

### १.४.२.२ आग्रा येथील स्मारके

**१. मुमताजमहलचे स्मारक : ताजमहाल**

शाहजहानने आग्रा येथे यमुनेच्या काठावर बांधलेली सर्वात सुंदर वास्तू म्हणजे ताजमहाल. ही एक कबर आहे. शहाजानने त्याची सर्वात प्रिय बेगम अर्जुमंदबानू बेगम (मुमताज महल) यांच्या स्मरणार्थ बांधली होती. या इमारतीचे बांधकाम इ.स. १६३१ मध्ये सुरू झाले आणि इ.स. १६५३ मध्ये पूर्ण झाले. पर्सी ब्राउनच्या मते, ही इमारत मुघल वास्तुकलेच्या परिपूर्णतेचे उदाहरण आहे. मजुमदार यांच्या मते, या वास्तूसाठी सुमारे पन्नास लाख रुपये खर्च करण्यात आले. ही इमारत जगातील आश्चर्यांपैकी एक आहे. या वास्तूच्या कारागीराबाबत वेगवेगळी मते आहेत. स्पॅनिश प्रवासी म्हणतो की, त्याचा निर्माता 'जेरोइमो वेरोनियो' हा सोनार होता. स्मिथ यांच्या मते, युरोपियन आणि आशियाई कलाकारांनी ताजमहालचे बाधकाम केले. परंतु अनेक इतिहासकार याच्याशी सहमत नाहीत. पर्सी ब्राउनच्या मते, ते मुस्लिम कारागिरांनी बांधले होते आणि हिंदू कलाकारांनी रंगकाम केले होते. काही मोज़ेकचे काम कन्नौजच्या हिंदू कलाकारांनी केले होते.

ताजमहालची लांबी आणि रुंदी अनुक्रमे १९०० फूट आणि १००० फूट आहे. ताजमहाल सामोरील बाग १००० फूट चौरस आहे. ताजमहालची कबर उत्तरेला २२ फूट उंच चबुतऱ्यावर बांधलेली आहे. चारही कोपऱ्यांवर आठ खांबाचे मंडप आहे. प्रवेशद्वार दक्षिणेकडील भिंतीच्या मध्यभागी आहे. समोरील बागेमुळे संपूर्ण इमारतीचे सौंदर्य खुलून दिसते. ताजमहालच्या मुख्य घुमटाची उंची १८७ फूट आहे. मुख्य घुमटासोबतच इतर चार घुमट आहेत. हे घुमट मुख्य घुमटाचे सौंदर्य वाढवतात. मध्यभागी असलेला मुख्य घुमट जेरुसलेममध्ये बांधलेल्या घुमटासारखाच आहे. घुमटाच्या वरच्या भागावर पर्शियन कलेचा प्रभाव आहे आणि खालचा भाग हिंदू कलेचे प्रतीक आहे. ताजमहालच्या चबुतऱ्याच्या चारही कोपऱ्यांवर १३७ फूट उंच तीन मजली संगमरवरी मिनार आहेत. हे मिनार चारही दिशांना शाहजहान व मुमताजच्या पवित्र प्रेमाचा संदेश देतात.

मुमताजच्या कबरीच्या आतील खोल्यांची रचना हुमायूनच्या कबरीसारखीच आहे. एक अष्टकोनी मध्यवर्ती हॉल आणि इतर खोल्या आहेत. खाली तळघरात कबर आहे. मध्यवर्ती सभामंडपातील काल्पनिक कबर पांढऱ्या संगमरवरानी बनवलेली आहे. कबरीवरील फुले आणि पानांचे नक्षीकाम उत्कृष्ट आहे. या फुलांमध्ये आणि पानांमध्ये मौल्यवान दगडांचा वापर करण्यात आला आहे. दोन्ही कबरी आठ फूट उंच जाळीदार पडद्याने वेढलेल्या आहेत. या संगमरवरी जाळीवर गुलाबाच्या पानांचे नक्षीकाम कलात्मक पद्धतीने केले आहे. संपूर्ण इमारतीमध्ये प्रकाशाची व्यवस्था अतिशय नियोजनबद्ध पद्धतीने करण्यात आली आहे. फ्रेंच प्रवासी ट्रॅव्हेनिअर यांच्या मते, शहाजहानची योजना यमुनेच्या पलीकडे एक काळा ताजमहाल बांधण्याची होती. तो या ताजमहालाला पुलाने जोडला जाणार होता, परंतु त्याच्या मुलांमधील परस्पर युद्धामुळे तो तसे करू शकला नाही. शहाजहानला आपला मकबरा म्हणून दुसरा ताजमहाल बांधायचा होता. परंतु ते शक्य झाले नाही.

आजही ताजमहाल ही जगातील सर्वात सुंदर इमारत आहे. डॉ ईश्वरी प्रसाद ताजमहालची प्रशंसा म्हणतात, 'ताजमहालची कलाकृती आणि सौंदर्य अप्रतिम आहे. त्याचे काव्यात्मक सौंदर्य सर्वत्र विखुरलेले आहे. ताज पहाटे स्वप्नाच्या सावलीने भरलेला दिसतो. एका धुक्याच्या संध्याकाळी, ताज सूर्याच्या सोनेरी किरणांनी सजलेला आणि सोनेरी चमकीने भरलेला दिसतो तसेच पत्नीवरील प्रेमाचा महिमा गाताना दिसतो. हे स्मारक दोन प्रेमिकांच्या खऱ्या प्रेमाचे सर्वोत्तम प्रतीक आहे.'

## २. फतेहपूर सिक्री

फतेहपूर सिक्री हे शहर इ.स. १५७० ते १५८५ या काळात सम्राट अकबराने वसवले. आग्रापासून पश्चिमेला २६ मैलांवर फतेहपूर सिक्री येथे त्यांनी मुघल राजधानीचा पाया घातला. या नवीन राजधानीत अनेक राजवाडे, निवासी इमारती, सरकारी आणि धार्मिक वापरासाठीच्या इमारती इ. बांधल्या. सिक्रीच्या टेकडीवर संत शेख सलीम चिश्ती यांचे वास्तव्य होते. त्यांनी अकबराच्या तीन पुत्रांच्या जन्माची भविष्यवाणी केल्यामुळे बादशहासाठी या शहराचे विशेष महत्व होते. यानंतर इ.स. १५६९ मध्ये, राजकुमार सलीमचा जन्म झाला. इ.स. १५७० मध्ये अकबर त्याच्या यशाच्या शिखरावर होता. गुजरात आणि राजस्थानमध्ये त्यांनी विजय मिळवला. त्यामुळे फतेहपूर सिक्री टेकडीवर बांधलेली राजधानी भाग्यवान असेल असे त्याला वाटले. समकालीन इतिहासकार अबुल फजल आणि मोहम्मद आरिफ कंधारी यांच्या मते, सलीमच्या जन्मानंतर दोन वर्षांनी, इ.स. १५७१ मध्ये फतेहपूर सिक्रीच्या बांधकामाचा आदेश देण्यात आला होता. बदायुनी आणि मोन्सरत सारख्या इतर समकालीनांनी याची पुष्टी केली आहे. बहुतेक समकालीन इतिहासकारांच्या मते, शेख सलीम चिश्ती यांना श्रद्धांजली म्हणून अकबराने फतेहपूर सिक्री शहर वसवले.

फतेहपूर सिक्री हे शहर वसवण्यामागील अकबराचा मुख्य उद्देश सुरक्षितता होता. सिक्री हे त्याकाळी सुरक्षित ठिकाण मानले जात होते. अजमेर आणि आग्रा दरम्यान एक सुरक्षित शहर म्हणून वसलेले होते. येथील इमारती चार भागात विभागल्या जातात.

१. विशाल इमारती    २. निवासस्थाने    ३. कार्यालये    ४. धार्मिक इमारती

### १) दिवाण–ए–खास

सम्राट अकबराच्या वैयक्तिक इमारतींमध्ये ही सर्वात महत्वाची इमारत आहे. वास्तुशास्त्राच्या दृष्टिकोनातून ते उच्च दर्जाचे आहे. ही एक आयताकृती दोन मजली इमारत आहे. येथील खांबावर सुंदर नक्षीकाम आहे. पर्सी ब्राउन यांच्या मते, या इमारतीमध्ये सम्राट अकबर मध्यवर्ती सिहासनावर बसून धार्मिक पंथांच्या प्रतिनिधींमधील वादविवाद ऐकत असतील

### २) दिवाण–ए–आम

फतेहपूर सिक्रीमध्ये, नौबत खानामधून पर्यटक पुढे येतो तेव्हा त्याला समोर दिवाण–ए–आम दिसतो. दिवाण–ए–आमची लांबी ३६५ फूट आहे. समोर एक मोठा चबुतरा असून, तिन्ही बाजूंनी कमानीदार व्हरांडे आहेत. दिवाण–ए–आमचे छत लाल दगडाचे तिरके आहे. अकबर दिवाण–ए–आमच्या मध्यभागी बसून

न्यायदान करीत असे. दिवाण-ए-आमच्या डाव्या बाजूला एक सुंदर कार्यालयीन इमारत आहे, त्यावेळी प्रशासनाशी संबंधित महत्त्वाची कागदपत्रे त्यात ठेवण्यात आली होती.

### ३) जोधाबाई महाल

अकबराने आपली पत्नी जोधाबाईसाठी फतेहपूर सिक्री येथे एक महाल बांधला, त्याला जोधाबाई महाल म्हणतात. या महालाची लांबी २३० फूट आणि रुंदी २१५ फूट आहे. त्याच्या भिंती ३२ फूट उंच आहेत. ही वास्तू स्थापत्य कलेचा अनोखा नमुना आहे. डॉ. आशीर्वादीलाल यांनी फतेहपूर सिक्री येथील इमारतींपैकी एक उच्च दर्जाची इमारत असे वर्णन केले आहे. या महालात प्रवेश करण्यासाठी एकच प्रवेशद्वार आहे. राजवाड्याच्या आत आयताकृती इमारती आहेत, त्यापैकी बहुतेक दुमजली आहेत. राजवाड्याचे चारही कोपरे छोट्या घुमटांनी झाकलेले आहेत. या महालात निळ्या टाइल्सचा सुंदर वापर करण्यात आला आहे.

### ४) तुर्की सुलतानाचा राजवाडा

ही वास्तू कोणासाठी बांधली, याबाबत मतभेद आहेत. पर्सी ब्राउनने याला वास्तुकलेचा हिरा म्हटले आहे. हिन्दाल यांची मुलगी रुकिया बेगम हिच्या स्मरणार्थ हा राजवाडा बांधण्यात आला होता. काहींच्या मते, सलीमा या विधवा महिलेच्या स्मरणार्थ ते बांधण्यात आला. ही इमारत एका मजली आहे. इमारतीच्या भिंतींवर सुंदर चित्रे काढण्यात आली आहेत. त्यामध्ये सिंह, बिबट्या आदी प्राण्यांच्या आकृती कोरल्या आहेत. प्रसिद्ध चित्रकला तज्ज्ञ पर्सी ब्राउन यांच्या मते, हा राजवाडा पंजाबच्या कारागिरांनी बनवला आहे.

### ५) बिरबलाचा वाडा

बिरबल हा अकबराच्या प्रसिद्ध नवरत्नांपैकी एक होता. बिरबलाचे मूळ नाव महेशदास होते. अकबराचा जवळचा मित्र असल्याने त्याच्या कथा जगप्रसिद्ध आहेत. हा राजवाडा इ.स. १५५७ मध्ये बांधण्यात आला होता. राजवाडा दोन मजल्यांचा आहे.

### ६) मरियमचा पॅलेस

ही इमारत जोधाबाई पॅलेसच्या दुसऱ्या बाजूला बांधलेली आहे. मरियम ही अकबराची प्रसिद्ध राजपूत राणी आणि जहांगीरची आई होती. काही इतिहासकारांच्या मते, मरियम ही ख्रिश्चन स्त्री होती, तिच्याशी अकबराने लग्न केले होते. आधुनिक इतिहासकारांच्या मते, मरियम ही जहांगीरच्या आईला दिलेली पदवी होती. ही इमारत बहुमजली असून तिच्या भिंतींवर व खांबांच्या वरच्या बाजूला माकडे, बिबट्या, हत्ती इत्यादींची चित्रे आहेत. राजवाड्याच्या आत लाल आणि निळ्या रंगाच्या मानवी आकृती आहेत.

### ७) बुलंद दरवाजा

फतेहपूर सिक्रीचा बुलंद दरवाजा हा भारतीय वास्तुकलेचा एक प्रसिद्ध नमुना आहे. याचे बांधकाम अकबराने गुजरातमधील विजयाच्या स्मरणार्थ केले. हा दरवाजा अंदाजे १३४ फूट उंच आहे. दरवाजापर्यंत

जाण्यासाठी ४२ फूट लांब पायऱ्या आहेत. रस्त्यापासून दरवाजाची एकूण लांबी १७६ फूट आहे, त्यामध्ये अनेक खोल्या आणि दालन आहेत. हा दरवाजा फारसी कलेचे प्रतीक आहे.

**८) शेख सलीम चिश्ती यांचा दर्गा**

या वास्तूचा पाया अकबराने इ.स. १५७१ मध्ये घातला. प्रसिद्ध चिश्ती संप्रदायातील सुफी संत शेख सलीम यांच्या स्मरणार्थ अकबराने ही प्रसिद्ध कबर बांधली. अकबराचा मुलगा जहांगीरचा जन्म शेख सलीम चिश्ती यांच्या आशीर्वादाने झाला होता, म्हणून अकबराने जहांगीरचे नाव सलीम ठेवले. या वास्तूबद्दल पर्सी ब्राउन आणि स्मिथ म्हणतात,, अकबराने मुळात हि वास्तू लाल वाळूच्या दगडाने बांधली होती, पण नंतर जहांगीर आणि शाहजहानने ती संगमरवरी दगडाने सजवली.

**१.४.२.३ बीबी का मकबरा, औरंगाबाद (महाराष्ट्र)**

मुघल सम्राट औरंगजेब याने औरंगाबाद येथे आपली चौथी बेगम दिलरस बानो (बेगम दिलरसपान) ऊर्फ राबिया दुर्राणी हिची कबर बांधली. राबिया दुर्राणी ही इराणची राजकन्या होती. औरंगजेबाने जेव्हा दक्षिणेवर स्वारी केली होती त्याच वेळी राबिया दुर्राणीचा मृत्यू झाला होता. इ.स. १६७९ मध्ये औरंगजेबाचा राजपुत्र आजमशहा (राबिया दुर्राणीचा पुत्र) याने आपल्या आईच्या स्मरणार्थ औरंगजेबाने बांधलेल्या कबरीवर मकबरा बांधला. हा मकबरा एक ऐतिहासिक वास्तू असून ती 'बीबी का मकबरा' या नावाने ओळखली जाते. बीबी का मकबरा ही वास्तू ताजमहालची प्रतिकृती आहे. त्यामुळे बीबी का मकबऱ्यास 'दक्षिणेचा ताजमहाल' म्हणून ओळखले जाते. परंतु आगऱ्याचा ताजमहाल संगमरवरी दगडांपासून बनविलेला आहे तर औरंगाबाद येथील हा मकबरा पांढऱ्या प्लास्टरचा बनविलेला आहे. ताजमहालच्या बांधकामासाठी दहा करोड रुपये लागले तर बीबी का मकबऱ्याचे बांधकाम पूर्ण होण्यासाठी मात्र ६०,६८०००/- रुपये खर्च झाले. हा मकबरा अत्ताउल्ला आणि हंसपतराय या वास्तुस्थापत्यकारांच्या मार्गदर्शनाखाली बांधण्यात आला. या मकबऱ्याची भव्यता आणि सुंदरता अप्रतिम आहे. मकबऱ्याच्या सभोवती चारही बाजूस दगडाची तटबंदी आहे. दक्षिण तटबंदीच्या मध्यभागी एक भव्य दरवाजा आहे. तेच मुख्य प्रवेशद्वार आहे. मुख्य प्रवेशद्वाराच्या आत एक हौद आहे. त्यामध्ये एक कारंजे आहे. येथून मकबरा अतिशय स्पष्ट आणि आकर्षक दिसतो. मुख्य प्रवेशद्वारापासून पाण्याने भरलेला हौद आहे. त्यामध्येही कारंजे आहेत. रस्त्याच्या दोन्ही बाजूस सरूची झाडे आहेत. सरूच्या झाडांच्या दोन्ही बाजूस प्रवेशद्वारापासून मकबऱ्यापर्यंत लहान भिंत बांधलेली आहे. मकबऱ्याची मुख्य इमारत (वास्तू) एका मोठ्या चबुतऱ्यावर बनविली आहे. मकबऱ्याच्या आत संगमरवरी दगडापासून तयार केलेली एक गॅलरी आहे. येथून कबर पाहता येते. ही कबर अत्यंत साधी असून तिच्या चारही बाजूंनी संगमरवरी जाळ्या बसविलेल्या आहेत. मकबऱ्याचा दरवाजा पितळेच्या पत्र्याने मढविलेला आहे. डाव्या बाजूच्या दरवाजावर अर्थात पितळेच्या पत्र्यावर एक पोपट डाळिंबाचा दाणा चोचीत घेतलेला दाखविण्यात आला आहे. मुस्लिम वास्तूवर शक्यतो अशा प्रतिमा आढळत नाहीत. पूर्व आणि पश्चिम भाग एकसारखा तयार केलेला आहे. छताच्या चोहोबाजूंनी खिडक्या (झरोके) आहेत. त्यामधून कबरीवर दिवसा

सूर्यकिरणे व रात्री चंद्राचा प्रकाश पडतो. पावसाळ्यात पाण्याचे थेंबही पडताना दिसतात. 'बीबी का मकबऱ्याचे उद्यान' हे मोगलकालीन उद्यानांपैकी अद्वितीय आहे

### १.४.२.४ गोलघुमट, विजापूर (कर्नाटक)

'गोलघुमट' ही वास्तू विजापूरचा सुलतान मुहम्मद आदिलशहा (१६२६-१६५६) याने विजापूर येथे बांधलेले स्मारक आहे. या वास्तूचा आराखडा चौकोनी आहे. त्याचे आतील क्षेत्रफळ १७०३.५ चौ. मी. आहे. तळघरात मूळ कबर आहे. या वास्तूच्या जोत्याच्या पातळीवर उपासनेसाठी दुसरी कबर आहे. कबरीच्या पश्चिम बाजूकडील भिंतीत अर्धअष्टकोनाकृती महिरप आहे. तेथून मक्केकडे तोंड करून कुराणाचे वाचन करता येते. वास्तूच्या चारही कोपऱ्यांवर असलेल्या मिनारास आठ मजले आहेत. मिनाराच्या शिरोभागी घुमट आहेत. मिनारच्या प्रत्येक मजल्याला दरवाजा व सज्जे आहेत. गोलघुमटाच्या बांधकाम शैलीवर विजयनगर शैलीचा प्रभाव पडलेला आहे तर कमानरचनेवर पर्शियन वास्तुशैलीचा प्रभाव जाणवतो. हा गोलघुमट प्रतिध्वनींच्या आवाजासाठी प्रसिद्ध आहे. या घुमटात उभे राहून शब्द उच्चारल्यास त्याचे दहा वेळा प्रतिध्वनी ऐकू येतात. त्यामुळेच त्यास बोलणारा घुमट म्हणून 'बोलघुमट' सुद्धा म्हणतात.

### १.४.२.५ विवेकानंद रॉक मेमोरियल, कन्याकुमारी

हे स्मारक तामिळनाडू राज्यातील कन्याकुमारी शहरामध्ये आहे. हे एक प्रसिद्ध पर्यटन स्थळ आहे. येथे समुद्रात एक मोठा खडक आहे. इ.स. १८९२ मध्ये जेव्हा स्वामी विवेकानंद कन्याकुमारीला आले होते तेव्हा पोहत ते या विशाल खडकापर्यंत पोहोचले. त्यांनी या निर्जन खडकावर ध्यान केले. या ठिकाणी त्यांना जीवनाचे ध्येय आणि ध्येय गाठण्यासाठी मार्ग याची ज्ञानप्राप्ती झाली. विवेकानंदांना मिळालेल्या दिव्य ज्ञानाचा लाभ संपूर्ण जगाला झाला. काही काळानंतर ते शिकागोला जागतिक धर्म परिषदेत सहभागी होण्यासाठी गेले. तेथे त्यांनी जागतिक धर्म परिषदेत भाग घेतला. व भारताचे नाव उंचावले. अशाप्रकारे या खडकावर मिळालेल्या ईश्वरी ज्ञानाने त्यांना प्रसिद्धी तर दिलीच पण संपूर्ण जगात भारताला एक वेगळी ओळख दिली.

स्वातंत्र्यानंतर, विवेकानंदांच्या अमर संदेशांना रूप देण्यासाठी, इ.स. १९७० मध्ये या विशाल खडकावर एक भव्य स्मारक इमारत बांधण्यात आले. या स्मारकाला विवेकानंद रॉक मेमोरियल म्हणतात. समुद्राच्या लाटांनी वेढलेल्या या खडकापर्यंत पोहोचणे हा एक वेगळाच अनुभव असतो. या स्मारकाचा मुख्य दरवाजा अतिशय सुंदर आहे. भारतीय संस्कृतीचे प्रतीक असलेल्या अजिंठा-वेरूळच्या लेण्यांमधून त्याची वास्तुशिल्प घेण्यात आली आहे. या स्मारकावर सुमारे ७० फूट उंच घुमट बांधला आहे. स्मारकाच्या आत, स्वामी विवेकानंदांचा चार फूट उंच चबुतऱ्यावर एक शक्तिशाली पुतळा स्थापित केला आहे. ही मूर्ती ब्राँझची असून, त्याची उंची साडेआठ फूट आहे. हा पुतळा इतका आकर्षक आणि भव्य आहे. त्यामध्ये विवेकानंदांचे व्यक्तिमत्व जिवंत दिसते.

### १.४.२.६ गोव्यातील चर्च

गोव्यातील पर्यटन स्थळांमध्ये १६ व्या शतकात बांधलेली चर्च महत्त्वाची आहेत. पणजी-फोंडा या मुख्य रस्त्यावर चर्च बांधण्यात आली आहेत. गोव्यातील प्रसिद्ध पर्यटन स्थळांमध्ये येथे बांधलेली गॉथिक शैलीतील चर्च प्रमुख आहेत. चर्चच्या बांधकामात लॅटराइट दगडांचा वापर करण्यात आला आहे. या गोव्यातील खालील चर्च प्रसिद्ध आहेत-

**१) कॅथेड्रल चर्च**

हे प्रसिद्ध चर्च इ.स. १६१९ मध्ये बांधले आहे. हे चर्च सेंट कॅथरीनला समर्पित आशियातील सर्वात मोठ्या चर्चपैकी एक आहे. सुमारे ८० वर्षांत या चर्चचे बांधकाम पूर्ण झाले. मुस्लिम शासकांवर पोर्तुगीजांनी विजय मिळवला याच्या स्मरणार्थ हे चर्च बांधले आहे. पोर्तुगीजांनी हे चर्च अतिशय सुंदर आणि संरचनात्मक पद्धतीने बांधले आहे.

**२) बोम जीजस बॅसिलिका चर्च**

इ.स. १६०५ मध्ये जुन्या गोवा शहरात मांडवी नदीच्या काठावर हे चर्च बांधले गेले. याचे पणजीपासून अंतर १० किलोमीटर आहे. हे चर्च त्याच्या अनोख्या आणि गुंतागुंतीच्या वास्तुकलेसाठी प्रसिद्ध आहे.

**३) रॅचोल सेमिनरी चर्च**

गोव्यापासून १२ किमी अंतरावर झुआरी नदीच्या काठावर हे चर्च आहे. मुस्लिम स्मशानभूमीला लागून आहे.

**४) चर्च ऑफ अवर लेडी**

चर्च ऑफ अवर लेडी हे गोव्यातील सर्वात जुन्या चर्चपैकी एक मानले जाते. या चर्चला गोव्याची राजधानी पणजीचे हृदय देखील म्हटले जाते. या चर्चच्या टॉवरवर मदर मेरीची मूर्ती बसवण्यात आली आहे. हे चर्च सुमारे ४५० वर्षे जुने आहे. याचे खूप चांगले जतन केले गेले आहे. मुळात हे चर्च नाविकांच्या स्वागतासाठी बांधण्यात आले होते.

**५) सेंट कोटेजन चर्च**

इ.स. १७ व्या शतकात काही ग्रीक आणि इटालियन व्यापाऱ्यांनी सेंट कोटेजन चर्च बांधले होते. या चर्चवर युरोपीयन स्थापत्यकलेचा प्रभाव आहे. हे चर्च गोव्यातील सर्वात सुंदर चर्चपैकी एक आहे. या चर्चच्या बांधकामात कोरिंथियन आणि गॉथिक स्थापत्य शैलीचा प्रभाव आहे. त्याचे प्राचीन पांढरे प्रवेशद्वार आणि आयताकृती टॉवर्स आपल्याला मूळ युरोपियन वास्तुकलेची आठवण करून देतात. हे इटलीच्या सेंट पीटर चर्चच्या आधारावर बांधण्यात आले आहे. गोव्यात येणारे बहुतांश पर्यटक हे चर्च पाहण्यास येतात.

अशा प्रकारे भारतामध्ये प्राचीन, मध्ययुगीन व आधुनिक काळातील अनेक ऐतिहासिक स्मारके आहेत. अशी ऐतिहासिक स्मारके पर्यटकाचे आकर्षण असते.

### १.४.३ ऐतिहासिक संग्रहालये

संग्रहालये ऐतिहासिक व प्राचीन संस्कृतीचे जतन करण्याचे काम करतात. राष्ट्रीय दर्जाची वस्तुसंग्रहालये बहुउद्देशी असतात. संग्रहालयाला जेव्हा लोक भेट देतात तेव्हा त्यांना देशाच्या सांस्कृतिक, आध्यात्मिक भावनेचे शिक्षण मिळते व त्याचबरोबर त्यांचे मनोरंजनही होते. या संग्रहालयात पुढीलप्रमाणे वेगवेगळे विभाग असतात.

कला विभाग, पुरातत्व विभाग, नैसर्गिक इतिहास विभाग, आधुनिक इतिहास विभाग, आर्थिक विभाग, भूशास्त्र विभाग, वनस्पतिशास्त्र विभाग, मानववंशशास्त्र विभाग, अभियांत्रिकी विभाग, औषधशास्त्र विभाग, विज्ञान विभाग, मध्य आशियायी कलाकृतीचा विभाग इत्यादी अभ्यासाच्या विभागांचा अंतर्भाव असतो. भारतातील राष्ट्रीय दर्जाची वस्तुसंग्रहालये पुढीलप्रमाणे आहेत.

#### १.४.३.१ भारतीय वस्तुसंग्रहालय, कलकत्ता (१९१४)

इ. स. १९१४ मध्ये स्थापन झालेले भारतातील सर्वात पहिले वस्तुसंग्रहालय म्हणजे कलकत्ता येथील भारतीय वस्तुसंग्रहालय होय. या संग्रहालयात पुरातत्वीय आणि ऐतिहासिक वस्तूंचा सर्वांत मोठा संग्रह करण्यात आला आहे. यात भारतातील पाषाणयुगीन हत्यारे, ताम्रयुगीन हत्यारे, महापाषाणयुगीन कलावस्तू, गांधार शैलीतील कलावस्तू इत्यादींचा संग्रह करण्यात आला आहे. या संग्रहालयात पुढीलप्रमाणे विविध विभाग आहेत :

१. पुरातत्व विभाग, २. कला विभाग, ३. मानववंशशास्त्र विभाग,

४. भूगर्भशास्त्र विभाग, ५. औद्योगिक विभाग,६. प्राणिशास्त्र विभाग.

या संग्रहालयाची इमारत भव्य आहे. ३०० फुटांचे भव्य प्रांगण आहे. हे वस्तुसंग्रहालय देशातील एक उत्कृष्ट वस्तुसंग्रहालय आहे.

#### १.४.३.२ भारताचे राष्ट्रीय संग्रहालय, दिल्ली (इ.स. १९४९)

दिल्ली येथील हे राष्ट्रीय संग्रहालय संपूर्ण भारताचे भूषण आहे. येथे भारतातील पाच हजार वर्षांच्या कलाविषयक, सांस्कृतिक व समृद्ध इतिहासाचा ठेवा जपून ठेवलेला आहे. येथे भारतामधील व परदेशातील दोन लाखांहून अधिक वस्तूंचा संग्रह करण्यात आला आहे. वस्तूंची मांडणी शास्त्रशुद्ध व आकर्षक पद्धतीने केली आहे. त्यात प्रामुख्याने हडप्पा, मोहेंजोदडो, अमरीनाल इ. ठिकाणी उत्खननात मिळालेल्या अवशेषांचा समावेश आहे. त्याचप्रमाणे चित्रकला, भित्तिचित्रे, ब्राँझचे पुतळे, वस्त्रांचे नमुने, जुनी हस्तलिखिते या सर्वांचा संग्रह करण्यात आला आहे. यात काही अप्रतिम पुतळ्यांचाही संग्रह आहे. त्यात बुद्धाचा उभा पुतळा, स्नान करीत असलेल्या स्त्रीचा पुतळा, नृत्यांगनेचा पुतळा, विद्यारण्य युगुलाचे शिल्प इत्यादींचा समावेश आहे. या संग्रहालयात पुढीलप्रमाणे विभाग आहेत :

१. मानववंशशास्त्र विभाग,        २. वस्त्र विभाग,        ३. चित्र विभाग,

४. दुर्मिळ कलाकृतीचा विभाग,  ५. शिल्पकला विभाग,

**६.  शस्त्रास्त्र विभ**

या सर्व विभागांत शास्त्रशुद्धरीत्या वस्तूंचे जतन व उत्तम रीतीने प्रदर्शन करण्यात आले आहे.

**१.४.३.३ द प्रिन्स ऑफ वेल्स म्युझियम, मुंबई (१९२७)**

भारतामधील आणखी एक राष्ट्रीय दर्जाचे संग्रहालय म्हणजे द प्रिन्स ऑफ वेल्स म्युझियम, मुंबई होय. इ. स. १९०५ मध्ये इंग्लंडचा राजा प्रिन्स ऑफ वेल्स भारताला भेट देण्यासाठी आला होता. या भेटीची स्मृती म्हणून इ.स. १९२७ मध्ये प्रिन्स ऑफ वेल्स म्युझियम उभारले गेले. या संग्रहालयाची इमारत अत्यंत भव्य आहे. इमारतीमध्ये मुघल व ब्रिटिश वास्तुकलेचा संगम झालेला आहे. या संग्रहालयात भारतीय कलेचा ५००० वर्षांचा इतिहास संग्रहित करण्यात आला आहे.

या संग्रहालयात १. नॅचरल हिस्ट्री विभाग, २. भारतीय सूक्ष्मचित्रांचा विभाग, ३. नेपाळी आणि तिबेटी कलादालन विभाग, ४. युरोपियन चित्रकला विभाग, ५. युरोपियन शस्त्रागार विभाग, ६. युरोपियन वस्त्रकला विभाग, ७. मोगल कला विभाग, ८. प्रागैतिहासिक दालन विभाग, ९. चित्रांचे दालन विभाग इत्यादी विभाग असून, या सर्व विभागांत वस्तूंचे शास्त्रशुद्धरीत्या जतन व प्रदर्शन करण्यात आले आहे.

**१.४.३.४ द सालारजंग म्युझियम, हैदराबाद (१९५७)**

भारतातील हे राष्ट्रीय संग्रहालय जगप्रसिद्ध आहे. या वस्तुसंग्रहालयात भारतीय वस्त्रकला, लाकूडकाम, ब्राँझमधील वस्तू, मौल्यवान खड्यांमधील वस्तू, शस्त्रे, भारतीय चित्रकला, युरोपमधील चित्रकला, मूर्तिकला व चित्रे, चीन व जपानमधील कला दर्शविणाऱ्या वस्तू येथे मोठ्या प्रमाणात आहेत. या संग्रहालयात उत्कृष्ट व दुर्मिळ अशा कलाकृतींचा संग्रह ठेवण्यात आला आहे. या संग्रहालयामध्ये असलेल्या वैशिष्ट्यपूर्ण विशिष्ट प्रांतातील वस्तूंच्या संग्रहावरून ही संग्रहालये राष्ट्रीय दर्जाची प्रांतिक संग्रहालये म्हणून ओळखली जातात.

**१.४.३.५ रेल्वे म्युझियम दिल्ली**

दिल्ली येथील हे संग्रहालय भारतातील एकमेव असे रेल्वेविषयक संग्रहालय आहे. हे संग्रहालय रेल्वे मंत्रालयाकडून चालविले जाते. त्यात वाफेची इंजिने, स्वयंचलित इंजिने, रेल्वेमधील शाही डबे, रेल्वेचे सिग्नल, रूळ इत्यादीविषयी मॉडेल्स आणि छायाचित्रे आहेत. संग्रहालयात रेल्वेचा इतिहास व उत्क्रांती येथे पाहावयास मिळते.

**१.४.३.६ हस्तकला संग्रहालय, दिल्ली**

हे संग्रहालय दिल्ली येथील प्रगती मैदान या विभागात आहे. हे संग्रहालय खादी व ग्रामोद्योगाकडून चालविले जाते. येथे हस्तकला, लाकूडकाम, कला इत्यादींचे संग्रहालय आहे.

### १.४.३.७ कॅलिको म्युझियम

अहमदाबाद येथील कॅलिको म्युझियम एक खाजगी संग्रहालय असले तरी हे संग्रहालय राष्ट्रीय दर्जाचे आहे. वेगवेगळ्या खंडांतील भारतीय इतिहासाचे स्वरूप समजावून सांगणारे अमूल्य प्रदर्शन येथे आहे. वस्त्रविषयक, धातूच्या वस्तू, स्वयंपाकातील भांडी, तांब्याची, पितळेची, लोखंडी भांडी इत्यादी वस्तूंचा संग्रह यामध्ये आढळतो.

### सारांश

मानवी जीवनामध्ये पर्यटनाला अनन्यसाधारण महत्व आहे. एका ठिकाणाहून दुसऱ्या ठिकाणी विशिष्ट हेतूने केलेल्या प्रवासाला पर्यटन म्हटले जाते. आनंद, मनोरंजन, व्यवसाय, अभ्यास, संशोधन इ. कारणांसाठी स्थानिक पर्यटनाबरोबरच राष्ट्रीय व आंतरराष्ट्रीय पर्यटन केले जाते. व्यापाराच्या निमित्ताने पर्यटनाची सुरवात झाली पण आज नवनवीन शोध व तंत्रज्ञानामुळे पर्यटनाचे उद्देश बदलले. पर्यटक सर्वाधिक ऐतिहासिक स्थळांना भेटी देतात. ऐतिहासिक पर्यटनामुळे देशाची संस्कृती व परंपरेचा वारसा जपला जातो. ऐतिहासिक पर्यटनामध्ये प्रामुख्याने ऐतिहासिक स्थळे, स्मारके व संग्रहालायचा समावेश होतो. भारताला ऐतिहासिक परंपरा असल्यामुळे उत्तर व दक्षिण भारतातील अनेक ऐतिहासिक पर्यटन स्थळे प्रसिद्ध आहेत. तसेच दिल्ली, आग्रा, विजापूर, औरंगाबाद, गोवा येथील ऐतिहासिक स्मारके पर्यटनाची महत्वाची केंद्रे बनली आहेत. ऐतिहासिक पर्यटनामध्ये वस्तुसंग्रहालाये महत्वाची भूमिका बजावतात. भारतातील भारतीय वस्तुसंग्रहालय, कलकत्ता, राष्ट्रीय संग्रहालय, दिल्ली, द प्रिन्स ऑफ वेल्स, मुंबई, द सालारजंग वस्तुसंग्रहालय, हैद्राबाद इ. वस्तुसंग्रहालयांना पर्यटक मोठ्या प्रमाणात भेटी देतात. त्यामुळे पर्यटन उद्योगामध्ये ऐतिहासिक पर्यटनाला महत्वाचे स्थान आहे.

### स्वयं अध्ययनासाठी प्रश्न :

अ) योग्य पर्याय निवडून विधाने पुन्हा लिहा.

१) रायगड किल्ल्याची बांधकामे ,……यांनी केली..

अ) आबाजी सोनदेव ब) शिवा काशीद क) तानाजी मालुसुरे ड) बहिर्जी नाईक

२) धातूची बिजली तोफ ………..येथे आहे.

अ) ग्वालेर ब) उदयपुर क) झांसी ड) चितोडगड

३) ……शहराला तलावांचे शहर म्हणतात.

अ) दिल्ली ब) उदयपुर क) जोधपुर ड) मुंबई

४) गुलाबी शहर म्हणून ……….शहराला ओळखले जाते.

अ) जयपूर ब) उदयपुर क) नागपूर ड) हैद्राबाद

५) हैद्राबाद हे शहर ……….नदीच्या काठी वसले आहे.

अ) तापी ब) मुसी क) वेण्णा ड) गंगा

६) विजयनगर राज्याची राजधानी ........होती.

अ) हम्पी ब) अहमदनगर क) हैद्राबाद ड) विजापूर

७) चारमिनार हि वास्तू ..........येथे आहे.

अ) जयपूर ब) हैद्राबाद क) नागपूर ड) दिल्ली

८) कुतुबमिनार हि वास्तू ..........येथे आहे.

अ) दिल्ली ब) सिकंदराबाद क) आग्रा ड) जयपूर

९) लाल किल्ला ..........यांनी बांधला.

अ) हुमायून ब) अकबर क) जहांगीर ड) शहाजान

१०) भारतातील सर्वात मोठी मशीद .........येथे आहे.

अ) बेगलोर ब) काश्मीर क) आग्रा ड) दिल्ली

११) ताजमहाल .............नदीच्या काठी आहे.

अ) गंगा ब) यमुना क) कावेरी ड) कृष्णा

१२) फतेहपुर सिक्री हे शहर .......यांनी वसवले.

अ) अकबर ब) हुमायून क) शहाजान ड) जहांगीर

१३) बीबी का मखबरा हि वास्तू .............येथे आहे.

अ) औरंगाबाद ब) महाड क) नांदेड ड) विजापूर

१४) विवेकानंद रॉक मेमोरिअल ............येथे आहे.

अ) बेळगाव ब) दिल्ली क) कन्याकुमारी ड) कलकत्ता

१५) भारतात स्थापन झालेले पहिले वस्तुसंग्रहालय .....येथे स्थापन झाले.

अ) कलकत्ता ब) दिल्ली क) मुंबई ड) बेंगलोर

१६) सालारजंग हे राष्ट्रीय म्युझियम .............येथे आहे.

अ) हैद्राबाद ब) विजापूर क) मुंबई ड) दिल्ली

ब) जोड्या जुळवा

| | |
|---|---|
| १. राष्ट्रीय संग्रहालय | अ) दिल्ली |
| २. भारतीय संग्रहालय | ब) कलकत्ता |
| ३. प्रिन्स ऑफ वेल्स | क) अहमदाबाद |
| ४. कॅलीको म्युझियम | ड) मुंबई |

क) योग्य विधान निवडा

विधान १ गोव्यातील चर्च गॉथिक शैलीत बांधलेली आहेत.

विधान २ ग्रीक व इटालियन व्यापाऱ्यांनी गोव्यामध्ये सेंट कोतेजन चर्च बांधले.

अ) फक्त १ बरोबर

ब) फक्त २ बरोबर

क) दोन्ही विधाने बरोबर

ड) दोन्ही विधाने चूक

ड) सविस्तर उत्तरे लिहा.

१. पर्यटनाच्या व्याख्या सांगून पर्यटकांचे प्रकार स्पष्ट करा.

२. ऐतिहासिक पर्यटनाचे स्वरूप व व्याप्ती सांगा.

३. भारतातील प्रमुख ऐतिहासिक स्थळांची माहिती द्या.

४. दिल्ली येथील ऐतिहासिक स्मारकांची माहिती द्या.

५. आग्रा येथील ऐतिहासिक स्मारकांचे महत्व स्पष्ट करा.

६. भारतातील ऐतिहासिक संग्रहालयाचे महत्व स्पष्ट करा.

इ) टिपा लिहा

१. ऐतिहसिक पर्यटन अर्थ

२. लाल किल्ला

३. ताजमहल

४. फतेहपुर सिक्री

५. बीबी का मखबरा

६. गोव्यातील चर्च

७. प्रिन्स ऑफ वेल्स संग्रहालय

**४.२ उत्तरे**

अ) योग्य पर्याय निवडून विधाने पुन्हा लिहा.

१) लॅटिन २) सामीप्य स्थानी ३) हौशी

ब) जोड्या जुळवा

१. राष्ट्रीय पर्यटक ब) देशांतर्गत पर्यटन

२. आंतरराष्ट्रीय पर्यटक अ) देशाच्या सिमेबाहेरील पर्यटन

३. सामिप्य स्थानी पर्यटक — ड) जवळपास आजूबाजूच्या परिसरात पर्यटन

४. प्रादेशिक खंडांतर्गत पर्यटक — क) दुसऱ्या खंडामध्ये केलेले पर्यटन

क) योग्य विधान निवडा

अ) फक्त १ बरोबर

**४.३ उत्तरे**

अ) योग्य पर्याय निवडून विधाने पुन्हा लिहा.

१) शुल्गी २) फोअनेशियन ३) रोमन ४) मॅचेस्टर ५) इटली

ब) जोड्या जुळवा

| | |
|---|---|
| १. होमर ओडीशी | ब) ग्रीक |
| २. मार्कोपोलो | अ) व्हेनिस |
| ३. बंकिमहॅम पॅलेस | ड) इंग्लंड |
| ४. गड किल्ले | क) ऐतिहासिक पर्यटन |

क) योग्य विधान निवडा

क) दोन्ही विधाने बरोबर

**४.४ उत्तरे**

अ) योग्य पर्याय निवडून विधाने पुन्हा लिहा.

| | | | |
|---|---|---|---|
| १. आबाजी सोनदेव | २. झांसी | ३. उदयपुर | ४. जयपूर |
| ५. मुसी | ६. हम्पी | ७. हैद्राबाद | ८. दिल्ली |
| ९. शहाजान | १०. दिल्ली | ११. यमुना | १२. अकबर |
| १३. औरंगाबाद | १४. कन्याकुमारी | १५. कलकत्ता | १६. हैद्राबाद |

ब) जोड्या जुळवा

| | |
|---|---|
| १. राष्ट्रीय संग्रहालय | ब) कलकत्ता |
| २. भारतीय संग्रहालय | अ) दिल्ली |
| ३. प्रिन्स ऑफ वेल्स | ड) मुंबई |
| ४. कॅलीकोम्युझियम | क) अहमदाबाद |

क) योग्य विधान निवडा

क) दोन्ही विधाने बरोबर

**संदर्भ**


- Choudhary Vikas, Educational Tourism, Centrum Press, New Delhi, 2010
- Gupta K. R., Concise Encyclopedia of India-Places of Historical and tourist Interest, Atlantic Publication, New Delhi, 2010
- Eric Zuelow, James Kevin (ed.), History of Tourism and Travel, Oxford University Press, New Delhi, 2022
- Sing S. P., Travel and Tourism Management, ABD Publisher, Delhi, 2006
- Negi Jagmohan, Travel Agency and Tour Operations, Kanishka Publishers, New Delhi, 2006
- Bob Brotherton and Roy c Wood (ed), Hospitality Management, Sage publication, New Delhi, 2008
- रावत शिवचंद (डॉ), उनियाल मनोज (डॉ), ऐतिहासिक पर्यटन, ज्ञानभारती प्रकाशन, दिल्ली,२०१९
- कठारे अनिल, प्रेमसागर पंकजकुमार, भारतातील प्रवास आणि पर्यटन, प्रशांत प्रकाशन, जळगाव, २०२०
- पाटील संभाजी, भारतातील पर्यटन स्थळे, प्रशांत पब्लिकेशन, जळगाव, २०१६
- कठारे (डॉ), साखरे (डॉ) व पाटील (डॉ), पुरात्त्वाविद्या, वस्तुसंग्रहालय शास्त्र आणि पर्यटन, विद्या बुक प्रकाशन, औरंगाबाद, २०११
- महाजन, व्ही.डी., प्राचीन भारत, एस.चंद अँड कंपनी, नवी दिल्ली, २०१६.
- गुप्ता, आर.के., मध्ययुगीन समाज, धर्म, कला आणि वास्तुकला, पॉइंटर पब्लिशर्स, जयपूर, २००४.
- खुराना, के.एल., मध्ययुगीन भारतीय संस्कृती, लक्ष्मी नारायण अग्रवाल, आग्रा, २००९.


❑❑❑

## घटक २
## ऐतिहासिक पर्यटनासाठी स्थळांचे महत्त्व
## (Places Important for Historical Tourism)

**अनुक्रमणिका**

२.० उद्दिष्टे

२.१ प्रास्ताविक

२.२ विषय विवेचन

२.२.१ सातारा विभाग : सातारा, औंध, शिखर शिंगणापूर

२.२.२ कोल्हापूर विभाग : कोल्हापूर, पन्हाळा, ज्योतिबा

२.२.३ पुणे विभाग : पुणे, कार्ले लेणी, जेजुरी

२.३ परिभाषिक शब्द शब्दार्थ

२.४ स्वयं अध्ययन प्रश्नांची उत्तरे

२.५ सारांश

२.६ सरावासाठी स्वाध्याय

२.७ संदर्भ ग्रंथ अधिक वाचनासाठी पुस्तके

### २.० उद्दिष्टे

१. ऐतिहासिक पर्यटन संकल्पनेचा परिचय होईल.

२. ऐतिहासिक सातारा नगरीचे महत्त्व जाणून घेता येईल.

३. ऐतिहासिक औंध व शिखर शिंगणापूर या प्रसिद्ध स्थची माहिती होईल.

४. ऐतिहासिक कोल्हापूर नगरीचे महत्त्व जाणून घेता येईल.

५. ऐतिहासिक पन्हाळगड व ज्योतिबा या प्रसिद्ध स्थळाची माहिती होईल.

६. ऐतिहासिक सातारा नगरीचे महत्त्व जाणून घेता येईल.

७. कार्ले येथील लेण्या व जेजुरी या प्रसिद्ध स्थळाची माहिती होईल.

## २.१ प्रस्तावना

प्राचीन काळापासूनच पर्यटन हा मानवी जीवनाचा एक अविभाज्य घटक आहे. प्रत्येक माणूस आपल्या जीवनात विविध कारणांसाठी पर्यटन करत असतो. जसे की, ऐतिहासिक पर्यटन, धार्मिक पर्यटन, सांस्कृतिक पर्यटन, निसर्ग पर्यटन, सागरी पर्यटन, कृषी पर्यटन इत्यादी. यापैकी ऐतिहासिक पर्यटन हा सर्वात लोकप्रिय प्रकार असून मानवाचे ऐतिहासिक पर्यटनाशी अतूट नाते निर्माण झाले आहे. करण ऐतिहासिक पर्यटनामध्ये ऐतिहासिक घटना, स्मारके, स्थळे, किल्ले, मंदिरे, ऐतिहासिक शहरे, लेणी यासारख्या विविध स्थळांना भेटी देण्याच्या ज्ञानलालसेतून ऐतिहासिक पर्यटन हे आधुनिक कालखंडात अधिकच महत्त्वाचे मानले जाते. भारताला व महाराष्ट्राला तर प्रदीर्घ अशी ऐतिहासिक व सांस्कृतिक परंपरा लाभली आहे. त्यातूनच अनेक ऐतिहासिक व सांस्कृतिक स्थळे पर्यटन केंद्रे म्हणून प्रसिद्धीस आली आहेत. ती पर्यटन स्थळे जगभरातील पर्यटकांना आपल्याकडे आकर्षित करतात. महाराष्ट्राच्या संदर्भात विचार करता महाराष्ट्र ही ऐतिहासिक पर्यटनाची भूमी म्हणून ही ओळखली जाते. कारण महाराष्ट्रात अशी असंख्य ऐतिहासिक, धार्मिक व सांस्कृतिक पर्यटनाची स्थळे आहेत की, ज्यांना मोठ्या प्रमाणात पर्यटक भेट देतात. यामध्ये विद्येचे माहेरघर म्हणून ओळखले जाणारे पुणे, मराठी सत्तेची राजधानी म्हणून ओळखले जाणारे सातारा आणि राजर्षी छत्रपती शाहू महाराजांचे पुरोगामी संस्थान म्हणून ओळखले जाणारे कोल्हापूर या विभागांना विशेष महत्त्वाचे स्थान आहे. या विभागातील अनेक किल्ले, मंदिरे, लेण्या, शहरे, संग्रहालय, स्मारके आपल्या पूर्वजांनी गाजवलेल्या कर्तुत्वाची, पराक्रमाची आणि कार्याचे साक्ष देतात. म्हणूनच आपण सदरच्या प्रकरणात ऐतिहासिक पर्यटनासाठी महत्त्वाचे असणारे कोल्हापूर, सातारा आणि पुणे विभाग व त्या विभागातील महत्त्वाची ऐतिहासिक पर्यटन स्थळे यावर प्रकाश टाकणार आहोत.

## २.२ विषय विवेचन

पर्यटन हा मानवाच्या वेगवेगळ्या ठिकाणी होणारा हेतूपूर्वक प्रवास असतो. अलीकडच्या काळात तर पर्यटनाला अधिकच महत्त्व प्राप्त झाले असून त्याचा विकासही अत्यंत वेगाने होत आहे. वाढते नागरिकीकरण, औद्योगीकरण, राहणीमान, शिक्षणाचा प्रसार, व्यापार इत्यादी उद्योगांच्या विकासामुळे पर्यटनाला अधिकच चालना मिळाली आहे. दळणवळणातील सुलभता, पर्यटनाला मिळणारी व्यापक प्रसिद्धी आणि मुख्यता लोकांमध्ये पर्यटना बद्दलची वाढती आवड यामुळे आज पर्यटन हा जागतिक स्तरावरील एक महत्त्वाचा व्यवसाय बनलेला आहे. पर्यटन (Tourism) ही संज्ञा प्रवास (Tour) या शब्दाशी संबंधित असून हा शब्द लॅटिन भाषेतील ढजठछजड या शब्दापासून आलेला आहे. याचा मूळ अर्थ वर्तुळ असा असून पुढे वर्तुळाकार प्रवास असा शब्द रूढ झाला.या शिवाय टूर्स (Tours) या शब्दाची आणखी एक उत्पत्ती असून हा शब्द हिबरू भाषेतील ढीरह या शब्दापासून आलेला असून त्याचा अर्थ शोध घेणे असा होतो. सर्वसाधारणपणे ऐतिहासिक पर्यटन म्हणजे मानवाने ऐतिहासिक हेतूने एका ठिकाणावरून दुसऱ्या ठिकाणी केलेला प्रवास किंवा भ्रमंती होय. पर्यटनामध्ये जसे पर्यटक व पर्यटन स्थळ महत्त्वाचे असते तसे ऐतिहासिक पर्यटनांमध्ये पर्यटक व ऐतिहासिक स्थळ/ठिकाण महत्त्वाचे असते. महाराष्ट्राला इतिहासाची समृद्ध व उज्वल

परंपरा लाभली असल्याने महाराष्ट्रातील ऐतिहासिक घटना, ऐतिहासिक घटक, ऐतिहासिक ठिकाणे, ऐतिहासिक स्मारके, याचे लोकांना मोठे कुतूहल असल्याने पर्यटक मोठ्या प्रमाणात ऐतिहासिक स्थळांना भेटी देतात. एका सर्वेक्षणानुसार आपल्या देशात येणाऱ्या एकूण परदेशी पर्यटकांपैकी सुमारे ५४% पर्यटकांना ऐतिहासिक पर्यटनात रस असल्याचे दिसून येते. यावरून ऐतिहासिक पर्यटनाचे महत्त्व लक्षात येते

महाराष्ट्रातील ऐतिहासिक पर्यटनाच्या अनुषंगाने विचार करत असताना असंख्य ठिकाणांना पर्यटन स्थळ म्हणून विशेष महत्त्व आहे. यामध्ये सातारा, कोल्हापूर आणि पुणे या महत्त्वपूर्ण विभागांचा समावेश होतो. पैकी सातारा (सर्किट) विभागामध्ये सातारा नगरी छत्रपती शिवरायांच्या पदस्पर्शाने व पराक्रमाने पुनीत झालेली असून पुढे मराठी सत्तेची ऐतिहासिक राजधानी राहिलेली आहे. त्यामुळे सातारा शहर हे वर्तमान काळातील ऐतिहासिक पर्यटन केंद्र म्हणून ओळखले जाते. याशिवाय पंतप्रतिनिधी यांच्या अधिपत्याखाली उदयास आलेले औंध संस्थान सुद्धा एक सुप्रसिद्ध पर्यटन केंद्र म्हणून प्रसिद्ध झाले आहे. शिखर शिंगणापूर या मंदिराकडे महाराष्ट्रातील प्रसिद्ध तीर्थक्षेत्र  व श्रद्धेचे, भक्तीचे स्थान म्हणून पाहिले जाते. कोल्हापूर (सर्किट) विभागामध्ये कोल्हापूर ही एक ऐतिहासिक नगरी असून राजर्षी छत्रपती शाहू महाराजांच्या पुरोगामी विचारांची व लोककल्याणकारी राज्यकारभाराची पुण्यभूमी असल्याने तसेच करवीर निवासिनी महालक्ष्मी मंदिरामुळे कोल्हापूर हे एक ऐतिहासिक पर्यटनाचे सुप्रसिद्ध केंद्र म्हणून प्रसिद्ध झाले आहे. शिवाय मराठी सत्तेच्या वाटचालीतील अनेक घटनांचा प्रत्यक्ष साक्षीदार असणारा ऐतिहासिक पन्हाळा किल्ला पर्यटकांचे आजही लक्ष वेधून घेत आहे. याचबरोबर डोंगर माथ्यावर स्थापत्य कलेचा उत्कृष्ट नमुना असलेल्या ज्योतिबा मंदिरामुळे कोल्हापूरला पवित्र धार्मिक स्थळाचे महत्त्वही प्राप्त झाले आहे. पुणे (सर्किट) विभागाचा विचार करताना पुणे ही मराठी सत्तेची ऐतिहासिक राजधानी तर होतीच पण तिला आज विद्येचे माहेरघर म्हणूनही ओळखले जाते. महाराष्ट्राला लाभलेल्या एकूण लेणी समूहांपैकी पुणे विभागात असणारी कार्ले लेणी समूह ऐतिहासिक दृष्ट्या अतिशय महत्त्वाचा मानला जातो. तर उंच डोंगरावर असणाऱ्या ऐतिहासिक खंडोबाच्या मंदिरामुळे जेजुरी हे ठिकाण महाराष्ट्रातील पवित्र धार्मिक व ऐतिहासिक स्थळ म्हणून प्रसिद्धीस आलेले आहे.

### २.२.१ सातारा सर्किट (विभाग)

महाराष्ट्रातील सातारा जिल्ह्यास मोठी ऐतिहासिक पार्श्वभूमी लाभलेली आहे. ऐतिहासिक पर्यटनाच्या दृष्टिकोनातून तर सातारा जिल्ह्यास विशेष महत्त्व आहे. कारण प्राचीन काळापासून साताऱ्या वर विविध राजवटींनी राज्य केले. त्यांच्या कालखंडातील ऐतिहासिक वारसा सांगणारी अनेक पर्यटन स्थळे तेथे आजही पहावयास मिळतात. किल्ले, वाडे, मंदिरे, समाध्या, स्मारके, लेण्या ही ऐतिहासिक पर्यटनाची प्रमुख स्थळे आहेत. पैकी सातारा सर्किट मधील सातारा, औंध व शिखर शिंगणापूर या ऐतिहासिक पर्यटन स्थळांचा आपण मागोवा घेणार आहोत.

**अ. सातारा:**

महाराष्ट्रातील ऐतिहासिक सातारा जिल्हा अनेक अर्थाने वैशिष्ट्यपूर्ण आहे. सह्याद्रीच्या कुशीत, अजिंक्यतारा किल्ल्याच्या पायथ्याशी, निसर्गाने नटलेल्या दाट झाडीत ऐतिहासिक सातारा नगरी वसलेली

आहे. समकालीन सत्तांना आपल्या तलवारीने पराक्रम व शौर्याचे पाणी पाजून नावलौकिक मिळवणाऱ्या मराठी सत्तेची राजधानी म्हणून सातारा नगरीचे महत्त्वपूर्ण योगदान राहिली आहे. मराठी सत्तेनंतर ब्रिटिश काळ व स्वातंत्र्योत्तर काळातही सातारा नगरीने आपले वेगळेपण जपले आहे.

**भौगोलिक पार्श्वभूमी:** सातारा नगरीच्या पूर्वेस सोलापूर जिल्हा, पश्चिमेज रत्नागिरी जिल्हा, दक्षिणेस सांगली – कोल्हापूर जिल्हा व उत्तरेस पुणे जिल्ह्याच्या सीमा आहेत. साताऱ्याचे हवामान उष्ण व कोरडे असून ते ऋतूनुसार बदलत असते. काही भागात थंड तर काही भागात उष्ण असे संमिश्र हवामान असते. कृष्णा, नीरा, मानगंगा व येरळा इत्यादी प्रमुख नद्या व त्यांचे खोरी आहेत. समुद्रसपाटीपासूनची उंची सुमारे २३२० फूट इतकी असून प्रशासकीय सोयीसाठी सातारा जिल्ह्यात एकूण ११ तालुके आहेत. सन १८४८ मध्ये विजापूर, जावळी, कराड, खानापूर, खटाव, कोरेगाव, पंढरपूर, सातारा, तासगाव वाळवा, व वाई इत्यादी शासकीय विभाग होते. सन १८६२ मध्ये विजापूर विभाग बेळगाव जिल्ह्यास जोडण्यात आला. खानापूर, तासगाव, वाळवा शिराळापेठा या तालुक्यांचा समावेश असलेला दक्षिण सातारा विभाग तर जवळी, कराड, खटाव, कोरेगाव, सातारा व वाई या विभागास उत्तर सातारा म्हणून संबोधण्यात आले. तर पुढे १९६० मध्ये उत्तर सातारा जिल्ह्याचे सातारा व दक्षिण सातारा जिल्ह्याचे सांगली जिल्हा असे विभाजन करण्यात आले. आज सातारा जिल्ह्याचे सातारा, महाबळेश्वर, पाटण व फलटण हे चार उपविभाग असून त्यात एकूण ११ तालुक्यांचा समावेश होतो.

**ऐतिहासिक पार्श्वभूमी:** सातारा नावाविषयी अनेक दंतकथा आहेत. सप्तदरा, सातदरा, महादरा इत्यादी शब्दावरून हे नाव आले असावे. तर काहींच्या मते, किल्ल्यावरील सप्तऋषींच्या मंदिरामुळे किंवा किल्ल्यावरील सात बुरुजावरून या शब्दाचा अपभ्रंश सातारा असे नाव रूढ झाले असावे. किल्ल्याचेही मूळ नाव सप्तर्षी किंवा सातदरे असे होते. काहींच्या मते सातारा नगरीच्या सभोवताली असणाऱ्या सात किल्ल्यां पासून (सात तारा) सातारा हे नाव पडले असावे. इ.स. पूर्व २०० मधील मिळालेल्या कोरीव लेखानुसार सातारा जिल्ह्यातील सर्वात जुने ठिकाण म्हणून सध्याचे कराड प्रसिद्ध होते. तर पांडवांनी जिथे तेरा वर्षांचा वनवास भोगला त्या वाईला विराटनगरी म्हणून संबोधले जायचे. सातारा जिल्ह्यात आसगांव मर्ढे, माहुली, लिंब आणि सोनगांव इत्यादी ठिकाणी अश्मयुगीन कालखंडातील हत्यारे उपलब्ध झाली आहेत. सातवाहन कालखंडात कराड येथील बौद्ध लेणी तसेच शिरवळ, माळेवाडी इत्यादी ठिकाणच्या गुंफा खोदल्या गेल्या आहेत. सातवाहन काळानंतर इ.सवीसनाच्या चौथ्या शतकापासून सहाव्या शतकापर्यंत मनपूरच्या राष्ट्रकूटांनी दक्षिण महाराष्ट्रावर राज्य केले होते. त्यानंतर काही काळ साताऱ्यावर वाकाटकांची सत्ता होती. पुढे वाकाटकांच्या नंतर सातारा प्रदेशावर दीर्घकाळ राज्य करणारे घराणे म्हणजे बदामीचे चालुक्य होय. या घराण्यातील राजा विजयादित्य हा कराडच्या सेंद्रक राजाचा जावई होता. शीलाहारांच्या तीन घराण्यापैकी दहाव्या शतकात पुढे आलेले दक्षिण महाराष्ट्रातील शिलाहार घराणे हेच कोल्हापूरचे शिलाहार घराणे म्हणून प्रसिद्ध आहे. या घराण्याची आरंभीची राजधानी कराड होती. नंतर ती कोल्हापूरला हलवली गेली. या शिलाहार वंशीय राजा भोज दुसरा याने सातारा जिल्ह्यात आठ दहा किल्ल्यांचे बांधकाम केल्याचा उल्लेख इतिहासात मिळतो. त्यांच्या काळात उभारलेली मंदिरे ही अनेक गावी आढळतात. देवगिरीच्या यादव

घराण्यातील रामचंद्र देव हा शेवटचा हिंदू राजा होय. अल्लाउद्दीन खिलजीने त्याचा पाडाव करून त्यास बंदिवान म्हणून दिल्लीला नेले पुढे त्याचा मुलगा शंकरदेव ने  बंड केले असता मलिक कपूरने त्याचा पराभव करून त्यास ठार केले. यादव सत्तेच्या ऱ्हासानंतर दक्षिण भारतातील बहामणी सत्तेचा साधारणपणे १५० वर्षांचा कालखंड सोडला तर मुस्लिम सत्ता सतत एकमेकांत भांडत असल्याचे दिसून येते. विजयनगर विरोधात तालिकोट चा अपवाद वगळता परस्परांमधील संघर्ष हे त्यांच्या विनाशाचे कारण होते. थोडक्यात दक्षिणेत इस्लामी सत्तांमध्ये असणारा परस्पर संघर्ष त्यांना क्षीण करत गेला व देशमुख, देशपांडे या स्थानिकांनी त्याचा लाभ घेऊन स्वतःची प्रभाव क्षेत्रे निर्माण केली. जोपर्यंत  मोहम्मद गवानच्या मृत्यूनंतर विजापूर, अहमदनगर, वऱ्हाड, बिदर, गोवळकोंडा येथील सरदार स्वतंत्र झाले आणि त्यांनी आपले सवते सुभे तयार केले. अशा रीतीने साताऱ्यावरील बहामणी राजवट संपुष्टात आली. मोहम्मद गवानच्या मृत्यूनंतर त्याची विजापूर शुभ्यातील जाहागीर युसुफ अदिलखान या सरदारास देण्यात आले यामध्ये सातारा जिल्ह्याचा समावेश होता. यानेच विजापूर मध्ये इसवी सन १३८९ साली आदिलशाही सत्ता स्थापन केली. ही राजवट शिवाजी महाराजांच्या उदयापर्यंत अत्यंत विकसित झाल्याचे दिसून येते. परंतु सातारा परिसरावर ताबा मिळविल्यास आपण मोगल, विजापूर व कोकणातील सिद्धी या सर्वांशी चांगली लढत देऊ शकतो असा आत्मविश्वास बाळगून महाराजांनी आपल्या सर्व डावपेचांची सुरुवात साताऱ्यापासून केली. म्हणजेच जोपर्यंत छत्रपती शिवाजी महाराजांनी साताऱ्यात राजकीय हालचालींना प्रारंभ केला नाही तोपर्यंत साताऱ्यावर अदिलशाही चे वर्चस्व अतिशय मजबूत असल्याचे दिसून येते.

**सातारा व मराठी सत्ता:** सातारा व मराठी सत्ता यांचा अतिशय जवळचा संबंध राहिला आहे. सातारा व साताऱ्याचा परिसर हा शिवाजी महाराज व त्यांच्या वंशजांच्या कार्याने अत्यंत जवळून निगडित होता. शहाजीराजांना आदिलशहाने पुणे, सुपे, चाकण व इंदापूर या भागाची जहागिरी दिली होती त्याचबरोबर कराड तालुक्यातील मसूर या गावासह २२ खेड्यांची देशमुख ही दिली होती. या प्रदेशातच शिवबा राजांनी स्वराज्याचा यशस्वी प्रयोग केला होता. साताराच्या वायव्येस असणारा जावळीचा प्रदेश राजकीय व संरक्षणाच्या दृष्टीने महत्त्वाचा असल्याने तो १६५६ साली जिंकून घेतला. शिवाय याच जावळीतील भोरप्या डोंगरावर प्रतापगड नावाचा बुलंद किल्ला ही बांधला. याच प्रतापगडाच्या पायथ्याशी महाराजांनी आदिलशाही सरदार अफजलखान यास ठार केले होते. पुढे १६७३ मध्ये महाराजांनी सातारा किल्ल्यासह साताऱ्याजवळील परळीचा किल्ला  जिंकून घेतला. तर काही काळातच चंदनवंदन, पांडवगड, नांदगिरी केळंजा आणि ताथवडा हे किल्ले ही काबीज करून घेतले. शिवराज्याभिषेकानंतर १६७६ च्या सुमारास शिवाजी महाराज साताऱ्यास आजारी पडले यावेळी दोन महिने त्यांची वास्तव्य साताऱ्यात होते. एकूणच शिवकाळातील अनेक महत्त्वाच्या घटना सातारा परिसराशी संबंधित व स्फूर्तीदायक असल्याचे दिसून पुढे राजाराम महाराज जिंजीवरून स्वराज्यात परतल्यानंतर त्यांनी आपली गादी साताऱ्यास आनली.

मराठ्यांची खरी शक्ती किल्ल्यांमध्ये असल्याने औरंगजेबाने स्वतः किल्ले घेण्यास प्रारंभ करून साताऱ्याच्या किल्ल्यास वेढा दिला. सातारा किल्ल्यास मुघलांचा वेढा पडला तेव्हा राजाराम महाराज सिंहगडावर असून त्यांचा मृत्यू झाल्याने पत्नी महाराणी ताराबाई यांनी मराठा राज्याची सूत्रे हाती घेऊन नेतृत्व

केले. यावेळी मुघलांचा साताऱ्याचा वेढा चालूच होता सज्जनगड किल्ल्यावरून परशुराम त्र्यंबक मराठ्यांना धान्य पुरवठा करत होते. मोगलांनी तटला सुरुंग लावून पाडण्याचा प्रयत्न केला. तटबंदीची बरीच हानी झाली शेवटी सण १७०० रोजी वाटाघाटी करून मराठ्यांनी हा किल्ला मोघलांना दिला. शहजादा आझम यांनी केलेल्या वाटाघाटींमुळे किल्ला मिळाला म्हणून औरंगजेबाने या किल्ल्याचे नाव अजमतारा असे ठेवले. परळीचा किल्ला म्हणजेच सज्जनगडही ताब्यात घेऊन औरंगजेब बादशहाने त्याचे नाव नवरसतारा असे ठेवले. एका बाजूला औरंगजेब मराठ्यांचे किल्ले घेत होता तर दुसऱ्या बाजूला मराठ्यांच्या फौजा मुघलांच्या मुलखात मोहिमा काढत होत्या. या संघर्षातच १७०७ रोजी अहमदनगर मुक्कामी औरंगजेबाचा मृत्यू झाल्याने मराठ्यांचे स्वातंत्र्य युद्ध संपुष्टात येऊन नव्या पर्वास प्रारंभ झाला. पुढे शाहूंची सुटका झाल्यानंतर ते दक्षिणेत आले तेव्हा सातारा हे मराठी सत्तेचे प्रमुख केंद्र होते. जानेवारी १७०८ मध्ये शाहू महाराजांनी समारंभ पूर्वक सातारा शहरात प्रवेश केला तेव्हापासून या घटनेची आठवण म्हणून साताऱ्याच्या किल्ल्यावर दर शनिवारी चौघडा वाजवण्याची प्रथा सुरू झाली. शेवटी १२ जानेवारी १७०८ रोजी शाहू महाराजांनी स्वतःचा राज्याभिषेक करून सातारा ही आपली राजधानी निश्चित केली. १७४९ रोजी सातारा येथे छत्रपती शाहू महाराजांचे निधन झाले. साताऱ्यातील अनेक पाऊल खुणा आजही त्यांच्या कार्याची आठवण करून देतात. शाहूंच्या मृत्यूनंतर १७५० रोजी रामराजा मराठ्यांच्या गादीवर अरुढ झाले. साताऱ्याच्या बंदीवासात असणाऱ्या ताराबाई यांचा मृत्यू साताऱ्यातच १७६१ रोजी झाला. पानिपतच्या युद्धानंतर नानासाहेबांचे पुत्र माधवराव पेशवेपदी आले तेव्हा माधवरावांनी रामराजांची सर्व व्यवस्था लावून दिली. सातारा किल्ल्यावरील घरे व वाडे यांची दुरुस्ती माधवरावांनी सन १७६७ मध्ये केल्याचे माहिती मिळते. पुढे १७७७ मध्ये रामराजे निपुत्रिक अवस्थेत मरण पावले. त्यांच्या मृत्यूनंतर १८०८ मध्ये प्रतापसिंह गादीवर आले. ते बाणेदार राज्यकर्ते होते. त्यांनी आपल्या राज्याच्या संरक्षणासाठी इंग्रजांचशी जोराचा लढा दिला पण निभाव लागला नाही म्हणून प्रतापसिंह महाराजांनी तहानुसार इंग्रजांचे सार्वभौमत्व मान्य केले. इंग्रजांनी प्रतापसिंह यांना सर्वाधिकार न देता सातारला इंग्रज प्रेसिडेंट नियुक्त केला व त्याच्या सहमतीनेच महाराजांना राज्याचा राज्य कारभार पाहणे सक्तीचे ठरवले. त्यानुसार जेम्स कनिंगहॅम ग्रँट डफ साताऱ्याचा पहिला रेसिडेंट म्हणून कार्यरत झाला. ग्रँड डफने प्रताप सिंह महाराजांना राज्यकारभाराविषयी मार्गदर्शन केले. त्यानुसार महाराजांनी आपल्या राज्यात प्रजाहिताच्या अनेक सुधारणा केल्या त्यांच्या नेतृत्वाखाली सातारा अधिक विकसित झाले. पण पुढे आलेल्या ब्रिटिश अधिकाऱ्यांनी साताऱ्याचे संस्थान खालसा करण्याचा प्रयत्न केला. एवढेच नव्हे तर या कटात छत्रपतींचे कनिष्ठ बंधू श्रीमंत आप्पासाहेब यांना सहभागी करून प्रतापसिंह महाराजांच्या विरोधात कट कारस्थान करण्यात आले. शेवटी त्या कटास यश येऊन १८३९ मध्ये एका करारानुसार इंग्रजांनी प्रताप सिंह महाराजांना पदच्युत करून आप्पासाहेब महाराजांना गादीवर बसवले. पण पुढे आप्पासाहेब महाराजांना औरस संतती नसल्यामुळे दत्तक वारस नामंजूर करून ब्रिटिशांनी १८४९ रोजी सातारा संस्थान खालसा केले.

**सातारा नगरीचा विकास:** सातारा नगरीला प्राचीन वारसा लाभला असला तरी या नगरीचा सर्वांगीण विकास छत्रपती शाहू महाराजांच्या कारकीर्दीत झाला. शाहू महाराजांची राजधानी प्रारंभी किल्ल्यावर होती पण पुढे किल्ल्याच्या उत्तरेकडील उतारावर १७२० मध्ये त्यांनी शाहूनगर नावाचे शहर वसविले हेच आजचे सातारा

होय. शाहूनगर येथे शाहू महाराजांनी रंगमहाल, अदालत वाडा यासारख्या महत्त्वाच्या वास्तू बांधल्या. यवतेश्वराहुन खापरी नळाने पाणी आणून साताऱ्यात पाण्याची व्यवस्था लावली. सातारा ही मराठ्यांची राजधानी असल्यामुळे प्रधानांचे, सरदारांचे वाडेही येथे बांधले गेले, नवीन पेठा वसवल्या गेल्या. विविध प्रकारच्या बागा, फळा-फुलांची झाडे सातारा शहराच्या सौंदर्यात भर घातली. त्यानंतरच्या काळात प्रतापसिंह महाराजांनी साताऱ्याच्या विकासात मोठे योगदान दिले. प्रतापसिंह महाराज यांनी १८२६ साली सुमारे साडेपाच लाख रुपये खर्च करून मोठा राजवाडा बांधला तोच आज जुना राजवाडा म्हणून ओळखला जातो. त्यांनी आणखी काही वाडे बांधले व इतरांना बांधण्यासाठी वित्त सहाय्य केले. दरबारी मानकऱ्यांसाठी ही अनेक लहान मोठे वाडे बांधले. साताऱ्याच्या किल्ल्यावरील मंगळाईच्या देवळाच्या जीर्णोद्धारासाठी पाच हजार रुपये, प्रतापगडावरील भवानी देवीच्या मंदिराच्या जीर्णोद्धारासाठी ४० हजार रुपये, सज्जनगडावरील रामदास स्वामींच्या देवळाचा जीर्णोद्धारासाठी २० हजार रुपये व यवतेश्वराचे मंदिर व तलाव याकरिता दहा हजार रुपये खर्च केल्याचे नोंद मिळते. पुढे आपली राजवट स्थिर करण्याच्या धोरणानुसार इंग्रजांनी १८५० साली नगरपालिका अधिनियम अमलात आणून त्यानुसार १ ऑगस्ट १८५३ साली सातारा येथे टाऊन मुनसिपाल्टी ची स्थापना झाली. यातूनच सातारा नगरीच्या विकासाचे नवे पर्व सुरू होऊन प्रसिद्ध ऐतिहासिक पर्यटन स्थळांमध्ये रूपांतर झाले. त्यामुळेच आज पश्चिम महाराष्ट्रातील महत्त्वाचे पर्यटन स्थळ म्हणून साताऱ्यास ओळखले जाते.

**साताऱ्यातील किल्ले:** मराठी सत्तेच्या कालखंडात डोंगरी किल्ले, भुईकोट किल्ले व जलदुर्ग या प्रकारच्या किल्ल्यांना अतिशय महत्त्व प्राप्त झाले होते. मराठ्यांच्या स्वातंत्र्य युद्ध कालखंडामध्ये सातारा जिल्ह्यातील विविध किल्ल्यांनी मराठी सत्तेचे संरक्षण करण्याबरोबरच मुघलांचे कंबरडे मोडले होते. शाहूंच्या सुटकेनंतर सातारा ही मराठ्यांची राजधानी झाल्यामुळे साताऱ्यास विशेष महत्त्व प्राप्त झाले होते. सातारा जिल्हा भौगोलिक दृष्ट्या कोणत्याही सागराची जोडला नसल्याने जिल्ह्यामध्ये जलदुर्ग नाहीत. तर जिल्ह्यात डोंगररांगा असल्याने परीसरात अनेक डोंगरी किल्ले आहेत. पैकी एक भुईकोट किल्ला असून त्याचे अस्तित्व फक्त बुरूजापुरतेच राहिले आहे. भौगोलिक दृष्ट्या सातारा जिल्ह्यातील किल्ल्यांचे पर्जन्यमानानुसार दोन प्रकारांमध्ये विभाजन करता येते, पैकी पहिला प्रकार म्हणजे पर्जन्यदृष्ट्या अतिवृष्टीचा प्रदेश यामध्ये प्रतापगड, वैराटगड, केंजाळगड, मकरंदगड, भैरवगड, वासोटा, अजिंक्यतारा, सज्जनगड, वसंतगड, सुभानमंगळ, दातेगड, गुणवंतगड, कमळगड, मच्छिंद्रगड, पांडवगड आणि सदाशिवगड इत्यादी किल्ल्यांचा समावेश होतो. तर दुसरा म्हणजे अल्प पर्जन्यमानाचा असून यामध्ये चंदन वंदन गड, कल्याणगड, वारूगड, वर्धनगड ,महिमानगड आणि संतोषगड इत्यादी किल्ल्यांचा समावेश होतो. सातारा नगरी किल्ल्याच्या पायथ्याशीच वसलेली आहे. किंबहुना सातारा किल्ल्याच्या नावावरूनच सातारा नाव पडले असावे. त्याचा उल्लेख बहामणी सुलतान पहिला महंमदशहा याच्या पत्र व्यवहारात मिळतो. त्यानंतर औरंगजेब बादशहाने १६९९ मध्ये तो काबीज करून त्यास अजमतारा हे नाव दिले. तर १७०६ मध्ये महाराणी ताराबाईंचे सरदार परशुराम त्र्यंबक यांनी तो मोघलां कडून परत मिळवला आणि त्याचे नाव अजिंक्यतारा असे करण्यात आले. छत्रपती शाहू महाराजांनी १७०७ मध्ये मोघलांच्या कैदेतुन सुटका झाल्यानंतर अजिंक्यतारा किल्ला काबीज करून तेथे स्वतःचा राज्याभिषेक

केला. पुढे तो संस्थान विलीनीकरणा पर्यंत सातारकरांच्याच ताब्यात होता. किल्ल्यावर जुन्या वास्तूंचे अवशेष, मंगळाई, हनुमान व महादेव यांची मंदिरे महाराणी ताराबाईंचा भग्नावस्थेतील राजवाडा, रांजण, तीन तलाव यासारखे जुने अवशेष पहावयास मिळतात. किल्ल्याच्या माचीवर डफळ्यांच्या घोड्यांची पागा, अक्कलकोटकरांचा वाडा, पिंगळ्यांचा वाडा यासारखे जुने अवशेष दिसून येतात. हे अवशेष ऐतिहासिक साताऱ्याच्या पराक्रमाच्या व कर्तुत्वाच्या पाऊलखुणा असून त्या पर्यटकांना नेहमीच आकर्षित करत आल्या आहेत.

**मंदिरे व मशिदी:** धार्मिक दृष्ट्या प्रसिद्ध असणाऱ्या सातारा नगरीत अनेक देवदेवतांची मंदिरे असून त्यापैकी जलमंदिर (भवानी), कोटेश्वर मंदिर, कृष्णेश्वर मंदिर, शिवेश्वर मंदिर राम मंदिर, विष्णू मंदिर, महादेव मंदिर, भैरोबा मंदिर, ढोल्या गणपती मंदिर, खिंडीतील गणपती मंदिर, उत्तर चिदंबरम नटराज मंदिर, महानुभव मठ वगैरे प्रसिद्ध आहेत. याशिवाय सातारा जिल्ह्यात तथा परिसरातही अनेक स्थापत्य कलेचा उत्कृष्ट नमुना असणारी व भक्तांनी, पर्यटकांनी गजबजून जाणारी अनेक मंदिरे पहावयास मिळतात. त्यामध्ये धोम येथील सिद्धेश्वर मंदिर, माहुली येथील राधा शंकर मंदिर, वाई येथील काशी विश्वेश्वर मंदिर, पाटखळ येथील संगमेश्वर मंदिर, किन्हई येथील यमाई मंदिर, मरडे येथील रामेश्वर मंदिर, शिखर शिंगणापूरचे श्री शंभू महादेव मंदिर, पालीचे खंडोबा मंदिर इत्यादी प्रसिद्ध मंदिरे आहेत. ही मंदिरे धार्मिक तीर्थक्षेत्र म्हणून विकसित झालेली आहेत. याशिवाय सातारा भागात मुस्लिम स्थापत्य कलेची साक्ष देणारी काही बांधकामे आहेत. त्यामध्ये झीनतुनिस्सा ची मशीद प्रसिद्ध आहे. औरंगजेबाची ही कन्या येसूबाई व शाहू राजे बादशाही कैदेत असताना त्यांच्याबरोबर होती. ती सन १७२१ मध्ये मृत्यू पावली हे समजल्यावर शाहू महाराजांनी तिच्या स्मरणार्थ एक मशीद बांधली तिला बेगम मशीद म्हणूनही ओळखले जाते. ही मशीद अदालत वाड्याजवळ असून तिला खतिबा मशिद असे म्हणतात. मोहरम मध्ये येथून डोला काढण्याची पद्धत शाहू महाराजांनी सुरू केली होती ती आजही सातारचे राजघराणे ही प्रथा चालवीत आहेत.

**ऐतिहासिक वाडे:** शिवकाळ व त्यानंतरच्या कालखंडात सातारा जिल्ह्यातील अनेक पराक्रमी घराण्यांचे ऐतिहासिक वाडे पहावयास मिळतात. मध्ययुगीन काळात वाडा हा निवासस्थान कार्यालय आणि अन्य दैनंदिन व्यवहारासाठी वापरला जाई. छत्रपती शाहू महाराजांनी किल्ल्याच्या पायथ्याशी १७२० मध्ये डोंगर उतारावर अदालतवाडा बांधला. या वाड्याचे जोते दहा फूट उंच असून संपूर्ण इमारतीची लांबी व रुंदी २२५ फूट व १६० फूट आहे. या वाड्यातील आरसे महाल, नगारखाना व भव्य दरवाजा आहे. या वाड्यात मराठी राज्याचे मुख्य न्यायालय होते. छत्रपती शाहू महाराज, पंतप्रधान पेशवे व मुख्य न्यायाधीश नियमितपणे रयतेची गारानी ऐकून घेण्यासाठी या वाड्यात बसत असत. वाड्याचे प्रवेशद्वार भव्य असून रस्त्यावरून प्रवेशद्वारापर्यंत जाण्यास आयताकृती पायऱ्या आहेत. प्रवेशद्वारावर पाच खिडक्या असलेल्या सज्जा असून दोन्ही बाजूस घडीव दगडांच्या भिंती आहेत. दरवाजा अतिशय भक्कम असून त्याचे स्वरूप आजही नव्यासारखे दिसते. अदालतवाड्यास पूर्वी जुनी आदालत असे म्हणत असत. रंगमहाल ही वास्तू आदालत वाड्याच्या पूर्वेस सुमारे २०० मीटर अंतरावर आहे. शाहू महाराजांच्या राण्यांचा राणीवसा इथे राहत होता म्हणून या इमारतीस रंगमहाल असे नाव देण्यात आले होते. सध्याच्या गुरुवार पेठेतील शाहू उद्यानाच्या ठिकाणी छत्रपती शाहू

महाराजांनी एक वाडा बांधला होता तेथे शाहू राजांचे तक्त होते. त्या ठिकाणी महाराजांचा दरबार भरत असे या वाड्यास तक्ताचा वाडा असे म्हटले जात. दुर्दैवाने हा वाडा आगीत भस्मसात झाल्यामुळे शाहू महाराजांचे राजवैभव आज पाहता येत नाही. वरील वाड्यां व्यतिरिक्त सातारा जिल्ह्यातील प्रमुख वाड्यांमध्ये भुईज येथील जाधवराव यांचा वाडा, बावधन येथील गायकवाड यांचा वाडा, तारळे येथील महाडिकांचा वाडा, मेनवली येथील नाना फडणवीस यांचा वाडा, वाई येथील मोतीबागवाडा, जयराम स्वामी वाडा, किन्हई चा वाडा इत्यादी महत्त्वाच्या व ऐतिहासिक वाड्यांचा समावेश होतो. याशिवाय फलटणचे निंबाळकर, मासवडचे माने, खटावचे खटावकर, पाटणचे पाटणकर, तळबीडचे मोहिते, भोईज चे जाधव या पराक्रमी राजघराण्यांचे वाडे यांचाही समावेश होतो. हे वाढे आजही पूर्वजांच्या पराक्रमाची साक्ष देत असल्याने ते ऐतिहासिक पर्यटनाच्या दृष्टीने महत्त्वाची प्रेरणास्थळे असल्याचे दिसून येते.

**इतर बांधकामे:** घाट उंच व रुंद पायऱ्या असणाऱ्या नदी व मंदिर यांना जोडणारा महत्त्वाचा दुवा असतो. नदीच्या पवित्र पाण्यामध्ये स्नान करणे व धार्मिक विधी करणे हे घाट बांधण्याचा प्रमुख हेतू असे. मराठा काळामध्ये अनेक सरकारी अधिकारी व सरदारांनी आपले पुण्य कर्म म्हणून अनेक घाट बांधले आहेत. नदीच्या पत्रामध्ये असे घाट बांधल्याने त्या घाटांना किंवा ठिकाणांना धार्मिक दृष्टीने विशेष महत्त्व प्राप्त झाले. सातारा जिल्ह्यामध्ये धोम, मेनवली, वाई, वाकेश्वर, पाचवड, मरडे, वडूथ, माहुली, अंगापूर, कराड इत्यादी ठिकाणी महत्त्वाचे घाट असून हे सर्व घाट कृष्णा नदीवर बांधण्यात आलेले आहेत. माहुली येथे प्रतिनिधी, पेशवा दुसरा बाजीराव व अनगळ यांनी घाट बांधलेले आहेत. शिवाय अंगापूर येथे देशमुखांनी १७३८ मध्ये एक घाट बांधल्याचे दिसून येते. नेर येथे काशीविश्वेश्वर मंदिराच्या पाठीमागे ओढ्यावर लहान पण आकर्षक घाट बांधलेला पहावयास मिळतो. विविध तीर्थक्षेत्रांच्या ठिकाणी यात्रेकरूंच्या निवासाची सोय करण्यासाठी बांधण्यात आलेल्या इमारतींना धर्मशाळा म्हटले जाते. सातारा जिल्ह्यात अशा प्रकारच्या धर्मशाळांच्या इमारती तथा बांधकामे साताऱ्याबरोबरच माहुली येथील काशी विश्वेश्वर, रामेश्वर, पाल येथील खंडोबा, अंगापूर येथील महादेव, गणेश, वाई येथील गणपती व नेर येथील काशी विश्वेश्वर मंदिर येथे पहावयास मिळतात. एखाद्या व्यक्तीचे निधन झाल्यानंतर त्या व्यक्तीच्या आठवणीसाठी मृत्यूच्या ठिकाणी बांधलेल्या वस्तूला समाधी किंवा छतत्री असे म्हणतात. सातारा जिल्ह्यामध्ये औंध येथे तळ्याच्या काठी रूपपुरी यांची समाधी आहे. भुईज येथे रायाची जाधव यांची समाधी आहे. बोरगाव येथे भाऊसिंग जाधवराव यांची समाधी आहे. जांब येथे ते पतंगराव जाधवराव यांची समाधी आहे. कनेरखेडा येथे बायजाबाई शिंदे यांची समाधी आहे. या समाधीच्या शेजारीच १६ खांबी एक दुसरी समाधी असूनत ती समाधी चौथर्यामवरील खांबांच्या स्वरूपात आहे. चौथऱ्यावर १६ खांब असून मध्यभागी शिवलिंग आहे. स्थानिक लोक शिवलिंग हे जानकोजी शिंदे व १६ खांब हे जानकोच्या बरोबर पानिपतच्या युद्धात मारले गेलेल्या सरदारांच्या समाधीचे प्रतीक म्हणतात.

**प्रेक्षणीय स्थळे:** याशिवाय पवई नाका येथील छत्रपती शिवाजी महाराजांचा प्रेरणादायी अश्वारूढ पुतळा, मराठ्यांच्या ऐतिहासिक राजवटीतील अनेक बाबींची ऐतिहासिक माहिती देणारे छत्रपती शिवाजी महाराज वस्तुसंग्रहालय, ऐतिहासिक चार भिंती, अनेक ऐतिहासिक घटनांचा साक्षीदार अजिंक्यतारा, जागतिक स्तरावर

आपल्या नैसर्गिक सौंदर्याचा ठसा उमटवणारे कास पठार, मान्सून पर्यटनाचे मुख्य आकर्षक केंद्र ठरलेला ठोसेघर धबधबा, कराड येथील कृष्णा व कोयनेच्या प्रीती संगमावरील महाराष्ट्राचे शिल्पकार यशवंतराव चव्हाण यांचे समाधीस्थळ, कृष्णामाई चे मंदिर, विद्यमान शासकीय कार्यालये, बहुजन समाजातील लाखो गोरगरीब मुलांच्या शिक्षणाचे माहेरघर ठरलेल्या रयत शिक्षण संस्थेचे कार्यालय व कर्मवीर भाऊराव पाटील आणि लक्ष्मीबाई भाऊराव पाटील यांचे स्मृतीस्थळ, यासारखी अनेक स्थळे पर्यटनाच्या दृष्टिकोनातून महत्वाची असून या सर्वच ठिकाणांना बाराही महिने मोठ्या संख्येने पर्यटक भेटी देत असल्याचे पहावयास मिळते.

अशा प्रकारे महाराष्ट्रातील सातारा (सर्किट) विभाग ऐतिहासिक पर्यटन हब म्हणून अतिशय महत्त्वाचा ठरला आहे. सातारा नगरी सह जिल्ह्यातील अनेक ठिकाणांना ऐतिहासिक, राजकीय, सामाजिक, आर्थिक, सांस्कृतिक दृष्टीने विशेष महत्त्व आहे. ही पर्यटन स्थळे जिल्ह्याच्या ऐतिहासिक वारशाचे, पराक्रमाचे, शौर्याचे, कर्तुत्वाची साक्षीदार तर आहेतच पण त्याचबरोबर पर्यटकांना मनमुराद आनंद देण्याबरोबरच एक प्रकारची प्रेरणा सुद्धा देतात.

**ब. औंध**

दक्षिण भारतात जी संस्थाने होती त्यामध्ये औंध हे एक महत्त्वाचे संस्थान म्हणून ओळखले जात होते. तर प्रतिनिधी घराणे हे औंध संस्थानाचे राजघराणे होते. संस्थानाला मोठा ऐतिहासिक व धार्मिक वारसा लाभल्यामुळे त्यास ऐतिहासिक पर्यटनाचा दर्जा प्राप्त झालेला आहे. त्यामुळेच औंध हे महाराष्ट्रातील विशेषत: सातारा जिल्ह्यातील एक महत्त्वाचे ऐतिहासिक पर्यटन स्थळ म्हणून ओळखले जाते.

**औंध संस्थानाचा पूर्व इतिहास:** दक्षिण महाराष्ट्रातील हे छोटेसे संस्थान होते. एका अख्यायिके नुसार औंध येथे पूर्वी घनदाट अरण्य होते तेथे  औंधासुर नावाचा राक्षस राहत होता. यमाई देवीने त्याचा वध केला त्याच्या नावावरून या गावास औंध असे नाव पडले असावे. संस्थानातील गावे दूर दूर पसरलेली असल्यामुळे राज्यकारभाराच्या सोयीसाठी त्याचे औंध, कुंडल, आटपाडी व गुळदान असे चार तालुके तथा विभाग केले होते. औंध गावाच्या उत्तरेस गावालगतच पदमाळे, नागाळे आणि विशाळे ही तळी असून त्यांच्या ऐतिहासिक काळाच्या खुणा आहेत. यापैकी पदमाळे आणि नागळे ही तळी सुस्थितीत असून विशाळे हे तळे बुजलेले आहे. अलीकडच्याच काळात नागाळे तळ्यातील गाळ काढून त्याचे बांधकाम करण्यात आले आहे याचे संपूर्ण श्रेय औंधच्या राणीसाहेब श्रीमंत गायत्री देवी पंतप्रतिनिधी यांना जाते. बुजलेल्या विषाळे तळ्याच्या जागेवर विशाल बाग व पंतप्रतिनिधींचा मराठा स्थापत्यशैलीचा दुमजली वाडा असून श्रीमंत गायत्री देवी पंत प्रतिनिधी राणेसाहेब औंध यांचा बंगला आहे.

**प्रतिनिधी घराण्याचा पूर्व इतिहास:** प्रतिनिधी घराणे हे या संस्थानाचे अधिपती घराणे असून किन्हई गावचा त्र्यंबक कृष्णाजीपंत हा या घराण्याचा मूळ पुरुष होय. सातारा जिल्ह्यातील वर्धनगड नजीक किन्हई नावाचे गाव असून तेथे यमाजी पंत कुलकर्णी राहत होते. त्यांना नागोजी व कृष्णाजी ही दोन मुले होती. तर कृष्णाजी पंतास आप्पाजी पंत व त्र्यंबक पंत ही दोन मुलगे होते. पुढे त्र्यंबक रावास १६६० च्या दरम्यान

परशुराम पंथ हा मुलगा झाला. ज्यावेळी राजाराम महाराज जिंजीच्या आश्रयास गेले होते त्यावेळी परशुराम पंत त्र्यंबक हा त्र्यंबकजी पंतांचा पहिला मुलगा याने महाराष्ट्रात मुघलांना प्रखर प्रतिकार करून आपले शौर्य व कर्तबगारी दाखवली होती. त्यामुळे राजाराम महाराजांनी परत आल्यानंतर सन १६९८ मध्ये परशुराम पंत त्र्यंबक यांचा उंची वस्त्रे, शस्त्रे, अलंकार व शिक्का देऊन गौरव करून त्यांना प्रतिनिधी हा किताब दिला. पुढे १६९९ मध्ये परशुराम पंतास पेशवे पद देण्यात आले तर साताऱ्याचा किल्ला शाहू महाराजांनी जिंकल्यानंतर परशुराम पंतांचे प्रतिनिधी पद गेले होते. पण पुढे खंडोबल्लाळ चिटणीस यांच्या प्रयत्नामुळे १७१० साली परशुराम पंतास पुन्हा प्रतिनिधी पद देण्यात आले. सन १७१८ रोजी सातारा येथे ते मरण पावले. प्रारंभी प्रतिनिधी घराण्याची राजधानी कराड येथे होती पण पुढे दळणवळणाच्या सोयीसाठी इंग्रजांनी कराड परगणा प्रतिनिधींकडून काढून घेतला व त्या मोबदल्यात ७२ गावे व ३९ वाड्यांचे औंध संस्थान प्रतिनिधींना दिले होते. तेव्हापासून आजतागायत औंध ची जहागिरी पंतप्रतिनिधी घराण्याकडे आहे. या घराण्यात परशुराम त्र्यंबक यांच्यासह श्रीपतराव, जगत जीवणराव, श्रीनिवास गंगाधर तथा भगवानराव, परशुराम श्रीनिवास, रावसाहेब, दादासाहेब आणि भगवानराव श्रीनिवास उर्फ बाळासाहेब इत्यादींनी संस्थानाचा राज्यकारभार केला. इंग्रजांनी सण १८५८ मध्ये कंपनीची सत्ता बरखास्त करून राणीच्या जाहीरनाम्या नुसार ब्रिटिश व्हाईसरॉय मार्फत भारतीय संस्थानिकांना नवीन सनदापत्रे दिली होती. औंधच्या श्रीनिवास राव प्रतिनिधींना १२ मार्च १८६२ रोजी ब्रिटिश व्हाईसरॉयने नवीन सनद दिल्याची नोंद मिळते. अनेक अधिपतींनी औंध संस्थानात महत्त्वपूर्ण सुधारणा केल्या होत्या. भारताला स्वातंत्र्य मिळाल्यानंतर १९ फेब्रुवारी १९४८ रोजी भगवानराव श्रीनिवास पंतप्रतिनिधी यांच्या कारकीर्दीत औंध हे संस्थान स्वतंत्र भारतात विलीन झाले.

**यमाई मंदिर (गावातील):** यमाई देवी पंतप्रतिनिधी घराण्याची कुलदेवता असून यमाई देवीचे हे मंदिर गावाच्या उत्तर बाजूस आहे. मंदिराशेजारी पंतप्रतिनिधींचा राजवाडा आहे. हे मंदिर पूर्वाभिमुख असून समोर औंदेश्वराची मूर्ती आहे. मंदिराच्या प्रवेशद्वाराशेजारी नगारखाण्याशिवाय त्यावर दक्षिणेस दुसरा नगारकारखाना आहे. देवीच्या अंगणात चार दीपमाळा असून त्यापैकी एक १८ मीटर उंचीची आहे. तिच्यावर १७६ दिवे लावण्याची व्यवस्था आहे. सन १६५९ च्या अफजलखानाच्या स्वराज्यावरील स्वारीच्या वेळी या मूर्तीची तोडफोड करण्यात आली होती पण दीपमाळेस धक्का लावला नव्हता. मंडपामध्ये बाळासाहेब पंतप्रतिनिधींनी स्वतः काढलेली अनेक चित्रे आहेत. मंदिर मंडपाचे काम १९०१ मध्ये श्रीमंत श्रीनिवास राव परशुराम पंडित पंतप्रतिनिधी यांनी सुरू केले होते आणि १९१० मध्ये श्रीमंत भगवानराव श्रीनिवास राव पंडित पंतप्रतिनिधी यांनी पूर्ण केले. या मंडपासाठी त्यावेळी एकूण खर्च ६५ हजार रुपये आला होता. मंदिरात एक भली मोठी घंटा असून तिच्यावर १७४४ असे अंक कोरलेले आहेत. गाभाऱ्यात देवीच्या दोन मूर्ती असून एक पाषाणाची आहे तर दुसरी पंचधातूची आहे. मंदिरावर दगड व विटांचे शिखर आहे. देवीची यात्रा पौष पौर्णिमेपासून अमावस्येपर्यंत मोठ्या उत्साहात भरत असते.

**यमाई देवी (मूळपीठ):** गावाच्या नैऋत्येस सुमारे २४० मीटर अंतरावर टेकडीवरील यमाई देवीचे मूळ पीठ असलेल्या ठिकाणी देवीचे मंदिर आहे. पायथ्यापासून मंदिरापर्यंत अनेक पायऱ्या आहेत. मंदिरासभोवताली तटबंदी असून तिला दहा बुरुज आहेत. तटबंदीस उत्तरेस व दक्षिणेस प्रवेशद्वारे आहेत.

संपूर्ण मंदिर दोन फूट उंचीच्या दगडी चौथऱ्यावर उभे आहे. मंदिरासमोर स्वतंत्र नंदी मंडप प्रवेशद्वाराच्या लल्लाटावर गणपतीची मूर्ती असून उजव्या स्तंभावर गणपती व डाव्या स्तंभावर मानवी आकृती आहे. मुख्य मंडपात दोन स्तंभ व दोन अर्धस्तंभ आहेत. शिवाय मंडपाच्या छतावर बरोबर मध्यभागी सूर्यफुलाची प्रतिमा असून आजूबाजूला कोरीव काम आहे. गाभाऱ्यातील यमाई देवीची मूर्ती काळ्या पाषाणातील असून मूर्तीचे तोंड पुर्वेकडे आहे. तर वरती दगड विटांचे शिखर आहे. देवीची यात्रा पाऊस पौर्णिमेपासून अमावस्येपर्यंत भरते.

**श्री भवानी चित्रसंग्रहालय:** औंध येथील श्री भवानी संग्रहालय हे महाराष्ट्रातील एक महत्त्वाचे संग्रहालय असून ते ऐतिहासिक पर्यटन स्थळ म्हणून परिचित आहे. श्रीमंत बाळासाहेब महाराज पंतप्रतिनिधी हे कलेचे भोक्ते असून ते स्वतः चित्रकार, कीर्तनकार, कलाप्रेमी आणि पुरोगामी विचारांचे राजे होते. त्यामुळे त्यांनी नामवंत चित्रकारांची चित्रे, शिल्पे, नक्षीदार भांडी, जुनी नाणी, भारतीय शैलीतील चित्रे, वस्त्रे, शस्त्रे इत्यादींचा मोठा संग्रह केला होता. हा संग्रह स्वतःकडे न ठेवता त्यांनी तो आपल्या जनतेस पाहता यावा व त्यातून आपल्या ऐतिहासिक समृद्ध वारशाचे ज्ञान मिळावे म्हणून संग्रहालय शास्त्राचा आधार घेऊन सन १९३८ मध्ये संग्रहालयाची स्वतंत्र इमारत उभी केली. तिथे अनेक प्रकारची चित्रे असल्याने त्यांचे पुढील प्रमाणे वर्गीकरण करण्यात आले आहे.

**भारतीय चित्रकारांची दालन :** या चित्रदालनात राजा रवि वर्मा, बाबुराव पेंटर, आबालाल रेहमान, धुरंदर माळी, हळदणकर, जिनीनाथ गांगुली इत्यादी प्रसिद्ध चित्रकारांचा समावेश आहे. शिवाय ५० वर्षांपूर्वी ज्या चित्रावर मोठी टीका झाली ते ठाकूरसिंग यांचे ओलेती हे प्रसिद्ध चित्र या विभागात पाहाव्यास मिळते. पाश्चात्य चित्रांचे दालन: या विभागात पाच स्वतंत्र दालने असून पैकी दालन क्रमांक दोन मध्ये पाश्चात्य चित्रकारांपैकी एस बिलगेन, एफ. डब्ल्यू. स्कार ब्रोउजेट, प्रंकस्टमन, जी चेअरिसी, जि स्कॉट इत्यादी लोकांची चित्रकृती आहेत. जी. चेअरशी या चित्रकाराने त्रिमातीचा भास देणारे बॉय होल्टीअर हे चित्र या दालनातील वैशिष्ट्यपूर्ण असून या चित्राकडे आपण कोणत्याही कोणातून पाहिले तर या चित्रातील बालक आपल्याकडेच पाहतो आहे असे दिसते. युरोपियन चित्र दलनात मारस्टोन, जिनव्हान ब्लोसेन, बोर्डिनो प्लारिस, फ्रान्सिस्को गोया, लाकाका, थॉमरस जेम्स, बिरो सालोमन इत्यादींची चित्रे आहेत. पाश्चात्य चित्रकार कक्ष या विभागात मोनेटरी. एफ. कचोळ, अनटूथ मार्कस्टोन, मिस टूथ वगैरे चित्रकारांची चित्रे प्रदर्शित करण्यात आली आहेत. पाश्चात्य चित्रकार प्रतिकृती या दालनात लिओनार्दो द व्हीन्सी यांचे जगप्रसिद्ध मोनालिसा या चित्राची प्रतिकृती अणबिन यांनी केलेली आहे. अजंठा चित्रकृतीच्या प्रतिकृती: या दालनात एकूण ५६ प्रतिकृती प्रदर्शित करण्यात आल्या आहेत. श्रीमंत बाळासाहेब यांच्या चित्रांचे दालन या विभागात बाळासाहेबांनी स्वतः चित्रांकित केलेली विविध चित्रे आहेत. शिवाय या दालनात महाराजांनी रामायणावर तयार केलेली चित्रकृती प्रदर्शित केली आहे. चंदनी व हस्तिदंती कोरीव काम दालन: चंदन व हस्तिदंतात कोरलेल्या अनेक कलाकृती या दालनात प्रदर्शित केलेले आहेत. औंध येथील स्थानिक कलाकारांनी संगमरवर व हस्तीदंतावर केलेले कोरीव कामाचे नमुनेही येथे ठेवण्यात आले आहेत. कर्नाटकातील शिरशी गावचे गुडीगार यांनी चंदनात बनवलेले शिवचरित्र व रामायण, दशावतार या कलाकृती

येथे आहेत. संकीर्ण या विभागात दुर्मिळ नाणी, तांदळाच्या दाण्यावर कोरलेला भागवत गीतेवरील एक श्लोक, वेगवेगळ्या प्रकारची माती वापरून तयार केलेली रंगचित्रे, पितांबर, चांदीच्या पानावर कोरलेले रामायण, महाभारत, मौल्यवान रत्ने, मानकाचा गणपती, नीलमण्यावर कोरलेला कालियामर्दन, पोवल्यामध्ये कोरलेले गुलाबाचे फुल अशा अनेक मौल्यवान वस्तूंचा संग्रह आहे. औंधचे समृद्ध असे ग्रंथालय आहे. या ग्रंथालयात दुर्मिळ अशा पोथ्या, पुस्तके जतन करून ठेवलेली आहेत. ग्रंथालया मध्ये एकूण १६०४५ इतकी अति दुर्मिळ पुस्तके व ३००० हस्तलिखिते यांचा समावेश आहे.

अशाप्रकारे औंध हे ऐतिहासिक पर्यटन स्थळ असून महाराष्ट्रातच नव्हे तर संपूर्ण देशात प्रसिद्ध आहे. त्यामुळेच या पर्यटन स्थळास भेट देण्यासाठी देश विदेशातूनही पर्यटक येतात. महाराष्ट्र शासनाने या पर्यटन स्थळाचे महत्त्व ओळखूनच क दर्जा दिलेला आहे.

### क. शिखर शिंगणापूर

शिखर शिंगणापूर हे सातारा जिल्ह्यातील एक महत्त्वाचे पर्यटन स्थळ तथा धार्मिक स्थळ म्हणून ओळखले जाते. डोंगर दऱ्याखोऱ्यांनी भरलेल्या या परिसरात डोंगरावरती असणाऱ्या श्री शंभू महादेवाच्या मंदिरामुळे या ठिकाणाला पवित्र तीर्थक्षेत्राचे महत्त्व प्राप्त झाले आहे. शिखर शिंगणापूर हे लाखो भाविकांचे श्रद्धास्थान तर आहेच पण त्याचबरोबर ते एक ऐतिहासिक पर्यटनाचे स्थळ म्हणूनही विकसित झालेली आहे.

**भौगोलिक स्थान:** सातारा जिल्ह्यातील एक महत्त्वाचा फाटा महादेवाचा डोंगर या नावाने ओळखला जातो. याच डोंगराच्या उत्तर टोकावर श्री शंभू महादेवाचे वास्तव्य होते. त्यांच्या वास्तव्या मुळेच पुढे या डोंगराला श्री महादेवाचा डोंगर असे नाव मिळाले. प्राचीन काळी हा दंडकारण्याचा प्रदेश होता तर पुढे मराठ्यांच्या कालखंडा पर्यंत तो खुरट्या वनस्पतींच्या दाट झाडींनी व्यापलेला होता. शंभू महादेवाचे मंदिर ज्या डोंगरावर आहे त्या डोंगराची समुद्रसपाटी पासूनची उंची सुमारे १२०० फूट इतकी आहे. तर आजूबाजूला छोट्या-मोठ्या डोंगरांची पर्वतरांग विस्तीर्ण पणे पसरलेली आहे. त्यामुळे श्री शंभू महादेवाचा डोंगर तथा शिखर शिंगणापूरचे हे मंदिर पर्यटकांचे मुख्य आकर्षण बनवले आहे.

**ऐतिहासिक पार्श्वभूमी:** सातारा जिल्ह्यातील या मंदिराची उभारणी देवगिरीच्या यादव वंशातील शिंघण राजाने केली आहे. या गावाचे प्रारंभीचे नाव सिंघणपुर असे होते या नावावरूनच पुढे शिंगणापूर हे नाव रूढ झाले. या ठिकाणी अति प्राचीन व भव्य स्वरूपाचे शिवालय आहे. या संदर्भात बॉम्बे गॅझेट मध्ये नोंदवले आहे की, शिवाजी महाराजांनी या मंदिरास निधी दिला आणि बलवंतराव सावकाराने त्यांच्या वतीने बांधले. इतर अनेक धार्मिक स्थळांप्रमाणे याही स्थळाची अनेक पौराणिक कथांची गुंफण झालेली आढळते. प्रसिद्ध साहित्यिक डॉ. कृष्णा इंगोले यांनी अशीच एक पौराणिक कथा आपल्या मानदेश या ग्रंथात दिली आहे ते म्हणजे, कैलास पर्वतावर शिव पार्वती सारीपाट खेळताना शिव प्रत्येक वेळा डावात हारत होते. यावेळी नारद मुनी तेथे हजर होते त्यांनी शिवास चिडवले तेव्हा रागाला जाऊ शिव कैलास वरून निघून या डोंगरावर गुप्तपणे राहू लागले. तेव्हा पार्वती शिवाचा शोध घेण्यासाठी भिल्लीनीच्या वेषात निघाली आणि या डोंगरात तिने शिवाला शोधून काढले. त्यांची ही भेट चैत्र शुद्ध पंचमीला झाली आणि पुढे त्यांचा विवाह चैत्र शुद्ध

अष्टमीला झाला. पुढे त्यांच्या भक्तांनी पंचमीस देवांच्या हळदी व अष्टमीला लग्न आसा सोहळा सुरू केला. तो आज तागायत यात्रेच्या रूपाने दरवर्षी मोठ्या उत्साहात साजरा केला जातो. या सुप्रसिद्ध यात्रेचे वर्णन करताना ते पुढे म्हणतात की, चैत्रात १० दिवस देवाचा मोठा उत्सव असतो. नवसाचे भक्त खालून कावडी आणून अभिषेक करतात. त्यात भुत्या तेल्याची कावड मोठी असून जणू दोन रांजणच असतात. कावड वाहक डोंगर चढताना महादेवाचा धावा करतात. महाराष्ट्रातून अनेक ठिकाणाहून देवाच्या मानाच्या काट्या येतात. त्यात भातखंडीची २५ हात लांबीची काठी सर्वात उंच असते. चैत्र शुद्ध अष्टमीला शिव पार्वतीच्या विवाहाचा सोहळा मोठ्या थाटात पार पडतो. विवाहासाठी एक कुटुंब वर्षभर एक पागोटे विनते. त्याची लांबी सुमारे ५५० फूट इतकी असते त्याचे एक टोक शंभू महादेवाच्या शिखरावर तर दुसरे टोक अमृतेश्वराच्या शिखरावर बांधतात. मोठ्या श्रद्धेने भक्तगण सहभागी होतात.

**मंदिराचे बांधकाम:** शिखर शिंगणापूर येथील श्री महादेवाच्या मंदिराचे शिखर सुमारे ५५ फुट उंचीचे आहे. मंदिरात जाण्यासाठी तळापासून अनेक दगडी पायऱ्या चढाव्या लागतात. हे अंतर १८३ मीटर उंचीचे असून तेवढी चढण चढावी लागते. तेथे मंदिरात जाण्यासाठी पहिले महाद्वार लागते त्या महाद्वाराची कमान ४१.६ बाय ४०.८ बाय ३१.५ फुटाची आहे. ही कमान नाचरे गावच्या एका धनगर भक्ताने सुमारे २५० वर्षांपूर्वी उभारली तर या कमानी तील दरवाजा ५३.३ फुट उंचीचा आहे हा दरवाजा सांगोला तालुक्यातील शेंडगे या शिवभक्ताने  बांधला आहे. महाद्वारापासून १५० पायऱ्या चढून गेल्यावर दुसरा दरवाजा लागतो. तेथूनच मुख्य मंदिराचे प्रांगण सुरू होते. हे महाद्वार व प्रांगण छत्रपती शिवाजी महाराजांच्या काळातील असून हे काम शिवाजी महाराजांनी बळवंतराव नावाच्या कारभाऱ्याकडे द्रव्य देऊन पूर्ण करण्यास सांगितले होते. हे प्रवेशद्वार ३४.५ फूट रुंदीचे व ३८.६ फूट उंचीचे असून कमान २६.४ फूट उंच व १४. ४ फूट रुंदीची आहे. कमानीच्या भिंतीवर नागबंध कालिमर्दनचे शिल्प आहे. दरवाज्याच्या उंच उंबरठ्यावर मध्यभागी मंडारक व कीर्तीमुखे आहेत. प्रांगणात मंदिराच्या दोन्ही बाजूस दोन दीपमाळा असून त्यातील एक दीपमाळ वीरूबाई यांनी बांधल्याचे दीपमाळेवरील शिलालेखावरून स्पष्ट होते. प्रांगणात मध्यभागी श्री शंभू महादेवाचे देवालय असून हे मंदिर गर्भगृह, अंतराळ, सभामंडप, मुखमंडप व नंदी मंडप यांनी युक्त आहे.

**गाभारा:** मंदिराचा गाभारा हा आठ बाय आठ फूट चौरस असून मध्यभागी चौकोनी आकाराचे विलोभनीय शिवलिंग आहे. शिवलिंगावर एकापुढे एक असे दोन शाळुंखे आहेत. शिवलिंगाचा आकार चौकोनी आहे. गाभाऱ्याच्या दक्षिण भिंतीत चार बाय सहा फूट एवढ्या आकाराचा मोठा कोणाडा आहे. गाभाऱ्याचे छत हे रचनात्मक प्रमाणात कमी होत गेलेल्या चौरसाकृतीमध्ये आहे.

**जोते किंवा पीठ:** या मंदिराचे जोते दोन असून पहिले जोते साधे आहेत. ते जमिनीपासून तीन फूट उंचीचे आहे. या जोत्याह दगडाचे चार थर आहेत. या चोत्याचा वरील थर भिंतीच्या बाहेरील बाजूस आल्याने त्याचा उपयोग प्रदक्षिणा पथ म्हणून केला जातो. त्यावर असलेले दुसरे जोतेही तीन फूट उंचीचे असून त्यावर दगडांचे तीन थर आहेत. या चोत्याचा सर्वात वरील थर हा पागोळ्यासारखा बाहेरील बाजूस उतरता आहे. हा थर खालील थरांचे संरक्षण करतो. वरील थराच्या पुढील बाजूस उलट्या पानांच्या शिल्पांची रांग कोरलेली आहे. तर मूळ मंदिर हे या चौथर्युच्या पायऱ्यावर उभारलेले आहे.

**अंतराळ:** मंदिरास गाभारा व सभामंडप यांना जोडणारे अंतराळ आहे. हे अंतराळ आठ बाय बारा फूट आहे. याच्या प्रवेश मार्गावर दोन स्तंभ आहेत. सभा मंडपाचे वितान अर्धस्तंभ व स्तंभ यांच्या रचनेमुळे नव भागात विभागलेले आहे. मंडपाच्या मध्यभागी चौरस आकाराची रंगशिला आहे आणि चाहोकडून कडेला कक्षासणाची रचना आहे. या कक्षा सणावर एकूण १४ अर्धस्तंभ आहेत. त्यावर नक्षी व शिल्पे कोरलेली आहेत. रंगशिलेच्या कोपऱ्यावरील चार स्तंभ सुमारे आठ फूट उंचीचे असून तळखड्यावर कोणतेही शिल्प नाही. स्तंभाची रचना प्रथम चौकोन, गोल अष्टकोण, गोल व त्यावर चौकोन अशी आहे. या स्तंभांच्या चारही बाजूला विविध शिल्पे कोरलेली आहेत. त्यामध्ये शिकारीचे प्रसंग, गोपी वस्त्रहरण, मार्कंडेयानुग्रह शिव मुर्ती, गोपाल कृष्ण, विनाधारी संत इत्यादी शिल्पे व माकडे, हंस कुस्तीचे प्रसंग ही कोरलेले आहेत. तर उत्तरेकडील मुखमंडपाचे बाजूकडील स्तंभावर कामशिल्पे कोरलेली आहेत.

**भिंती व मंडप :** या मंदिराच्या भिंती दगड व चुन्यात बांधलेल्या असून त्या घडीव दगडातील आहेत. या मंदिराच्या भिंती एक चरणबद्ध बाह्यरेषा दिसतात. मंडपाला दक्षिणोत्तर व पूर्वेकडील असे तीन प्रवेश मार्ग आहेत. या मंडपात दक्षिणेला गणेश मूर्ती आहे ती उत्तराभिमुख असून त्या मूर्ती समोर उभे असलेले दोन फिरकीचे स्तंभ आहेत. गणेशाच्या मूर्तीजवळ उमा माहेश्वराची मूर्ती आहे. रंगशिलेच्या पूर्वेकडील कडेवर पितळी पत्र्याने मडवलेले पाच नंदी आहेत हे सर्व नंदी गाभाऱ्याकडे तोंड करून उभे आहेत. मंदिराच्या मुख्य सभामंडपा समोर काही अंतरावर नंदीमंडप आहे. तो चार खांबांनी बनवलेला असून उंच ओट्यावर आहे.

**भिंतीचा पृष्ठभाग:** आरंभिक टप्प्यातील मंदिराचे चौधरी हे साधे व उपयुक्त स्वरूपाचे आहेत. त्याची जमिनीपासून मंदिराची उभारणी करणे हा हेतू असतो. हे जोते दगडाने बांधलेले असून विस्तारलेले व सजावटी शिवायचे आहेत. तर चौधरी हे एकावर एक अशा दगडांच्या थरांचे आहेत. पहिल्या टप्प्यातील मंदिराची भिंत ही दगड व चुन्यात बांधलेली दिसून येते. दगड हे सपाट आहेत आणि प्रत्येक थरामध्ये बदलणारे लंबकेंद्रीत जोड आहेत. भिंती पागोळ्याच्या खालील दगडी जाळी सह किंवा जाळी शिवाय साध्या आहेत. या भिंतींमध्ये हस्त थोड्याफार प्रमाणात गुंतवलेले दिसतात. तर पागोळ्यावरील भिंत दगड व विटांमध्ये बांधलेली आहे. शंभू महादेवाचे हे मंदिर पुरातन स्थापत्यचा उत्कृष्ट नमुना मानला जातो. खांबावर व भिंतीवर दगडी शिल्पे कोरल्यामुळे या स्थापत्याची शैली वैशिष्ट्यपूर्ण वाटते. मंदिराच्या मुख्य मंडपातील नंदीजवळ मंदिराचे फिरते खांबा हा तत्कालीन वास्तुशास्त्राचा एक चमत्कार मानला जातो. देवळात पोर्तुगीज ठेवण्याची एक प्रचंड मोठी घंटा दगडी खांबावर लटकवलेली आहे. शंभू महादेवाच्या मंदिराच्या उत्तरेस पांढऱ्या शिखराचे हेमाडपंती शैलीचे बळीचे मंदिर आहे. तिथे शिवपार्वतीच्या दोन पिंडी असून भला मोठा नंदी त्यासमोर बसला आहे. त्याच्या प्रांगणात दोन मोठे रांजण असून यात्रेच्या काळात भुत्या तेल्याची कावड त्यात ओतली जाते. हजारो शिवभक्त हे पाणी देवाचे तीर्थ म्हणून घेतात. श्री शंभू महादेव हे अखिल महाराष्ट्रातील मराठ्यांचे विशेषता छत्रपतींच्या भोसले घराण्याचे कुलदैवत मानले जाते. याच घराण्यातील मालोजीराजे भोसले यांनी मंदिराच्या पायथ्याशी भाविकांसाठी पाण्याचा तलाव बांधला होता. विशेष करून आजही तो आपले अस्तित्व टिकवून आहे. मालोजीराजे, शहाजीराजे, शिवाजी राजे आदी राजपुरुषांनी या शंभू महादेवाचे अनेकदा दर्शन

घेतल्याचे सांगण्यात येते. शिवाय पुण्यश्लोक अहिल्याबाई होळकर यांनीही या क्षत्री अनेक बारवा बांधल्या आहेत.

अशा या सातारा जिल्ह्यातील पर्यटन क्षेत्र म्हणून नावारूपास आलेल्या शिखर शिंगणापूर येथील श्री शंभू महादेवाचे मंदिर हे लाखो भक्तांचे व पर्यटकांचे मुख्य आकर्षण बनले आहे. महाराष्ट्राच्या सर्वच भागातून म्हणजेच वराड, खानदेश, नाशिक, औरंगाबाद, नांदेड, बीड, लातूर, सोलापूर, कोल्हापूर यासारख्या विविध भागातून त्याचबरोबरच कर्नाटक, गोवा, मध्य प्रदेश या महाराष्ट्राच्या बाहेरील राज्यातून ही लाखो भक्तगण या तिर्थक्षेत्रास तथा ऐतिहासिक पर्यटन स्थळी शंभू महादेवाचे दर्शन घेण्यासाठी मोठ्या श्रद्धेने येतात.

**स्वयं अध्ययन प्रश्न क्र. १**

योग्य पर्याय निवडून रिकाम्या जागा भरा

१. शिखर शिंगणापूर हे ...... जिल्ह्यातील देवस्थान आहे

अ) सातारा ब) पुणे क) कोल्हापूर ड) सोलापूर

२. प्रतिनिधी घराणे .....संस्थानाचे राजघराणे होते

अ) सातारा ब) औंध क) अक्कलकोट ड) कुरुंदवाड

३. यमाई देवी ..... घराण्याची कुलदेवता आहे

अ) भोसले ब) जाधव क) शिंदे ड) प्रतिनिधी

४. ..... यांनी साताऱ्यास मराठी सत्तेचे राजधानी केली

अ) शिवाजी महाराज ब) संभाजी महाराज क) राजाराम महाराज ड) यापैकी नाही

५. ..... छत्रपती शाहू महाराजांनी अदालत वाडा बांधला

अ) १७१० ब) १७२० क) १७३० ड) १७४०

## २.२.२ कोल्हापूर सर्किट (विभाग)

कोल्हापूर हे प्राचीन शहर असून दक्षिणेतील सर्वात मोठे संस्थान म्हणून ओळखले जाते. कोल्हापूर नगरीला समृद्ध वारसा लाभलेला असून या विभागात ऐतिहासिक पर्यटनाच्या दृष्टीने अनेक स्थळांना महत्त्व प्राप्त झाले आहे. पैकी आपण अभ्यासाच्या सोयीसाठी कोल्हापूर, पन्हाळा व ज्योतिबा इत्यादी ऐतिहासिक पर्यटन स्थळांचे महत्त्व लक्षात घेणार आहोत.

### अ) कोल्हापूर

कोल्हापूर ही एक प्राचीन नगरी असून तिला विविध नावाने ओळखले जाते. मौर्य, सातवाहन, चालुक्य, राष्ट्रकुट, शिलाहार, यादव, बाहामणी, आदिलशाही, मराठा या राजघराण्यांचा वारसा लाभल्यामुळे

ऐतिहासिक, सांस्कृतिक, धार्मिक व राजकीय केंद्र म्हणून कोल्हापूर नावारूपास आले आहे. याशिवाय महालक्ष्मीचे (अंबाबाई) निवासस्थान असल्यामुळे यास दक्षिण काशी या नावाने ही संबोधले जाते. तर पुढे कोल्हापूर ला मराठ्यांच्या इतिहासात छत्रपतींची एक स्वतंत्र गादी म्हणून विशेष स्थान होत.

भौगोलिक स्थान: कोल्हापूर हे जिल्ह्याचे ठिकाण असून शहराच्या पूर्वेला अंशतः कृष्णा नदी व कर्नाटकातील बेळगाव जिल्हा तर पश्चिमेला सह्याद्रीच्या पर्वतरांगा दक्षिणेला हिरण्यकेशी नदी व गडहिंग्लज चंदगड आजारा तालुक्यांची ठिकाणे आणि उत्तरेला वारणा नदी व ऐतिहासिक पन्हाळा अशा सीमा आहेत. कोल्हापूर जिल्हा हा समुद्रसपाटी पासून सुमारे ५४६ मी. उंचीवर असून तेथील हवामान समशितोष्ण स्वरूपाचे आहे. कोल्हापूर जिल्ह्यात प्रामुख्याने कृष्णा, पंचगंगा, ताम्रपर्णी, वेदगंगा, हीरण्यकेशी, वारणा, भोगावती, यासारख्या महत्त्वाच्या नद्या वाहतात. तर प्रशासकीय दृष्ट्या कोल्हापूर जिल्ह्यात एकूण १२ तालुके असून त्यामध्ये चंदगड, भुदरगड, आजरा, गडहिंग्लज, पन्हाळा, शाहूवाडी, कागल, करवीर, राधानगरी, बावडा, शिरोळ आणि हातकणंगले यांचा समावेश होतो.

**नावाची पार्श्वभूमी:** ऐतिहासिक कोल्हापूर ही नगरी विविध नावांनी ओळखली जाते. जसे की कलापूर, कोलापूर, कोल्हापूर, करवीर इत्यादी नावांचा पौराणिक साहित्य, करवीर महात्म्य, ताम्रपट, गॅझेट, शिलालेख यासारख्या विविध संदर्भ साधनां मधून उल्लेख मिळतो. पद्मपुराणातील करवीर खंडात या क्षेत्राचे महात्म्य नोंदवले असल्याने त्याचे प्राचीनत्व लक्षात येते. या क्षेत्रास दक्षिण काशी म्हणूनही संबोधले जाते. प्राचीन काळी कोल्हापूर या शहरास करवीर असे संबोधले जात असून सध्या करवीर हे स्वतंत्र शहर नसून कोल्हापूर जिल्ह्यातील एका तालुक्याचे ठिकाण आहे. कोल्हापूर नावाच्या उत्पत्ती बद्दल अनेक आख्यायिका पाहावयास मिळतात. विशेषतः दंतकथेनुसार पूर्वी या भागावर कोल्हासूर व करवीर या पिता पुत्रांचे राज्य होते. त्यांच्या अत्याचाराला कंटाळून देवी महालक्ष्मी ने त्रंबोली च्या साह्याने त्यांचा वध केला. पण मृत्यू समयी त्यांनी अशी इच्छा व्यक्त केली की या भागाला आपले नाव द्यावे. यावरून या प्रदेशाला कोल्हापूर हे नाव पडले असावे. शिवाय कलेच्या अस्तित्वामुळे, आश्रयामुळे व विकासामुळे या नगरीला कलापूर असेही संबोधले गेले. शिवाय तमिळ भाषेत कोल्ल म्हणजे दरी असा अर्थ होत असून त्यानुसार डोंगर दर्यांचा परिसर असलेल्या या गावाचा कोल्लापूर पुढे कोल्हापूर असा उल्लेख मिळतो.

**विविध राजवटी:** कोल्हापूर मध्ये विविध राजवटी होऊन गेल्या. सुरुवातीला द्रविडांची सत्ता होती असे मत प्रा. के.जी कुंदनगार यांनी आपल्या लेखात नोंदवले आहे. इ.स पूर्व तिसऱ्या शतकात कोल्हापूरचा हा भाग मौर्य राजवटीच्या ताब्यात असल्याचे ब्रह्मपुरी येथील मौर्यकालीन नाणी व बौद्ध लेणी यावरून स्पष्ट होते. पुढे सातवाहन राज्यकर्त्यांनी कोल्हापूर भागावर राज्य केले. त्यानंतर हा प्रदेश राष्ट्रकूट सत्तेच्या अधिपत्याखाली गेला. त्याचवेळी बदामीच्या चालुक्यांनी राष्ट्रकुटांचा पराभव करून कोल्हापूरवर राज्य केले. या काळात महालक्ष्मी मंदिराचा उल्लेख मिळतो. त्यामुळे कोल्हापूरचे धार्मिक महत्त्व वाढून कोल्हापूरला दक्षिण काशी म्हणून ओळखले जाऊ लागले. राष्ट्रकूटांच्या असतानांतर शिलाहारांचा उदय झाला. शिलाहार राजा भोज दुसरा याच्या काळात कोल्हापूरला विशेष राजकीय महत्त्व प्राप्त झाले. त्याने सण ११८७ मध्ये शिलाहार घराण्याची राजधानी बदलून कोल्हापूरला प्रस्थापित केली. त्याच्याच काळात ऐतिहासिक रांगना,

सामानगड, विशालगड, भुदरगड यासारखे महत्त्वाचे किल्ले बांधले गेले. राजा शिंगण याने शिलाहार राजा भोज याचा पराभव करून कोल्हापूर परिसरावर देवगिरीच्या यादवांचे राज्य प्रस्थापित केले. बाहामणी सत्तेच्या विघटनानंतर कोल्हापूर वर विजापूरच्या आदिलशहाची सत्ता प्रस्थापित झाली. आदिलशाहीच्याच काळात कोल्हापूरचे राजकीय महत्त्व लक्षात घेऊन पन्हाळ्यावर जिल्ह्याचे ठिकाण निर्माण करून तिला उपराजधानीचे महत्त्व प्राप्त झाले. पुढे मराठ्यांच्या कालखंडात शिवाजी महाराजांनी इ. स. १६५९ मध्ये विजापूरचा सरदार अफझलखानाच्या वधानंतर पन्हाळा किल्ला जिंकून या परिसरावर वर्चस्व निर्माण करण्याचा प्रयत्न केला. पुढे मोगल मराठा संघर्षात कोल्हापूर परिसराला अधिकच महत्त्व प्राप्त झाले होते. औरंगजेबाच्या मृत्यूनंतर संभाजी पुत्र शाहूंची मोगलांच्या कैदीतून सुटका झाल्यामुळे ताराबाई व शाहू यांच्यात मराठी राज्याच्या गादीसाठी सत्ता संघर्ष होऊन त्यातूनच इ. स. १७१० मध्ये ताराबाई यांनी आपला पुत्र शिवाजी (पहिले) यास पन्हाळा येथे गादीवर बसवून कोल्हापूर राज्याची स्थापना केली. तर पुढे ताराबाईच्या सवतीचा मुलगा कोल्हापूरचे संभाजी (पहिले) हे कोल्हापूरच्या गादीवर आले. शिवाजी दुसरे यांच्या कारकिर्दीत प्रशासकीय सोयीसाठी करवीरची राजधानी पन्हाळ्यावरून कोल्हापूरला स्थापन करण्यात आली परिणामी कोल्हापूर शहराच्या विकासाला मोठी चालना मिळाली पुढे छत्रपती शाहूंच्या कारकीर्दीतच कला, क्रीडा, शिक्षण, उद्योग, व्यवसाय, शेती, नाट्य, संगीत, चित्र यासारख्या विविध क्षेत्रात अमुलाग्र बदल होऊन कोल्हापूरचा विविधांगी सर्वांगीण विकास झाला. त्यांच्या निधनानंतर कोल्हापूरच्या राज्यकारभाराची सूत्रे राजाराम महाराज यांच्याकडे आली. त्यांनी शाहू महाराजांच्याच पावलावर पाऊल ठेवून विविध कलांना राजाश्रय दिल्यामुळे पुढील काळात कोल्हापूर हे कलापूर म्हणून प्रसिद्धीस आले. १९४७ रोजी भारताला स्वातंत्र्य मिळाल्यानंतर १ फेब्रुवारी १९४९ मध्ये कोल्हापूर संस्थानाचे भारतीय संघराज्यात विलीनकरण झाले.

**ऐतिहासिक पर्यटन:** कोल्हापूर हे महाराष्ट्रातील ऐतिहासिक पर्यटनाचे मुख्य ठिकाण म्हणून ओळखले जाते. कारण कोल्हापूर नगरीत व कोल्हापूर जिल्ह्याच्या विविध भागात अनेक ऐतिहासिक पर्यटन स्थळे पर्यटकांना आकर्षित करतात.

**कोल्हापूरचे अंबाबाई (महालक्ष्मी) मंदिर:**

महाराष्ट्रातील आदिशक्तीच्या एकूण साडेतीन शक्तीपीठांपैकी एक पूर्ण पीठ म्हणून कोल्हापूरच्या अंबाबाईस ओळखले जाते. महालक्ष्मी मंदिराच्या स्थापनेपासून कोल्हापूर हे धार्मिकदृष्ट्या दक्षिण काशी म्हणून प्रसिद्धीस आले. महालक्ष्मीचे करवीर पीठ हे आदिमायेचे आद्य पीठ असून येथे जल रूपाने महादेव, पाषाणु रूपाने विष्णू, वृक्षरूपाने देवता व चालुका रूपाने मुनिजन वास्तव्य करीत आहेत असा उल्लेख प्राचीन धर्मग्रंथात आढळतो. कोल्हापूरची देवी अंबाबाई या नावाने लौकिकात प्रसिद्ध असली तरी आध्यात्मिक ग्रंथात तिचा नामोल्लेख महालक्ष्मी म्हणूनही केला जातो. महालक्ष्मी मंदिराच्या निर्मिती बद्दल संशोधकांचे विविध मते आढळतात. जशी की, डॉ. कुंदनगार राजाराम महाविद्यालयातील प्राक्ष्य विद्या विशारद लेखकाच्या मते इ.स. १०९ मध्ये राजा कर्ण देव कोकणातून कोल्हापुरात आला त्यावेळी महालक्ष्मीची मूर्ती छोट्या मंदिरात होती शिवाय हा सर्व भाग आरण्याने भरलेला होता तेव्हा राजा कर्णदेवाने आजूबाजूचे जंगल तोडून हे मंदिर उजेडात आणले म्हणजेच त्यांनी १९२९ मध्ये प्रसिद्ध केलेल्या आपल्या पुस्तकेत कोल्हापूरच्या

महालक्ष्मीचे मंदिर हे सहाव्या शतकानंतर होऊन गेलेल्या चालुक्य राजा कर्ण याने बांधले असा संशोधकीय निष्कर्ष काढला आहे. तर डॉ. मिराशींच्या मते हे मंदिर ९ व्या शतकात करहाटक (कराड) येथील सिंद देव राजाने बांधले असावे. पुढे १२ व्या शतकात शिलाहार राजांनी महासरस्वती मंदिर व महालक्ष्मी प्रदक्षिणामार्ग बांधला तर सन १२१८ मध्ये यादव राजवटीत महालक्ष्मी मंदिराचे महाद्वार बांधण्यात आले. तेराव्या शतकात कोल्हापूरमध्ये शंकराचार्य मठाची स्थापना झाली. शंकराचार्यांनी महालक्ष्मीचे धार्मिक महत्त्व लक्षात घेऊन या मंदिराची शिखरे, नगारखाना व कचेरीचे बांधकाम केले. अशाप्रकारे विविध राजवटींमध्ये महालक्ष्मी मंदिराचा विकास होत गेल्याचे दिसून येते.

महालक्ष्मी मंदिर हे महाराष्ट्रातील प्रमुख पर्यटन स्थळ असून हे मंदिर कोल्हापूर शहराच्या मध्यवस्तीत जुन्या राजवाड्याच्या वायव्य दिशेला आहे. मंदिराच्या सभोवताली चारी दिशांना दगडी तटबंदी असून चारी बाजूंना चार मुख्य दरवाजे आहेत हे मंदिर दोन मजली असून काळ्या पाषाणी दगडांनी बांधलेले आहे. मंदिराची बांधणी समभुज चौकोनात कमलाकृतीप्रमाणे बांधलेली आहे. मंदिराची रचना, स्थापत्यशैली आणि त्यावरील शिल्पकलेवर चालुक्य, शिलाहार, राष्ट्रकूट व यादव या राजवटींच्या बांधकाम शैलीचा प्रभाव दिसून येतो. गाभाऱ्यामध्ये सुंदर अशी महालक्ष्मीची मूर्ती सुमारे तीन फूट उंचीची काळ्या पाषाणाची आहे. देवीची मूर्ती एका चौकोनी दगडावर उभी असून ती चतुर्भुज स्वरूपाची आहे. हातामध्ये महाळुंग, गदा, ढाल व पानपत्र अशा वस्तू आहेत. मूर्तीच्या मस्तकावर मुकुट असून त्यावर शेषनागाची छाया धरली असून लिंग व योनी यांच्या आकृत्या आहेत. महालक्ष्मी चा गाभारा पश्चिमाभिमुख असून त्याच्या उत्तर, पूर्व आणि दक्षिण बाजूस अनुक्रमे व्यंकटेश, कात्यायनी व गौरीशंकर या देवता स्थापन केलेल्या आहेत. मुख्य गाभाऱ्यासमोर दोन दगडी मंडप असून त्यांना जोडूनच महाकाली व महा सरस्वती यांची दोन मंदिरे आहेत. त्यांच्यासमोर प्रत्येकी तीन दगडी मंडप असे एकूण आठ दगडी मंडपांचे आणि उपरोक्त तीन देवतांच्या मंदिरावरील तीन शिखरांचे मिळून हे मंदिर बनलेले आहे. अंबाबाईच्या मंदिर परिसरात सभोवताली अनेक देवदेवतांची मंदिरे आहेत. यामध्ये प्रामुख्याने श्री दत्त, सिद्धिविनायक, ज्योतिबा, नवग्रह, लक्ष्मीनारायण, म्हाळसाकांत, अतिबलेश्वर, काळभैरव, तुळजाभवानी, महादेव इत्यादी प्रमुख मंदिरांचा समावेश होतो. याचबरोबर सभोवताली भाविकांना पूजा आर्चा साठी लागणाऱ्या साहित्यांची अनेक दुकाने आहेत.

महालक्ष्मी मंदिरामध्ये वर्षभर विविध सण उत्सव साजरे केले जातात. या सण-उत्सवांमधून कोल्हापूरच्या सांस्कृतिक जीवनाचे दर्शन घडते. यामध्ये महालक्ष्मीच्या रथोत्सवाला विशेष महत्त्व आहे. हा उत्सव अश्विन शुक्ल अष्टमी अथवा अश्विनी पौर्णिमा या दिवशी होत होता पण पुढे राजर्षी शाहू महाराजांच्या कारकिर्दीत यामध्ये बदल होऊन जोतिबाच्या यात्रेसाठी आलेल्या भाविकांना पाहता यावा म्हणून तो चैत्र कृष्ण प्रतिपदेच्या दिवशी करण्यात येऊ लागला. त्यादिवशी फुलांनी सजवलेल्या रथामध्ये महालक्ष्मीची उत्सव मूर्ती अरूढ केले जाते. रथोत्सवाच्या मार्गावर रांगोळ्या घालून रस्त्याच्या दुतर्फा सुवासिनी आरती घेऊन उभ्या असतात. हत्ती, घोडे, उंट, बँड पथके, लेझीम पथके, ढोल अशा राजवैभवी लावाजम्यासह हा रथ महाद्वार मार्ग, गुजरी, भवानी मंदिर, बाळ गोपाळ तालीम, मिरजकर तिकिटी, बिनखांबी गणेश मंदिर या क्रमाने हा रथोत्सव मंदिरात मध्यरात्री पोहोचतो. या रथोत्सवाला हजारो देशी विदेशी पर्यटक उपस्थित

असतात. कोल्हापूरच्या सांस्कृतिक जीवनात शारदीय नवरात्र उत्सवाला अनन्यसाधारण महत्त्व आहे. नवरात्र काळात महालक्ष्मीची नऊ दिवस विविध रूपात पूजा बांधली जाते रोज रात्री देवीची, उत्सव मूर्तीची पालखी मिरवणूक काढली जाते. अंबाबाईच्या मंदिर स्थापत्य शैलीचे एक वैशिष्ट्य म्हणजे दरवर्षी सूर्य जेव्हा दोन वेळा विषुववृत्तावर येतो तेव्हा मावळत्या सूर्याची किरणे मूर्तीच्या सर्वांगावर पडून गाभारा प्रकाशमय होतो. त्यालाच किरणोत्सव असे म्हणतात. अशाप्रकारे महालक्ष्मी मंदिरात वर्षभरामध्ये विविध प्रकारचे सण उत्सव मोठ्या उत्साहात साजरे केले जातात.

अशाप्रकारे कोल्हापूरचे महालक्ष्मी मंदिर हे कोल्हापूरच्याच नव्हे तर महाराष्ट्राच्या सामाजिक सांस्कृतिक व धार्मिक जीवनातील अत्यंत महत्त्वाचे शक्तिपीठ मानले जाते या शक्तीपीठाने कोल्हापूरच्या ऐतिहासिक पर्यटनात महत्त्वपूर्ण योगदान दिलेले आहे. ऐतिहासिक कोल्हापुरात अंबाबाईच्या मंदिराशिवाय ब्रह्मेश्वर मंदिर, महाकाली मंदिर, फिरंगाई मंदिर, एकविरा मंदिर, टेंबलाई मंदिर, बिनखांबी गणेश मंदिर,शालिनी पलेस, जुना राजवाडा, रंकाळा, पंचगंगा घाट, इत्यादी महत्त्वाची मंदिरे व स्थळे असून ती ऐतिहासिक, सांस्कृतिक व धार्मिक पर्यटनासाठी महत्त्वाची मानली जातात. याचबरोबर ज्योतिबा, नरसिंह वाडी, बाहुबली व हिंदू, जैन, मुस्लिम धर्मीय विविध स्थळांमुळे कोल्हापूरचा पर्यटन विकास मोठ्या प्रमाणात झाला आहे. कोल्हापूर मधील ऐतिहासिक पर्यटनाचा एक स्त्रोत म्हणून वस्तू संग्रहालयांची भूमिका ही महत्त्वाची ठरलेली आहे. कारण सांस्कृतिक, शैक्षणिक व ऐतिहासिक भूमिका पार पाडणारी ही संग्रहालये कोल्हापुरात येणाऱ्या पर्यटकांचे आकर्षण बिंदू ठरलेले आहे.

**ब) पन्हाळा**

कोल्हापूर जिल्ह्यात पूर्वीपासूनच किल्ल्यांना अनन्यसाधारण महत्त्व होते. अनेक राजवटींमधील राजकर्त्यांनी आपल्या राज्याच्या संरक्षणासाठी जिल्ह्यातील विविध ठिकाणी किल्ले बांधण्यास प्राधान्य दिल्याचे दिसून येते. त्यामुळे कोल्हापूर जिल्ह्यात किल्ल्यांची संख्या मोठी असून त्यामध्ये प्रामुख्याने पन्हाळा, गगनगड, रांगना, भुदरगड, पारगड, कलानंदीगड, सामानगड या सारख्या गडकिल्यांचा समावेश होतो. आज जिल्ह्यातील हे सर्वच गडकिल्ले ऐतिहासिक पर्यटनाची महत्त्वाची केंद्रे बनलेली दिसतात. कोल्हापूर जिल्ह्यातील अनेक किल्ल्यांपैकी अत्यंत महत्त्वाचा असलेला किल्ला म्हणजेच पन्हाळा होय.

**पन्हाळा किल्ल्याची पार्श्वभूमी:** पन्हाळा हे ठिकाण कोल्हापूर शहराच्या वायव्य दिशेस सुमारे २० कि.मी अंतरावर असून समुद्रसपाटीपासून ८४५ मी. उंचीवर आहे. दक्षिणेचे प्रवेशद्वार म्हणून पन्हाळ्यात प्राचीन काळापासून संरक्षण व्यवस्थेत अनन्य साधारण महत्त्व लाभले होते. आज पन्हाळा हे महाराष्ट्रातील प्रमुख ऐतिहासिक व थंड हवेचे पर्यटन स्थळ म्हणून विकसित झाले आहे. पुराण काळामध्ये याचे नाव ब्रह्मगिरी असे होते. ब्रह्मदेवाने येथे प्रजा उत्पन्न करण्यासाठी सोमेश्वर लिंग व सोमेश्वर सरोवर निर्माण केले यावरून ब्रह्मगिरी नाव पडले असी एक दंतकथा आहे. शिवाय दुसऱ्या एका दंत कथेनुसार पराशर ऋषींच्या तपश्चर्येत येथे नागांनी विघ्ने आणली म्हणून पराशर ऋषींनी नागांना शाप दिला. परंतु नाग पराशर ऋषींना शरण

आल्याने त्यांनी हा शाप मागे घेतला. म्हणून या ठिकाणास नागांच्या स्मरणार्थ पन्नालय असे नाव पडले. तर प्राचीन शीलालेखामध्ये प्रणालक किंवा पद्मनाल असा उल्लेख पन्हाळ्याचा सापडतो.

**विविध राजवटी:** पन्हाळा किल्ल्याचा एकूण विस्तार साडेचार मैलांचा आहे. पन्हाळा हे ठिकाण भौगोलिक दृष्ट्या कोकण व देश यावर अंमलबसवण्याच्या दृष्टीने महत्त्वाचे व नाकेबंदीचे ठिकाण होते त्यामुळे पन्हाळा ज्याच्या हाती त्याची सत्ता कोकणावरती असे समजले जात होते यामुळेच ऐतिहासिक पन्हाळ्यावर विविध राजवटींनी आपले वर्चस्व ठेवण्याचा प्रयत्न केला होता. पन्हाळा किल्ला कोणी बांधला याविषयी संशोधकांच्या मध्ये मतभेद आढळतात. जसे की गुळवणी यांच्या मतानुसार या किल्ल्याची बांधणी राष्ट्रकूट व चालुक्य काळात झाली असावी. तर डी. बी. पारसनीस यांनी शिलाहार राजा भोज दुसरा याने हा किल्ला बांधला असल्याचा उल्लेख केला आहे. शिलाहार घराण्यातील राजा भोज दुसरा याने आपली राजधानी ११९२ मध्ये कोल्हापूरला आणली व पुढे पन्हाळा किल्ल्यावर स्थलांतरित केली यामुळे पन्हाळा किल्ल्याचे महत्व वाढले. त्यानंतर पन्हाळा किल्ल्यावर देवगिरीच्या यादवांची सत्ता प्रस्थापित झाली. राजा सिंघनदेव याने राजा भोज दुसरा याचा पराभव करून या किल्ल्यावर आपले वर्चस्व प्रस्थापित केले. तर पुढे १३३८ मध्ये अल्लाउद्दीन खिलजीने देवगिरीच्या यादवांची सत्ता नष्ट करून हा प्रदेश आपल्या ताब्यात घेतला. काही कालावधीतच या प्रदेशावर बहामनींची सत्ता प्रस्थापित झाली असली तरी मराठा पाळेकर राजा शिर्के यांचे किल्ल्यावर वर्चस्व होते. पुढे आदिलशाहीच्या नियंत्रणाखाली हा किल्ला आल्यानंतर संरक्षणाच्या दृष्टीने या किल्ल्यास महत्त्व येऊन आदिलशाहीची उपराजधानी म्हणून या किल्ल्यास महत्त्व प्राप्त झाले.

मराठ्यांच्या इतिहासात तर पन्हाळा किल्ल्यास अनन्यसाधारण महत्त्व होते. छत्रपती शिवाजी महाराजांनी अफजलखानाच्या वधानंतर पन्हाळ्यावर मराठ्यांचे वर्चस्व प्रस्थापित केले. पुढे १६६० मध्ये आदिलशहाने सिद्धी जोहार याला पाठवून हा किल्ला आपल्या ताब्यात आणला होता. पण महाराजांनी १६७३ मध्ये पन्हाळ्यावर पुन्हा मराठ्यांचे वर्चस्व प्रस्थापित करून त्यास सुभा अथवा प्रांताचे ठिकाण म्हणून निर्माण केले. यामुळे मराठ्यांची दक्षिणेकडील राजधानी म्हणून पन्हाळा किल्ल्यास महत्त्व प्राप्त झाले. पुढे मोगल मराठा संघर्षात पन्हाळा किल्ल्याने महत्त्वपूर्ण योगदान दिले. राजाराम महाराजांच्या मृत्यूनंतर महाराणी ताराबाई यांनी मोगलांशी संघर्ष पुढे चालू ठेवला होता त्यामुळे पन्हाळ्यास मराठ्यांच्या राजधानीचेच स्वरूप प्राप्त झाले होते. औरंगजेबाने मराठ्यांचे सत्ता केंद्र असलेला हा किल्ला घेण्यासाठी १७०१ मध्ये मोगली फौजा पाठवल्या. मराठ्यांनी प्रयत्नाची शर्त करून सुद्धा शेवटी वाटाघाटी झाल्या आणि मोठ्या खंडणीच्या मोबदल्यात पन्हाळा मोगलांच्या ताब्यात देण्यात आला. तेव्हा औरंगजेबाने पन्हाळ्याचे नाव बदलून नबीशाहदुर्ग असे ठेवले पण औरंगजेबाच्या मृत्यूनंतर मराठ्यांनी हा किल्ला पुन्हा मुघलांकडून काबीज केला. पुढे मोघलांच्या कैदेतून शाहूंची सुटका झाल्यानंतर मराठी सत्तेच्या गादीसाठी शाहू व ताराबाई यांच्यात सत्ता संघर्ष झाला. यातूनच १७१० मध्ये साताऱ्या बरोबरच कोल्हापूर ची गादी निर्माण होऊन करवीरच्या राजधानीचे महत्त्व पन्हाळ्यास प्राप्त झाले.

**पन्हाळ्यावरील दरवाजे:** किल्ला बांधणीतील महत्त्वाचा भाग म्हणजे किल्ल्याचे दरवाजे होय. पन्हाळा किल्ल्यावर संरक्षणाच्या दृष्टीने योग्य ठिकाणी दरवाजे बांधण्यात आलेले आहेत. जसे की गडाच्या पूर्वेकडील

भागावर चार दरवाज्याचे भग्न अवशेष पहावयास मिळतात. पूर्वी त्या ठिकाणी बंदिस्त तट होता त्या ताटाच्या पुढच्या बाजूला चार दरवाजा किंवा चौक दरवाजा असे नाव होते. कारण येथे एकात एक असे चार दरवाजे होते. तर किल्ल्याचे पश्चिमेकडील प्रवेशद्वार म्हणजेच तीन दरवाजा होय. हा दरवाजा तीन मजली असून याचे बांधकाम संपूर्णपणे शिष्य व चुन्यामध्ये केलेले आहे. या दरवाजाच्या कमानीवर दोन वाघांची चित्रे असून त्यांच्या पायामधून पंख काढलेले आहेत त्याला पंचाक्षरी असे म्हणतात. तीन दरवाज्याची रचना अतिशय कलात्मक आणि वैशिष्ट्यपूर्ण असून सुबक नक्षीकाम केलेले आहे. या दरवाजाचे संपूर्ण बांधकाम दगडी असून येथील शिलालेखावरून हा दरवाजा सण ९८७ साली बांधल्याची माहिती मिळते.

**जलव्यवस्था:** मुबलक पाण्याची उपलब्धता हे किल्ला बांधणीचे मुख्य सूत्र असते. पन्हाळा किल्ल्यावर बारमाही पाणीपुरवठा होण्यासाठी विविध ठिकाणी झरे, विहिरी, तलाव यांच्या माध्यमातून जल व्यवस्था करण्यात आलेली आहे. तीन दरवाज्याजवळ अंधार बाव म्हणजे विहीर आहे. किल्ल्याच्या मध्यवर्ती ठिकाणी प्रचंड जलसाठा असणारा सोमेश्वर तलाव आहे. नागझरी हा एक किल्ल्यावरील मुख्य जलसाठा होय. या झऱ्याच्या तिन्ही बाजूला दगडी चौक बांधलेले असून दगडी तोटीतून पाणी चौकात सोडलेले आहे. करवीर महात्म्यामध्ये या झऱ्याचे वर्णन तर त्रैलोख्यातील पावन तीर्थ असे मिळते. याशिवाय साधोबा दर्ग्याजवळ एक तलाव असून त्याला साधोबा तलाव असे म्हणतात.

**किल्ल्यावरील बुरूज:** किल्ल्यावर अनेक महत्त्वाच्या ठिकाणी बुरुज बांधलेले आहेत. या बुरुजांचा उपयोग पहारा देण्यासाठी आणि त्यावर तोफा ठेवून गडावर हल्ला करणाऱ्या शत्रूवर मारा करण्यासाठी केला जात असे. यामध्ये किल्ल्याच्या पूर्व बाजूला काली बुरुज आहे. किल्ल्याच्या पश्चिमेकडे पुसाटी बुरुज असून पश्चिमेकडील सर्व भागाचे संरक्षण करण्याची जबाबदारी या बुरुजावर होती. तर दुतोंडी बुरुजाच्या दोन्ही बाजूने चढणे आणि उतरण्यासाठी पायऱ्या असल्यामुळे या बुरुजाला दुतोंडी बुरुज म्हणतात. त्याच्याच बाजूला दौलती बुरुज आहे.

**महत्त्वाच्या इमारती:** पन्हाळा येथे प्रशासकीय कामासाठी व किल्ल्याच्या संरक्षणासाठी विविध महत्त्वाच्या इमारती बांधलेल्या पहावयास मिळतात. पन्हाळा किल्ल्यावरील अतिशय आकर्षक इमारत म्हणजे सदर ई महल म्हणजेच सज्जा कोटी होय. किल्ल्याच्या मध्यभागी बालेकिल्ला बांधलेला आहे यालाच अंबरखाना इमारत असेही संबोधले जाते. या इमारतीचा उपयोग धान्य ठेवण्यासाठी केला जात असे. अंबरखाना येथे तीन कोठारे असून त्यांना गंगा शिंधू व यमुना अशी नावे देण्यात आलेली आहेत त्यात भात नाचणी व वरी यांची साठवण होत असे. तर किल्ल्यावरील भव्य व देखण्या इमारतीमधील एक आकर्षक इमारत म्हणजेच रेडेमहाल होय. धर्मकोटी ही इमारत न्यायालयासाठी वापरली जात होती.

**किल्ल्यावरील मंदिरे व समाध्या:** पन्हाळा किल्ल्यावर विविध काळात बांधलेली अनेक मंदिरे, दर्गे व समाध्या आहेत. जसे की किल्ल्यावरील मध्यवर्ती भागावर असणारे एक भव्य मंदिर म्हणजे संभाजी देवालय होय. करवीर राज्यातील संभाजी राजे यांचे हे मंदिर आहे. मंदिरातील गाभाऱ्यामध्ये पंचधातूयुक्त सिंहासनावर संभाजी राजे यांचे प्रतिमा असून तेथे बिचवा, ढाल, तलवारी ठेवलेल्या आहेत. महाराणी जिजाबाई यांचे

मंदिर किल्ल्यावर असून जिजाबाई या कर्तबगार आणि मत्सद्दी शासक होत्या. त्यांनी पेशव्यांपासून कोल्हापूर राज्य सुरक्षित ठेवले म्हणून त्यांचे येथे मंदिर बांधले आहे. तर साधोबा तलावाजवळ हरिहरेश्वराचे मंदिर आहे. तर काली बुरूजाकडील भागात सुंदर नक्षीकाम केलेले विठ्ठल मंदिर आहे. पन्हाळा किल्ल्यावर अनेक लढाया झाल्या. लढायात अनेक वीर धारातीर्थी पडले .त्यातील काहींची स्मारके म्हणून समाध्या बांधण्यात आल्या आहेत. पैकी सोमेश्वर उद्यानासमोर रामचंद्रपंत अमात्य यांची समाधी आहे. करवीर राज्य संस्थापिका महाराणी ताराबाई यांचे पुत्र कोल्हापूरचे पहिले शिवाजी यांची समाधी पन्हाळ्यावर आहे.

अशाप्रकारे पन्हाळा किल्ल्यास प्राचीन काळापासून ऐतिहासिक स्वरूपाची उज्वल परंपरा लाभलेली दिसून येते. किल्ल्यावर असणारी विविध बांधकामे, इमारती, मंदिरे, समाध्या, दर्गे, दरवाजे हे आजही किल्ल्याच्या ऐतिहासिक परंपरेची साक्ष देतात. या विविध प्रकारच्या वास्तुशिल्पांमुळेच पन्हाळ्यास ऐतिहासिक पर्यटनाच्या दृष्टिने विशेष महत्त्व प्राप्त झाले आहे. शिवाय या किल्ल्याच्या भौगोलिक स्थानामुळे हे महाराष्ट्रातील प्रमुख थंड हवेचे ठिकाण म्हणून विकसित झाले आहे.

**क) जोतिबा** – कोल्हापूर जिल्ह्यातील एक प्रमुख धार्मिक तिर्थक्षेत्र म्हणून जोतिबा मंदिराला ओळखले जाते. ज्योतिबा देवालय हे धार्मिक व ऐतिहासिक पर्यटन स्थळ म्हणून प्रसिद्ध पावलेले आहे.

**जोतिबाचा पुर्व इतिहास:** जोतिबा देवस्थान हे कोल्हापूरच्या वायव्य दिशेस १५ कि.मी अंतरावर वसलेले आहे. ज्योत या शब्दापासून ज्योतिबा या शब्दाची निर्मिती झाली. ज्योत हा आर्यांचा देव असून त्याचे मूळ स्थान हिमालयातील ज्वालामुखी होय. ही दीपज्योत देवाचे प्रतीक म्हणून महाराष्ट्रात आल्यावर प्रथम दीप स्वरूपात स्थापना केली. नंतर मूर्ती कलेचा विकास झाल्यावर त्याची मूर्ती बसवण्यात आली असे मत भास्करराव जाधव यांनी मांडले आहे. म्हणजे वाडी रत्नागिरी येथील ज्योतिबा देव मूळचा सिंध प्रांतातील आहे. कारण सिंध प्रांतातील चंगभला असा शब्दप्रयोग आपल्याकडे आलेला आहे. हा शब्दप्रयोग चांगले भले होवो अशा अर्थाने वापरला जातो. मात्र पुढे चंगभलं या शब्दाचा चांगभलं शब्दात अप्रभंश झाला. सध्या जोतिबाच्या नावानं चांगभलं अशी घोषणाही या मताला पोषक अशी ठरणारीच असल्याचे दिसून येते. शिवाय ज्योतिबाला केदारनाथ, केदारलिंग अथवा केदार अशा विविध नावांनी संबोधले जाते. ज्योतिबा बद्दल अशी ही धार्मिक आख्यायिका सांगितली जाते की, कोल्हापूर प्रांतात कोल्हासूर व रत्नासूर या असूरांच्या त्रासाला कंटाळून महालक्ष्मीने यापासून मुक्ती मिळवण्यासाठी ज्योतिबाची मदत मागितली. तेव्हा महालक्ष्मीच्या मदतीसाठी जोतिबा दक्षिणेकडे आले आणि जोतिबा व त्याचा सेनापती काळभैरव यांनी महालक्ष्मी व यमाईच्या मदतीने या सर्व असुरांचा समूळ नाश केला. त्यानंतर महालक्ष्मीचा कोल्हापूर येथे राज्याभिषेक करून तिला पुन्हा राज सिंहासनावर बसविले. म्हणजेच महालक्ष्मीच्या आग्रहाखातर ज्योतिबा वाडी रत्नागिरी येथे राहिले. पुढे मंदिराचा विकास होत जाऊन ते पवित्र धार्मिक स्थळ अथवा पर्यटन केंद्र म्हणून विकसित झाले.

**श्री ज्योतिबा मंदिर:** वाडी रत्नागिरी येथे आज अस्तित्वात असलेले भव्य स्वरूपाच्या श्री ज्योतिबा मंदिराच्या जागेवर पूर्वी लहानच मंदिर होते. हे मंदिर कराड जवळील किवळगावचे नावजी साया नामक

भक्ताने बांधले होते. सध्याचे भव्य दिव्य व प्रशस्त स्वरूपाचे मंदिर सन १७२० मध्ये ग्वाल्हेरचे नरेश महाराज श्रीमंत राणोजी शिंदे यांनी पूर्वीच्याच मंदिराच्या ठिकाणी फिक्कट निळसर रंगाच्या दगडाचा वापर करून बांधले आहे. मंदिराच्या भिंतीवर विविध देवदेवतांच्या, यशांच्या शिल्पाकृती कोरलेल्या आहेत. मंदिराच्या सभोवताली यात्रे करूंसाठी अनेक ओवऱ्या म्हणजेच छोट्या खोल्या बांधलेल्या आहेत. देवालयात जाण्यासाठी तीन महाद्वारे असून त्यापैकी उत्तरेकडील दरवाजा थोडा मोडकळीस आला आहे. दक्षिणेकडील दरवाज्याच्या जवळ दगडी चौथरा आहे यास बंगाड असे संबोधले जाते. मुख्य मंदिरातील ज्योतिबा ची मूर्ती ही निळसर काळा पाषाणापासून बनवलेली आहे. ही मूर्ती चतुर्भुज स्वरूपाची असून मूर्तीच्या उजव्या हातात डमरू व तलवार आहे तर डाव्या हातात त्रिशूल व अमृतकलश आहे. ज्योतिबाचे वाहन घोडा तर उपवाहन शेषही त्याच्याजवळ आहेत. जोतिबा देवाची मूर्ती दक्षिणाभिमुख असून जोतिबाच्या डाव्या बाजूला गाभाऱ्यात महिषासुरमर्दिनीची मूर्ती आहे. जोतिबाच्या आसपासच्या परिसरात विविध देवदेवता आहेत. यामध्ये केदारेश्वराचे देवालय सन १८०८ मध्ये दौलतराव शिंदे यांनी बांधलेले आहे. या मंदिराच्या पुढे काही अंतरावरच चोपडाई मंदिर असून हे मंदिर हिंमतबहाद्दर प्रीतीराव चव्हाण यांनी सन १७५० मध्ये बांधलेले आहे. श्री ज्योतिबा मंदिरापासून काही अंतरावरच परशुरामाच्या मातेचे म्हणजेच यमाईचे प्रसिद्ध देवालय आहे. त्याचे बांधकाम श्रीमंत रानोजी शिंदे महाराज यांनी केले आहे. या देवालयासमोर दोन लहान तलाव आहेत .त्यामधील एक तलाव जमदग्नी या नावाने ओळखला जातो. तर दुसरा कोल्हापूरचे छत्रपती संभाजी महाराज यांच्या पत्नी जिजाबाई यांनी १७४० मध्ये बांधलेला आहे.

**जोतिबा देवालयाचे उत्सव:** ज्योतिबा देवालयाचे उत्सव म्हणून दरवर्षी विविध यात्रा संपन्न होतात. चैत्र पौर्णिमेला भरणारी जोतिबाची यात्रा ही फार मोठी यात्रा समजली जाते. कारण या यात्रेसाठी महाराष्ट्राबरोबरच कर्नाटक, उत्तर प्रदेश, मध्य प्रदेश, आंध्र प्रदेश, गुजरात या भागातून मोठ्या संख्येने लाखो भाविक दरवर्षी येतात. या यात्रेच्या दिवशी जोतिबाच्या नावानं चांगभलं चा प्रचंड मोठा जयघोष करण्यात येतो. गुलाल, खोबरे उधळणीमुळे जोतिबाचा परिसर गुलालमय आनंदमय व भक्ती सागरात बुडालेला असतो. या यात्रेचे वैशिष्ट्य म्हणजे सासनकाट्या हे होय. या शासनकट्यांची सरासरी उंची ३० ते ३५ फूट उंचीची असते. सासन काट्यांच्या वरच्या टोकावर भगवे कापड व जोतिबाची घोडेस्वार स्वरूपातील प्रतिमा बांधलेली असते. हिंम्मतबहाद्दर चव्हाण घराण्याची सासन काटी ही प्रथम मानाची काठी समजली जाते. या यात्रे शिवाय पाखळणीची यात्रा, नवरात्र उत्सव, रंगपंचमी, विजयादशमी, महाशिवरात्री व जोतिबाचे खेटे यासारखे अनेक उत्सव मोठ्या उत्साहात संपन्न होतात. या सर्वच उत्सवांमध्ये मोठ्या संख्येने भक्त जोतिबाचे दर्शन घेण्यासाठी येतात. दख्खनचा राजा श्री जोतिबा हे देवालय लाखो भाविकांचे श्रद्धास्थान आहे. यामुळे देश व विदेशातील पर्यटक येथे मोठ्या प्रमाणात भेट देण्यासाठी येतात.

अशाप्रकारे कोल्हापूर जिल्ह्याला धार्मिक, आर्थिक, सांस्कृतिक व ऐतिहासिक पर्यटनाचा समृद्ध वारसा लाभलेला आहे. या ऐतिहासिक परंपरेची तथा वारशाची साक्ष देणारी अनेक स्मारके, मंदिरे, स्थळे, किल्ले, कोल्हापूर जिल्ह्यामध्ये मोठ्या प्रमाणात आढळतात. या ऐतिहासिक पर्यटनामुळेच कोल्हापूरच्या सर्वांगीण विकासाला मोठी चालना मिळालेली दिसून येते.

**स्वयं अध्ययन प्रश्न क्र. २**

योग्य पर्याय निवडून रिकाम्या जागा भरा

१. कोल्हापूर ही नगरी ..... नावाने ही ओळखली जाते.

अ) महापौर  ब) रामपूर  क) बदलापूर  ड) करवीर

२. महालक्ष्मी मंदिरातील किरणोत्सव वर्षातून .....वेळा संपन्न होतो

अ) एक  ब) दोन  क) तीन  ड) चार

३. प्रसिद्ध ज्योतिबा देवालय .... येथे आहे

अ) वाडी रत्नागिरी  ब) नरसिंह वाडी  क) कोल्हापूर  ड) पन्हाळा

४. किल्ले पन्हाळा .... राजवटीत बांधला गेला

अ) यादव  ब) शिलाहार  क) राष्ट्रकूट  ड) बहामनी

५. जोतिबा डोंगरावर ..... देवीचे प्रसिद्ध मंदिर आहे

अ) यमाई  ब) गुड्डाई  क) टेंबलाई  ड) यापैकी नाही

## २.२.३ पुणे सर्किट (विभाग)

महाराष्ट्रातील एक ऐतिहासिक, शैक्षणिक, सांस्कृतिक, औद्योगिक, कला आणि राजकीय केंद्र म्हणून पुणे जिल्ह्यास ओळखले जाते. मराठी सत्तेची राजधानी राहिलेले पुणे मध्ययुगीन भारतातील एक महत्त्वाचे राजकीय केंद्र बनले होते पुढे ब्रिटिश काळातही त्याचे महत्त्व कमी झाले नव्हते. आज घडीला जागतिक स्तरावर ऐतिहासिक पर्यटन केंद्र म्हणून विकसित झालेल्या पुण्यामधून फिरताना मंदिरे, राजवाडा, किल्ले, लेण्या, पेठा, वाडे, विद्यापीठे, नद्या, उद्योग आणि निसर्ग इत्यादींचा खजिनाच आपणास पहावयास मिळतो. पैकी पुणे नगरी, कार्ले येथील लेण्या व जेजुरी इत्यादी ऐतिहासिक स्थळांवर आपण प्रकाश टाकणार आहोत.

### अ. पुणे

**भौगोलिक व ऐतिहासिक पार्श्वभूमी:–** पुणे हे महाराष्ट्रातील महत्त्वाचे ठिकाण असून सह्याद्रीच्या कुशीत वसलेले व नैसर्गिक दर्याकोऱ्याने नटलेली आहे. त्याची समुद्रसपाटीपासूनची सरासरी उंची ५६३ मी. एवढी आहे. पुणे हे सुरुवातीस काही झोपड्यांचा एक समूह होता. त्याला मुळा आणि मुठा या नद्यांच्या संगमामुळे एका पवित्र स्थानाचा दर्जा प्राप्त झाला होता. या संगमाजवळ मुठा नदीच्या काठी पुण्येश्वर व नारायणेश्वर नावाची दोन मंदिरे होती. कदाचित या पुण्येश्वर मंदिराच्या नावावरूनच या नगरीला पुणे हे नाव रूढ झाले असावे. पुढे मुस्लिम शासकांनी ही मंदिरे पाडून त्या ठिकाणी मुस्लिम दर्गे बांधले ते अलीकडे धाकटा व थोरला शेख सल्ला या नावाने प्रसिद्ध आहेत. पुणे हा पुण्य या शब्दाचा अपभ्रंश आहे. या शहराचे मूळचे नाव पुण्यक हे नाव या शहराला पडण्याचे कारण हे शहर मुळा व मुठा या नद्यांच्या संगमावर वसले असून त्यांना

पुण्यभूमी किंवा पुण्यक्षेत्र समजण्याचा आपल्या संस्कृतीचा प्रघात आहे. जसे की प्रयाग व माहुली ही शहरे संगमावर वसलेली आहेत त्यांनाही आपण पवित्र मानतो. सन ६१३ चे सुमारास पुणे हे एक साधे खेडे होते. तिथे अगदी थोड्या झोपड्या असून मोजकेच लोक राहत होते. पुणे नगरीचे रक्षण करण्यासाठी बहिरोबा, मारुती, नारायणेश्वर, पुण्येश्वर आणि म्हसोबा यांची वेगवेगळ्या दीशांना हद्दीवर देवळे बांधण्यात आलेली होती. पैकी म्हसोबा, मारुती व पुण्येश्वर यांचे देवळे आजही पहावयास मिळतात. मुसलमानी आमदानीत शहराभोवती एक मातीची भिंत बांधली व शहरात शिरण्यासाठी तीन दरवाजे ठेवले या भिंतीचे पडके भग्न भाग आजही कुठे कुठे दृष्टीस पडतात. या भिंतीच्या आतील भागास कसबा म्हणत असत हीच हल्लीची कसबा पेठ होय. कसब्यात लष्कर व मुसलमान राहत असत व व्यापारी वगैरे लोक भिंतीच्या बाहेरच्या अंगास राहत असत. पुढे शहराची वस्ती वाढत गेली व चार नवीन पेटा बसविण्यात आल्या. दोन कसब्याच्या दक्षिणेस एक पूर्वेस व एक पश्चिमेस. दक्षिणेकडच्या पेठेस मोहियाबाद व मलकापूर अशी नावे मिळाली त्यांनाच आता आपण बुधवार पेठ व रविवार पेठ असे म्हणतो. पूर्वेकडील पेटेला अष्टपुरा म्हणत तिलाच हल्ली मंगळवार पेठ म्हणतात तर पश्चिमेकडील पेठेला मुर्शिदाबाद असे नाव पूर्वी देण्यात आले पण आता ती शनिवार पेठ या नावाने प्रसिद्ध आहे .

**ऐतिहासिक पुणे व मराठी सत्ता:** ऐतिहासिक पुणे नगरी व मराठी सत्ता यांचा दीर्घकाळ अत्यंत जवळचा संबंध राहिलेला आहे. किंबहुना मराठी सत्तेच्या दुसऱ्या कालखंडापासून ते अस्तापर्यंत मराठी सत्तेची पुणे ही मुख्य राजधानी होती. त्यामुळे पुणे नगरीने मराठी सत्तेच्या प्रारंभा पासून ते शेवटच्या पर्वा पर्यंत अनेक ऐतिहासिक घटना प्रत्यक्ष अनुभवलेल्या आहेत. त्यामुळेच पुणे जिल्हा ऐतिहासिक पर्यटनाचे मुख्य केंद्र बनला आहे. शहाजीराजांनी पुणे हे आपले मुख्य निवासस्थान केले आणि त्या ठिकाणी सध्याचा लाल महाल हा प्रसाद बांधला. तिथे राजमाता जिजाऊ व बाल शिवबा राजे राहू लागले. बाल शिवाजी राजे जस जसे वयाने मोठे झाले आणि मावळ्यांना एकत्र करून त्यांनी विजापूरच्या सत्तेविरुद्ध संघर्षाला प्रारंभ केला तस तसे पुण्याचे महत्त्व आणि श्रेष्ठत्व अधिकच वाढले. कारण याच परिसरात शिवबा राजांनी आपल्या सवंगड्यांच्या मनात स्वराज्य स्थापनेची प्रेरणा जागृत करून, स्वराज्याच्या अनाभाका करून मराठी सत्तेची स्थापना केली होती. मराठी सत्तेच्या सभोवतालच्या मुस्लिम शाह्यांनी व औरंगजेबाच्या हर एक सेनापतींनी पुण्यावर ताबा मिळवण्याचा अटोकाट प्रयत्न केला तथापि शिवराज्याभिषेकापर्यंत म्हणजेच सन १६७४ पर्यंत महाराजांचे पुण्यावर बारीक लक्ष होते आणि अंमल ही होता. शिवाजी महाराजांच्या मृत्यूनंतर स्वातंत्र्याच्या झगण्यात मोगल आणि मराठी यांच्यात संघर्ष होऊन पुणे कधी मुघलांकडे तर कधी मराठ्यांकडे असे अलटून-पलटून अधिपत्याखाली होते. पहिल्या बाजीरावाने पुणे हे मुख्यालय करण्याची कल्पना मांडली व आपल्या पाच सरदारांना वाडे बनण्यासाठी १७२८ मध्ये पुण्याच्या परिसरात जागा दिल्या. त्यानंतर १७३१ मध्ये स्वतःसाठी पुण्याला जो प्रासाद तथा वाडा बांधला तोच इतिहास प्रसिद्ध शनिवारवाडा होय. यामुळे पुण्याचे तत्कालीन महत्त्व कैक पटीने वाढले होते. व्यापारी, चाकरमानी, लष्करातील मातब्बर सेनापती आणि परदेशी पाहुणे पुण्यात येऊ लागले आणि स्थायिक होऊ लागल्याने पुण्याचा झपाट्याने विकास झाला. पण पुण्याला मराठी सत्तेच्या राजधानीचा दर्जा प्राप्त होण्यास १७४९ हे साल उजाडावे लागले. कारण छत्रपती शाहू महाराजांचे

याचवेळी निधन झाले आणि मराठ्यांच्या सत्तेची सर्व सूत्रे पेशव्यांच्या हाती केंद्रित झाली. परिणामी पुणे ही मराठी सत्तेची मुख्य राजधानी बनली.

१७९२ मध्ये कॅप्टन मुरने पुण्याला जेव्हा भेट दिली तेव्हा पुण्याच्या परिसरात अनेक उद्याने फुलांनी फुलली होती वट वृक्ष बहरले होते, वने व उपवणे पाण्याची सर्वत्र उत्तम योजना होती, पुणे शहर फारशे मोठे व विस्तृत नव्हते पण टुमदार घरे आणि भक्कम वाडे यांनी त्याची शोभा वाढली होते. शहरात अनेक व्यापारी पेठा वसवल्या होत्या, पोलीस खाते फार दक्ष व कार्यक्षम होते. यावरून तत्कालीन पुण्याचे महत्त्व लक्षात येते. कर्तुत्व शून्य दुसऱ्या बाजीरावाने सुडाचे राजकारण सुरू केल्याने पुण्यात गोंधळाची परिस्थिती निर्माण झाली, कायदा सुव्यवस्था न राहिल्याने समाजकंटकांनी धुमाकूळ घातला, लुटालुट केली त्यामुळे या सर्व घटनांनी पुणे शहर अराजकतेत बुडाले होते. त्यातच यशवंतराव होळकरांनी आपल्या भावाच्या अमानुष हत्येचा बदला घेण्यासाठी उत्तरेतून फौजपट्यासह येऊन पुणे शहर लुटले त्यामुळे शहरातील नागरिकांना पुन्हा एका दुर्दैवी आपत्तीला तोंड द्यावे लागले. बाजीरावाच्या पलायनानंतर पुणे शहर असाह्य व दिनवान्या अवस्थेत एकाकी पडले होते. शेवटी १७ नोव्हेंबर १८१७ मध्ये पुणे शहराने शरणागती पत्करली आणि त्याच दिवशी ब्रिटिशांचा युनियन जॅक पेशव्यांच्या राजप्रासादावर म्हणजेच शनिवारवाड्यावर फडकू लागला. १८१८ मध्ये सर्वच बाजूने ब्रिटिश वरचढ झाल्याचे पाहून दुसऱ्या बाजीरावाने सर जॉन मालकम याच्यापुढे सपशेल शरणागती पत्करली आणि मराठा साम्राज्य संपुष्टात आले.

**पुणे नगरीतील प्रेक्षणीय स्थळे:** पुणे नगरी ही अनेक ऐतिहासिक, धार्मिक, सांस्कृतिक, शैक्षणिक, औद्योगिक अशा प्रेक्षणीय स्थळांसाठी प्रसिद्ध आहे. त्यामध्ये ऐतिहासिक वारसा सांगणारे आगाखान पॅलेस, शनिवार वाडा, सिंहगड, लोहगड, शिवनेरी यासारखे महत्त्वाचे योगदान देणारे किल्ले, विश्राम बाग वाडा, नाना वाडा, भिडे वाडा यासारखे विविध स्थापत्य शैलीची उत्कृष्ट ठिकाणे, चतुर्शिंगी माता मंदिर, दगडूशेठ हलवाई गणपतीचे मंदिर, पाताळेश्वर गुहा मंदिर यासारखी महत्त्वाची मंदिरे, ऐतिहासिक शिवाजी पुल, लाल महाल, महादजी शिंदेंची छत्री, पार्वती, यासारखी अनेक प्रेक्षणीय स्थळे पुण्यामध्ये ऐतिहासिक पर्यटनाच्या दृष्टिकोनातून पाहुयास मिळता.

**शनिवारवाडा:** शनिवार वाडा हे पुणे शहरातील सर्वात लोकप्रिय ऐतिहासिक पर्यटन स्थळ आहे. तो अत्यंत भव्य आणि राजेशाही स्वरूपाचा प्रासाद तथा वाडा होता. हा ऐतिहासिक शनिवार वाडा पहिले बाजीराव पेशवे यांनी बांधला. त्याचे बांधकाम १० जानेवारी १७३० रोजी विधिवत सुरू करण्यात आले होते तर २२ जानेवारी १७३२ रोजी ते बांधून पूर्ण करण्यात आले होते. सर्वसाधारणपणे दोन वर्षाच्या कालावधीत बाजीराव पेशव्यांनी आपल्या कुटुंबीयांसाठी दोन मजली हा शनिवार वाडा बांधला. त्यात सर्व बाजूंनी हवा खेळेल असे तीन चौपोसे होते. पुढे हीच वास्तू मराठी सत्तेच्या धामधुमीचे व राज्यकारभाराचे केंद्रस्थान व स्फूर्तीस्थान ठरली. या स्थापत्य कलेच्या उत्कृष्ट बांधकामासाठी त्यावेळी १६११० रुपये इतका खर्च झाल्याची पेशवे दप्तरात नोंद मिळते. मुळात या शनिवार वाड्याचा सुरुवातीचा आराखडा अगदी साधा होता पण तो शोभिवंत व सर्व सुखसोयींनी सुसज्ज असावा असे बाजीरावांना वाटले. शिवाय त्यातील दिवाणखाना फक्त कलाकुसरींनी अलंकृत असावा असे ठरले होते पण त्यात आवश्यक ते बदल करण्यात आले. पुढे

बाळाजी बाजीराव यांनी शनिवारवाड्यात अनेक फेरबदल करून काही नवीन दालने बांधली व या वास्तूचा विस्तारही केला. त्यांनी या राजवाड्याला शाही रुप देऊन त्याची शोभा वाढवली. शिवाय याकरिता मोठा पैसा खर्च करून या राजप्रासादाचे रूपांतर महाराष्ट्रातील एक अप्रतिम व आदर्श वास्तूत केले. पुढील काळात सवाई माधवराव या पेशव्यांचे पंतप्रधान नाना फडणीस यांनी शनिवार वाड्यात आणखी काही खोल्या नव्याने बांधल्या आणि काही प्रशस्त सभागगृहे, ओवऱ्या, मनोरे पॅव्हीलन्स बांधून परिसरात कारंजा तयार करून घेतल्या. त्यामुळे या राजघराण्याच्या निवासस्थानाला राजेशाही स्वरूप प्राप्त झाले. साहजिकच महाराष्ट्राच्या सत्ताधीशांना साजेशे वाटेल असे ते निवासस्थान झाले होते. सन १८२७ मध्ये शनिवार वाडा अग्नीच्या बक्षस्थानी पडला होता त्यामुळे आता आहे ती फक्त दगडी तटबंदी आणि पाच प्रवेशद्वारे व नव बुरुज पहावयास मिळतात. आज ही वास्तू पडझडीच्या अवस्थेत बघणं स्वरूपात दिसून येते.

शनिवार वाड्याची मुख्य इमारत सहा मजल्यांची होती आणि असे सांगण्यात येते की, त्यावरील गच्चीवरून आळंदी येथील मंदिराचा कळस तथा शिखर सहजपणे दिसत असे. एवढेच नव्हे तर सवाई माधवराव पेशवे हे पर्वती मंदिराचा सुरेख देखावा इथूनच न्याहाळीत असत त्या दर्शनाचा आनंद लुटीत असत शिवाय त्यांच्या मेघडंबरी या राहत्या खोलीच्या गच्चीत बसून पुणे शहरावर दृष्टीक्षेप किंवा कटाक्ष टाकीत असत. नगारखान्याच्या वरच्या बाजूस मराठी सत्तेचे प्रतीक असणारा भगवा ध्वज रात्रंदिवस डौलाने फडकत असे. शनिवार वाड्याला मुख्य पाच दरवाजे होते ते म्हणजे दिल्ली दरवाजा, गणेश दरवाजा, मस्तानी दरवाजा, खिडकी दरवाजा आणि जांबुल दरवाजा हे होय. शनिवार वाड्यास असणाऱ्या भक्कम तटबंदीत एकूण नऊ बुरुज असून त्यांचे बांधकाम  दगडी व विटांचे करण्यात आले. शनिवारवाड्यातील मुख्य दिवाणखाना म्हणजे गणपती रंग महाल होय तो बाळाची बाजीराव या तिसऱ्या पेशव्याने गणेश उत्सव संमारंभ साजरा करण्यासाठी १७५५ मध्ये बांधला. हा गणपती रंगमहाल अनेक राजकीय बैठकांचा घटनांचा साक्षीदार होता. जेव्हा पेशव्यांची आधीसत्ता अतिउच्च कळसास पोचली होती त्या सुमारास कॅप्टन मूर यांनी पुण्याला भेट दिली होती तेव्हा तो या गणपती रंगमालाचे वैभव सांगताना म्हणतो की, पुण्याच्या शनिवारवाड्यात पेशव्यांची खोली अति उत्कृष्ट आहे. तिला गणेश महाल म्हणतात. विशेषता गणेशोत्सवाच्या वेळी त्याला वंदन दाखवण्यासाठी अनेक अध्यागत येतात त्यांचे पेशवे स्वागत करतात. मी तिथे एकाच वेळी शंभरहून अधिक नृत्य करणाऱ्या युवती पहिल्या. या खोलीच्या एका टोकाला सोन्याचा मुलामा दिलेली एका कोनाड्यात मूर्ति आहे ती देवता संगमरवरात घडवलेली असावी. बागबगीचे, कारंज्यांची गुणगुण एकूणच वातावरण फार रम्य होत.

शनिवार वाड्याच्या सजावटीचा, बांधकामाचा, संरचनेचा व किमती वस्तूंचा हा संक्षिप्त वृत्तांत नजरेखाली घातल्यानंतर या ऐतिहासिक वास्तूचा व तत्कालीन राजेशाही जीवन व्यवस्थेची आपणास कल्पना येते. शनिवार वाडा हा पेशवाईच्या उत्कर्षाचा आणि मराठी सत्तेचा परमोच्य काळ होता काही युरोपियन सदग्रहस्थानी राजकीय प्रतिनिधित्व म्हणून किंवा उत्सुकतेपोटी पुणे दरबाराला भेटी दिलेल्या होत्या त्यांचे वृत्तांत आपल्या डोळ्यासमोर या जुन्या वैभवशाली राजवाड्यातील दृश्ये आणि वैभव हुबेहूब उभे करतात. पण हाच शनिवार वाडा १८२७ रोजी अग्नीच्या भक्षस्थानी पडला. ही आग सुमारे सात दिवस धुमसत होती.

त्यामुळे शनिवार वाड्याची तटबंदी, भक्कम दगडी दरवाजे आणि जमिनीत पाया घातलेले जोते व जळालेले अवशेष एवढेच शिल्लक राहिलेले होते तेच या शक्तिशाली मराठी साम्राज्याच्या उदय व अस्ताचे प्रत्यक्ष साक्षीदार आहेत.

**ऐतिहासिक पर्वती:** शहराच्या नैऋत्येस पार्वती ही एक लहान टेकडी वसली आहे. ती तिसरे पेशवा बाळाजी बाजीराव यांनी तिथे बांधलेल्या मंदिरामुळे प्रसिद्ध झाली त्यापूर्वी या टेकडीला विशेष महत्त्व नव्हते कारण एक झोपडी वजा सामान्य वस्ती तिथे होती तिला पर्वती म्हणत. बाळाची बाजीरावांनी या टेकडीवरील मध्यभागाची सपाट जागा निवडून तेथे १७४८ मध्ये दगडी बांधकाम केले. पेशवे दप्तरातील नोंदीनुसार ११ एप्रिल १७४९ मध्ये या टेकडीवर देवदेवेश्वर, महादेव, गणपतीचे आणि पार्वती या मूर्तींची विधिवत मंदिरात प्रतिष्ठापना करण्यात आली. बाळाजी बाजीराव पेशवे रोज घोड्यावरून पर्वतीवर देवदर्शनासाठी जात असत आणि तिथल्या नैसर्गिक सौंदर्याचा आनंद तासंतास लुटत असत. त्यांनीच १७६० मध्ये मंदिराच्या शिखरावर १०२० तोळ्यांचा कळस चढविला. पर्वती टेकडीच्या मध्यभागी या मंदिर समूहात मुख्य देवता म्हणजेच शिवाचे उत्कृष्ट मंदिर आहे या मंदिराची वास्तू सुरेख असून त्याची बांधणी मराठीशाहीतील वैशिष्ट्यपूर्ण वास्तुशैलीत केली आहे. मंदिराच्या चारही कोपऱ्यात सूर्य, गणेश, पार्वती व विष्णू या देवतांची घुमठाकार स्वतंत्र छोटी मंदिर आहेत. प्रमुख मंदिराच्या पश्चिमेस आणखी दोन लहान मंदिरे असून ती अनुक्रमे कार्तिक स्वामी आणि विष्णू या देवतांची आहेत. बाळाची बाजीराव पेशव्यांनी १७५५ मध्ये या टेकडीवर राहण्यासाठी व विरंगुळा मिळावा म्हणून विश्राम धाम सदृश्य खोल्या बांधल्या त्या आजही वाडा म्हणूनच ओळखल्या जातात. तिसऱ्या पानिपतच्या युद्धात झालेल्या पराभवाचे दुःख पेशव्यांना एवढे जबरदस्त झाले होते की त्यांच्या सवंगड्यांनी व मंत्र्यांनी श्रीमंतांच्या मनाला थोडी विश्रांती मिळावी म्हणून आवडत्या श्रद्धास्थानी म्हणजेच पार्वतीवर आणले होते परंतु मनाने पूर्णपणे खचलेल्या पेशव्यांनी १७६१ मध्ये प्राण सोडले. पुढे सवाई माधवराव पेशव्यांची मुंज १७७९ मध्ये थाटामाटात याच पर्वती टेकडीवर संपन्न झाली. असे म्हटले जाते की खडकीचे इंग्रज मराठा युद्ध पेशवे दुसरे बाजीराव यांनी याच पर्वतीवरील देवदेवेश्वराच्या मुख्य मंदिरातील उत्तरेकडील भिंतीत असलेल्या खिडकीतून प्रत्यक्ष पाहिले होते. मात्र तिथल्या तोफांचा आवाज आणि दृष्टिक्षेपातील पराभव यांनी घाबरून जाऊन त्यांनी पलायन केले. टेकडीवर जाण्यासाठी दगडाने घडवलेल्या सुमारे १०० रुंद व लांब पायऱ्या आहेत. पायऱ्यांची बांधणी अशा पद्धतीने केली आहे की हत्तीला सुद्धा टेकडीवर सहजासहजी चढता यावे. कारण त्याकाळी पालखी आणि हत्ती हीच राजघरण्यातील स्त्री-पुरुषांची वाहतुकीचे साधने होती. या मंदिराच्या समोरील नगारखाना आणि तिथून पुण्यनगरी व सभोवतालच्या सृष्टी सौंदर्याचे होणारे दर्शन हा वेगळा सुखद अनुभव असतो. प्रेक्षक किंवा पर्यटक सभोवतालचे सौंदर्य पाहताना भांबावून जातो.

**शिंदे यांची छत्री:** शिंदे यांची छत्री किंवा समाधी ही पुण्यातील एक ऐतिहासिक वास्तू असून तो पुणेकरांच्या व पर्यटकांच्या अत्यंत जिव्हाळ्याचा विषय आहे. वानवडी हे खेडे पुण्याच्या पूर्वेस सुमारे पाच कि.मी वर वसले आहे. तेथेच महाजी शिंदे यांचे निधनानंतर १२ फेब्रुवारी १७९४ रोजी दहन करण्यात आले. विधिपूर्वक धर्मसंस्कार करून महादजींच्या पार्थिव देहाचे दहन ज्या ठिकाणी केले त्याच पवित्र ठिकाणी

ग्वाल्हेरच्या संस्थानिकांनी छत्री बांधली. महादजीचे दत्तक चिरंजीव आणि ग्वाल्हेर संस्थांचे वारस दौलतराव शिंदे यांनी सवाई माधवराव पेशवे यांना महादजीच्या पार्थिवास ज्या ठिकाणी अग्नी दिला ती जागा आपल्या दत्तक पित्याच्या समाधीसाठी मागितली तेव्हा पेशव्यांनी ती १७९५ रोजी देण्याची कारभाऱ्यांना आज्ञा दिली. त्यानंतर दौलत रावांनी त्या ठिकाणी बांधकाम करण्यास सुरुवात केली पण इमारतीचे बांधकाम काही अंशी रखडले आणि ते अपूर्णच राहिले. पुढील काळात ग्वाल्हेरचे अत्यंत उत्साही अधिपती श्रीमंत माधवराव शिंदे हे पुण्याला आले असताना त्यांनी वानवडीच्या स्मारकाला आवर्जून भेट दिली आणि आपल्या या पराक्रमी प्रख्यात पूर्वजांच्या स्मारकाची दूरदशा पाहिल्यानंतर भरीव स्वरूपाची देणगी देऊन विद्यमान सुरेख प्रमाणबद्ध असी प्रशस्त छत्री तथा स्मारक उभे राहिले. आज वानवडीला भेट देणाऱ्या पर्यटकांची ती प्रमुख आकर्षण बनले असून ती ऊर्जा देणारी ठरली आहे. महादजी शिंदे यांचे नाव मराठ्यांच्या इतिहासात एक पराक्रमी, मुत्सधी सेनापती म्हणून प्रसिद्ध झाले आहे. ते पेशव्यांच्या लष्करात पराक्रम आणि मालकांवरील निष्ठा या विशेष गुणांमुळे सन्मान दर्शक पदावर राहिले. मराठी सत्तेच्या अखेरच्या पर्वात त्यांनी मोठा पराक्रम गाजवून मराठी सत्तेच्या संरक्षणात मोलाचे योगदान दिले. वास्तविक दिल्लीच्या मुघल राजसत्तेच्या तक्ताचे सर्वेसर्वा हे महादजी शिंदेच होते आणि नाममात्र बादशहा त्यांच्या मर्जीनुसार वागत असे. दिल्लीवर कब्जा, राजस्थान व उत्तर हिंदुस्तान वर मराठ्यांच्या पराक्रमाचे वर्चस्व प्रस्थापित करून १७९२ मध्ये महादजी शिंदे पुण्यात आले. दरम्यानच महादजींनी वानवडी या गावात स्वतःला राहण्यासाठी एक स्वतंत्र घर बांधले होते त्याचे अवशेष आजही पहावयास मिळतात. वानवडी येथील निवासस्थानी १२ फेब्रुवारी १७९४ रोजी त्यांचे निधन झाले. त्यांच्या राहत्या घराजवळच एका वड्याच्या काठी त्यांना अग्नी देण्यात आला आणि त्याच ठिकाणी त्यांच्या नामांकित वारसदारानी त्यांचे स्मारक रूपात छत्री बांधली तीच आज शिंदेंची छत्री म्हणून ओळखली जाते. शिवाय आज ती एक ऐतिहासिक पर्यटन स्थळ म्हणून प्रसिद्ध आहे.

**इतर प्रसिद्ध स्थळे:** याशिवाय पुणे नगरीमध्ये असणाऱ्या विविध पेटा यांना मोठा ऐतिहासिक वारसा लाभला असून त्यामध्ये कसबा पेठ, बुधवार पेठ, शनिवार पेठ, रविवार पेठ, शुक्रवार पेठ, नारायण पेठ, सदाशिव पेठ, गणेश पेठ, सोमवार पेठ, भवानी पेठ, घोरपडे पेठ, भांबुर्डा पेठ यासारख्या महत्त्वाच्या प्रसिद्ध पेटा आहेत. तसेच पुरंदरे यांचा वाडा, शेख सल्लूयाचा दर्गा, अमृतेश्वराचे देऊळ, नाना फडणीस यांचा वाडा, किर्लोस्कर नाटक गृह, तांबडी जोगेश्वरी मंदिर, मोरोबा दादांचा वाडा, कोतवाल चावडी, बेलबाग आनंदाश्रम, फडक्यांचा वाडा, जमा मशीद, तुळशीबाग, शहराचा तुरुंग, न्यायमूर्ती रानडे यांचा वाडा, गायकवाड यांचा वाडा, चिपळूणकरांचा वाडा, पुष्करणीचा हौद, विश्रामबागचा वाडा, सेवासदन, सारसबाग यासारखी अनेक प्रेक्षणीय स्थळे पुणे शहराच्या सौंदर्यात व ऐतिहासिक पर्यटनात भर घालतात.

### ब. कार्ले लेणी:

महाराष्ट्रातील प्राचीन लेण्यांपैकी एक प्रसिद्ध लेणी म्हणजेच कार्ले लेणी होय. मुंबई पुणे महामार्गावर मळवली स्टेशन जवळ कार्ले ची ही प्रसिद्ध लेणी वसलेली आहेत. हीनयान लेण्यांच्या परंपरेतील ही सर्वोत्कृष्ट लेणी समजली जातात. या लेण्यात एक चैत्यगृह व इतर चार विहार लेणी खोदलेली आहेत. कार्ले चे प्राचीन नाव बल्लूरक असे होते हे तेथील शिलालेखांवरून दिसून येते. ही लेणी पूर्ण करण्यात अनेक

दात्यांचा हातभार लागला आहे. मुख्य लेण्यातील दीर्शिकेच्या उजव्या बाजूला भिंतीवर हत्तीच्या शिल्पावरील आलेखात वैजंतीचे, सेठिना सेलघर भूतपालेन परनिठपितं जम्बुदिपम्ही उत्तमं, म्हणजेच जम्बुदिपात (भारतात) अतिउत्कृष्ट असे हे चैत्य लेणे वैजयंतीचा श्रेष्टी (सावकार) भूतपाल यांनी कोरविले असा उल्लेख आहे. तसेच लेण्यापुढील सिहस्तंभ अग्नीमित्रनक यांनी कोरविला असल्याचे म्हटले जाते. लेण्यांमधील विविध भागांची निर्मिती वैजयंती, धेणुकाकट, सोपारा इत्यादी नगरातील श्रेष्टींनी केली असे आलेखात म्हटलेले आहे. देणगीदारांमध्ये भयिला, आषाढमित्रा वगैरे महिलांचाही समावेश आहे. दिनकाचा पुत्र व शहरात शत्रप नहपानाचा जावई ऋषभदत्त याने लेण्यांच्या निर्मितीसाठी व भिक्षुंच्या वर्षावासासाठी भरघोस दान दिले असल्याचा उल्लेख आहे.

कारल्यातील चैत्यलेणे हीणयान शैलीचे सर्वात उत्कृष्ट उदाहरण आहे. लेण्याची आखणी प्रमाणबद्ध व रेखाव स्वरूपाची आहे. लेण्याची सुरुवात इसवी सन पूर्व पहिल्या शतकात झाली असली तरी ती पूर्ण करण्यात अनेक वर्षे लागली असावीत. हिनयान व महायान या बौद्ध प्रणालींच्या दोन वेगवेगळ्या ओघांचे येथे अप्रतिम स्वरूपाचे मिलन झालेले आढळून येते. चैत्य जेव्हा पूर्ण झाला असेल तेव्हाचे त्याचे सौंदर्य व भव्यता याची केवळ कल्पना करता येते. चैत्य दालनात जाण्यापूर्वी दोन अष्टकोनी पूर्णाकृती स्तंभांच्या दीर्घिकेत प्रवेश करावा लागतो. यामधील दक्षिण व उत्तर बाजूच्या भिंतीवर अनेक मजली इमारतीचे भव्य शिल्प आहे. कार्ले येते भिंतीच्या सजावटीसाठी वेदिकापट्टी, हत्तीच्या प्रतिमा, नृत्यात दंग असलेली मिथूने व बुद्धाचे छोटे मोठे पुतळे उभारलेले दिसून येतात. दक्षिणेकडच्या भिंतीवरील चर व उभ्या हत्तीची शिल्पे अप्रतिम स्वरूपाची आहेत. हत्तीचे मस्तक, छाती व समोरचे दोन पाय कौशल्य पूर्ण रीतीने कोरण्यात आलेले आहेत. त्याच्या मस्तकाची ठेवन व कानाचा आकार हुबेहूब स्वरूपाचा आहे. कार्ले तील हत्तीची ही शिल्पे जोमदार व जिवंत वाटतात पण दुर्दैवाने त्यांच्या सोंडी आज मात्र भग्न झालेल्या आहेत. दीर्घीकेसमोर दोन १६ कोणी सिंह स्तंभ होते त्यातील एक नष्ट झाला असून डाव्या बाजूचा अस्तित्वात आहे. स्तंभावर अशोकाच्या शिहस्तंभा प्रमाणे चार सिंह पाटीला पाठ लावून बसलेले आहेत. या सिंहांवर धर्मचक्र असावे असा तज्ञांचा अंदाज आहे. तुटलेल्या स्तंभाच्या ठिकाणी एकविरा देवीचे प्रसिद्ध मंदिर आहे.

कार्ले च्या लेण्यातील प्रमुख वैशिष्ट्य म्हणजे दर्शनी भागातील दाणी युगलांची शिल्पे होय. तेथे एकूण १६ दानी युगलांची अप्रतिम शिल्पे कोरण्यात आली आहेत. मुख्य प्रवेशद्वाराच्या दोन्ही बाजूंना दाणी दांपत्याची शिल्पे आहेत ही दांपत्ये सर्व वैभवासह ऐटीत उभी असलेली आहेत. एकूणच या युगालांच्या कानात व गळ्यात भरपूर आभूषणे असून कमरेला मेखला बांधलेली आहे. यामुळे तत्कालीन सातवाहन वेशभूषेची यावरून कल्पना करता येते. अधोवस्त्राच्या चुन्या व सोगे जमिनीपर्यंत पोचलेले दाखवलेले आहेत. पुरुषांच्या भारदार रुंद छाती व स्त्रियांची वक्षस्थळे शरीरसौष्टवाचे व सौंदर्याचे उत्तम दर्शन घडवतात. या जोडप्यांच्या चेहऱ्यावर निरागस व विनम्र भावांचे अचूक रेखाटन करण्यात आले आहे. कार्ले तील दाणी युगलांची शिल्पे गुहा निर्मितीच्या काळात म्हणजेच इसवी सनाच्या पहिल्या शतकातील असावीत कारण त्यांची शैली पाचव्या सहाव्या शतकात करण्यात आलेल्या बुद्ध प्रतिमांपासून भिन्न स्वरूपाची वाटते. कार्ले लेण्यांच्या मधल्या प्रवेशद्वारातून सभागृहात शिरल्यावर वास्तूची भव्यता पाहून मन थक्क होऊन जाते.

सभागृहाच्या दोन्ही बाजूंना प्रत्येकी स्तंभ असून त्यांच्यामुळे प्रशस्त प्रदक्षिणा पत निर्माण झालेला आहे. हे स्तंभ हीनयान शिल्पशैलीचे उत्तम नमुने आहेत. हा स्तूप अतिशय प्रमाणबद्ध असून त्याची तीन स्तरात आखणी करण्यात आलेली आहे. पायथालगतचा दंडगोलाचा भाग विस्तृत असून त्यावर वेदिकापट्टीची नक्षी आहे. या नक्षीच्या खाली सर्व बाजूंना थोडी जागा सोडून चौकोनी छिद्रे ठेवण्यात आलेली आहेत. तर मधला दंडगोल साध्या स्वरूपाचा असून त्यावर अर्धगोलाकार अंड व चौकोनी हर्मिक आहे. हरमिकेच्या पेटीवर वेदिका शिल्प आहे त्यावर खाली निमुळत्या होत जाणाऱ्या सात चौकोनी चकत्या असून वर लाकडी छत्र आहे हे छत्र स्तूपाइतके जुने असून ते अजूनही चांगले टिकून आहे हे खरोखरच आश्चर्य म्हटले पाहिजे. छतावरच्या अर्ध वर्तुळाकार लाकडी तुळ्या या सुद्धा तत्कालीन वास्तू विशारदांच्या वैज्ञानिक कौशल्याची चुणूक  दाखवतात. गेली २००० वर्षे या तुळ्या या स्थितीत बसवण्यात आल्या त्या अद्यापही तशाच आहेत त्यामुळे हे प्राचीन भारतीय वास्तु विज्ञानातील एक आश्चर्यच म्हणावे लागेल.

अशाप्रकारे पुणे विभागातील ऐतिहासिक कार्ले येतील लेण्यांची समृद्धता आपणास पाहता येते. कार्ले चैत्यानंतर कान्हेरी, नाशिक, जुन्नर, अजिंठा येथे याच प्रकारची चैत्य लेणी खोदण्यात आली पण कार्ले तील सफाई व रेखिवपणा त्यात दिसून येत नाही. त्यामुळे चैत्यगृहाचे परिणत रूप म्हणून कार्ले लेण्या कडे पाहिले जाते. चैत्य लेण्याचा विशेष म्हणजे सुमारे २८ महत्वपूर्ण शिलालेख येथे कोरण्यात आलेले आहेत. यांचा काळ ही वेगवेगळा आहे. त्यामुळे संपूर्ण चैत्यगृह निर्माण होण्यास बराच अवधी लागला असावा असे म्हणता येते. या शिलालेखातून दान देणाऱ्या व्यक्तींची, त्यांच्या गावांची व व्यवसायांची अतिशय महत्त्वपूर्ण माहिती मिळते. सर्वसाधारण जनतेच्या सक्रिय  सहकार्याद्वारे अशा प्रकारची श्रेष्ठ कलाकृती निर्माण होऊ शकते ही भारताच्या, महाराष्ट्राच्या व पर्यायाने पुणे विभागाच्या अभिमानाचीच गोष्ट होय. थोडक्यात पश्चिम महाराष्ट्रातील कार्ले येथील लेणी हे प्रसिद्ध ऐतिहासिक पर्यटन स्थळ असून तेथील स्तुपावरील हर्मिका व त्यावरील छत्रावली अजूनही सुस्थितीत आहेत.

**क. जेजुरी**

महाराष्ट्राच्या सांस्कृतिक तसेच धार्मिक इतिहासात यादव काळापासून चालना मिळत गेलेली दिसून येते. अशाच प्रकारे खंडोबा हे दैवत नावारुपाला आलेले आहे. खंडोबा हा मल्हारी, म्हाळसाकांत, मार्तण्ड भैरव, रवळनाथ, मल्लूखान, अजमतखान इ. नावांनी ओळखला जाणारा देव आहे.  खंडोबा विषयी माहिती ही मल्हारी महात्म्य या ग्रंथातून मिळते. या मुळ संस्कृत ग्रंथाचे मराठीमध्ये रुपांतर सिध्दपाल केसरी नावाच्या विद्वानाने इ.स. १५१० मध्ये केले. उन्मत झालेल्या मनी आणि मल्ल या असुरांचा नाश करण्यासाठी शिवशंकराने मार्तण्ड भैरवाचा अवतार धारण केला. पुणे जिल्ह्यातील जेजुरी या ठिकाणी असणारा श्री खंडोबा हा संपूर्ण महाराष्ट्राचे नव्हे तर कर्नाटक आणि आंध्रप्रदेश येथील जनसामान्यांचे आराध्य दैवत आहे खंडोबा या दैवताने धार्मिक क्षेत्रात आपली भूमिका कणखरपणे निभावली. त्याचप्रकारे ऐतिहासिक क्षेत्रातही निभावलेली आढळून येते. खंडोबाची उपासना ही प्राचीन काळापासून चालत आलेली आहे. मात्र खऱ्या अर्थाने खंडोबा पुजनास मध्ययुगीन काळापासून चालना मिळाली. मराठेशाहीचा काळ हा खंडोबाच्या लोकप्रियतेचा कळस मानला जातो.

**ऐतिहासिक लेखांमधील जेजुर:** जेजुरी या ठिकाणी अनेक शिलालेख आढळून आलेले आहेत. सर्वात पहिला शिलालेख हा इ.स. १२४६ मधील असून या शिलालेखावरून मंदिराचा मुख्य गाभारा कोण्या रजपुताने बांधल्याची माहिती मिळते. दुसरा शिलालेख हा सभामंडपाच्या पुढच्या बाजूला आहे. या शिलालेखावरुन मंडप आणि इतर कामे ही २ जून १६३५ या दिवशी राघो पुंबाजी याने चालू केली असे आढळून येते. गडाच्या पायथ्याशी एक शिलालेख असून त्यामध्ये १५६८ आणि आप्पाजी सोमवंशी असा संदर्भ आहे. खंडोबा मंदिराच्या परिसरामध्ये पंचलिंग या मंदिराकडे जात असताना उजव्या बाजूस एक लेख आहे. त्या लेखामध्ये शके १६७७ युवा संवत्सर (इ.स.१७५५) मध्ये शिवदेव विंचूरकर याने ते मंदिर बांधल्याची माहिती मिळते. भंडारगृहासाठी असणाऱ्या खोलीच्या दरवाजावर एक लेख आहे. त्या लेखावरुन ते भंडारगृह देवाजी चौधरी श्रीगोंदेकर यांनी ३१ मार्च १७५६ या दिवशी बांधल्याचे समजते. खंडोबा मंदिराच्या आवारातच सनई चौघडा ठेवण्यासाठी एक खोली आहे, त्या खोलीच्या दरवाजावर एक लेख आहे. त्यामध्ये इ.स. १७५६ मल्हारजी खंडोजी होळकर असा तपशील आहे.

**शहाजीराजे – शिवाजीराजे भेट:** भोसले कुळाचा कुळस्वामी खंडोबा असल्याने मालोजीराजे, शहाजीराजे, व्यंकोजीराजे यांच्या मनामध्ये खंडोबाविषयी नितांत श्रध्दा होती. शहाजीराजे निजामशाही, आदिलशाही, मुघल यांच्या पदरी सेवा करत. त्या बदल्यात जहागिरी मिळत असे. अशाच पध्दतीने शहाजीराजे यांना महाराष्ट्र आणि कर्नाटकामध्ये जहागिरी मिळालेली होती. पुढे शहाजीराजांना महाराष्ट्र सोडून कर्नाटकात जाण्याचा प्रसंग आला. त्यावेळी महाराष्ट्रातील जहागिरीची जबाबदारी जिजाबाई, बाल शिवाजी यांच्यावर सोपवली व ते स्वतः कर्नाटक बंगळूरला गेले. कर्नाटकामध्ये शहाजीराजे यांनी त्या ठिकाणच्या जहागिरीची घडी व्यवस्थित बसविली. पुढे महाराष्ट्रात येण्याचा प्रसंग आला. शहाजीराजे महाराष्ट्रात बऱ्याच वर्षानी येणार होते. जाणकार मंडळीच्या समजूतीनुसार शहाजीराजे आणि शिवाजीराजे यांची भेट एखाद्या तिर्थस्थळी व्हावी असा संकेत मानला. म्हणून पिता-पुत्र भेट जेजुरी या ठिकाणी घेण्याचे ठरले. शहाजीराजे कर्नाटकातून इ.स. १६६१ साली निघाले असताना त्यांनी मार्गातील तिर्थस्थळांचा आपल्या कुळधर्मानुसार कुळाचार केला. यामध्ये तुळजापूर, पंढरपूर, शिखर शिंगणापूर या ठिकाणांना भेटी दिल्या. मात्र या भेटीविषयी विद्वानांच्या मध्ये दुमत आहे. पिता-पुत्र भेट ही काही विद्वानांच्या मते पुण्यामध्ये झाली. तर काहींच्या मते ही भेट फलटण नजिक आरडगांव या ठिकाणी झाली असावी. मात्र साधार ही भेट जेजुरी येथे १६६१ ते १६६३ च्या दरम्यान झाली असावी असे अनुमान निघते. भविष्यकाळातील मराठा राज्याच्या निर्मितीस कुलस्वामीचा आशिर्वाद मिळावा ही या भेटीच्या मागे मुख्य भुमिका होती. शहाजी राजांचे जेजुरीत आगमन होताच त्यांनी प्रथम कुलस्वामी श्री खंडोबाचे दर्शन घेतले. शहाजीराजांच्या बरोबर मोरोपंत कान्होजी ही मंडळी होती. तर स्वागतासाठी माणकोजी दहातोंडे, अमात्य, डबीर आलेले होते. शहाजीराजानी प्रथम साजुक तुपाच्या परातीत आपले मुख पहात असताना त्याच परातीत शिवाजी, सोयराबाई, युवराज संभाजी (शंभु) या सर्वांनी शहाजीराजांचे मुख दर्शन घेतले. रिवाजाप्रमाणे भेटा-भेटी झाल्या. शिवाजी राजांचे हे कार्य सिध्दीस जावे म्हणून शहाजीराजांनी खंडोबास नवस केलेला होता. तो नवस शहाजीराजांनी या शुभमुहुर्तावर फेडला. खंडोबास एक लक्ष रुपयांच्या सुवर्णमुर्ती अर्पण केल्या.

**सातारचे शाहू महाराज व जेजुरीचा खंडोबा:** औरंगजेबाच्या मृत्यूनंतर अज्जमशहा हा मुघल बादशहा झाला. अज्जमशहाने दि. ८ मे १७०७ रोजी दोराहा या ठिकाणी मुक्काम असताना शाहू महाराजांची सुटका केली. शाहू महाराजांची मुक्तता झाल्यानंतर ते सर्वात प्रथम जेजुरीस गेले आणि आपला कुलस्वामी खंडोबाचे दर्शन घेतले. शाहू महाराज जेजुरीस आले असताना त्यांनी ब्राह्मण भोजने घातली, दानधर्म केला, देवास वस्त्रे दिली, दागदागिने अर्पण केले तसेच भंडार-खोबऱ्याची उधळण केली. शाहू महाराजांनी औरंगजेबाच्या कैदेतून सुटका व्हावी म्हणून खंडोबास नवस केला होता. नवसाप्रमाणे शाहू महाराजांची सुटका झाल्यानंतर खंडोबाच्या उपासनेसाठी तीन गांवे ईनाम म्हणून दिली.

**चिमाजी आप्पा आणि जेजुरीची घंटा:** थोरले बाजीराव पेशवे यांचे धाकटे बंधू चिमाजी आप्पा यांनी वसईच्या पोर्तुगीजांबरोबर सतत पाच वर्षे झुंज देवून वसईवर वर्चस्व मिळविले. वसई लुटत असताना त्याठिकाणच्या चर्चमधील घंटा लुटून घेतल्या. त्यापैकी दोन घंटाचे वजन २ मण एवढे होते. या घंटांपैकी एक घंटा आपल्या कुलस्वामी जेजुरीच्या खंडोबास अर्पण केली.

**सरदार पानसे- जेजुरीचा खंडा (तलवार):** जेजुरीचा खंडोबा हे जागृत दैवत असल्यामुळे तो नवसाला पावतो अशी भाविकांची श्रध्दा आहे. सोनोरी गावचे सरदार महिपतराव पानसे आणि भिमराव पानसे यांनी आपली इच्छा पूर्ण होण्यासाठी खंडोबाला नवस केला होता. या दोघा बंधूची इच्छापूर्ती झाल्यानंतर नवसाप्रमाणे ४२ किलो वजनाचा खंडा (तलवार) इ.स.१७६३ मध्ये खंडोबा चरणी अर्पण केला. पेशवे काळात अशाच प्रकारे चित्रोजी बांडे हा इ.स. १७६३ मधील माघी पौर्णिमेच्या यात्रेस खंडोबाच्या दर्शनास आला असता त्याने पुत्र प्राप्तीसाठी खंडोबास नवस केला की, मला पुत्र होवू दे मी तुला हत्ती अर्पण करीन नवसाप्रमाणे त्यास पुत्र प्राप्ती झाली. पुढे त्याने खंडोबाच्या पुजाऱ्यास बोलावून खंडोबास हत्ती अर्पण केला. अशाचप्रकारे नेमाजी शिंदे, महाडीक यांनीही खंडोबास हत्ती वाहीलेले उल्लेख कागदपत्रात आढळतात.

**जिजाबाई-माधवराव पेशवे भेट:** दुसऱ्या संभाजीराजे यांच्या राणी जिजाबाई यांनी संभाजी महाराजांच्या नंतर कोल्हापूर दौलतीचा कारभार पाहण्यास सुरवात केली. जिजाबाईंना पुत्र नसल्यामुळे माधवराव पेशवे यांचा मनसुबा कोल्हापूर व सातारा या दोन गाद्या एक करण्याचा होता. त्यावेळी माधवरावांना वेळोवेळी दत्तक घेण्याची पत्रे पाठवूनही माधवरावांनी त्याकडे दुर्लक्ष केले. त्यावेळी जिजाबाई नाराज होवून तिर्थयात्रा करत-करत देह अर्पण करण्यासाठी निघाल्या. तिर्थयात्रा करत असतानाच जिजाबाईचा जेजुरी येथे मुक्काम असताना माधवराव पेशव्यांनी जिजाबाईची भेट घेतली.

**बारभाईचे कारस्थान व खंडोबा:** माधवराव पेशव्यांच्या नंतरचा जेजुरी बाबत संदर्भ येतो तो बारभाईच्या कारस्थानात. माधवराव पेशव्यांच्या अल्प परंतु यशस्वी कारकिर्दीनंतर पेशवाईची सुत्रे नारायणरावांकडे गेली. मात्र नारायणरावांच्या हत्येनंतर मराठा दौलतीचा कारभार नाना फडणीस, महादजी शिंदे, सखाराम बापू बोकील इत्यादी बारभाई मंडळीच्या हाती एकवटला गेला. नारायणरावांची पत्नी गंगाबाई यांना पुत्र व्हावा म्हणून नाना फडणीसांनी खंडोबाला नवस केला होता. त्याचबरोबर गणपतीपुळ्याचा गणपती, पुण्याची जोगिश्वरी, त्र्यंबकेश्वर, मयुरेश्वर, थेऊर, अंवढ्याचा नागनाथ इत्यादी देवदेवतांना नानांनी नवस केले होते.

सवाई माधवरावांचा जन्म पुरंदर किल्यावर १८ एप्रिल १७७४ रोजी झाला. नवसाप्रमाणे नाना फडणीस यांनी खंडोबास एक हजार रुपयांचा मोत्याचा तुरा आणि एक लाख रुपये मानाचा भंडारा अर्पण केला.

**अहिल्याबाई होळकर यांचे कार्य:** अहिल्याबाई यांचा जन्म औरंगाबाद जिल्ह्यातील बीड तालुक्यामध्ये असणाऱ्या चौडी या गांवी इ.स. १७२५ मध्ये झाला. मल्हारराव होळकरांचे पुत्र खडोराव यांच्या अकाली मृत्यूमुळे इंदूरची धुरा अहिल्याबाई होळकर यांच्याकडे आली. त्या खंडोबाच्या निस्सीम भक्त होत्या. अहिल्याबाईनी स्वतःच्या खाजगी पैशातून अनेक समाजोपयोगी कामे केली. जेजुरी येथे यात्रेकरुसाठी तलाव खोदला आणि ओंकारेश्वर जवळ बाग तयार केली. तसेच श्री मल्हार गौतमेश्वराची छत्री बांधली.

**जेजुरीच्या खंडोबाचे महत्त्व:** मराठेशाहीतील तसेच पेशवे काळातील राजकीय, धार्मिक, सांस्कृतिक अनेक घटना जेजुरीशी व जेजुरीच्या खंडोबाच्या संबंधित आहेत. अनेक मराठा घरण्याबरोबरच इतर गाजलेली घराणी ही खंडोबाला मोठ्या भक्तीभावाने पुजत आलेली आहेत. त्यापैकीच भोसले घराणे हे एक होय. इस्लामी सत्तेविरुध्द पहिल्यांदा शस्त्र हाती धरले ते शिवाजी राजांनी आणि इंग्रजांच्या विरुध्द पहिला लढा उमाजी नाईकांनी खंडोबाच्या भूमितच दिला. पुढच्या कालखंडात पेशवे काळातही राज्यकर्त्यांनी जेजुरीच्या खंडोबाला मानाचे स्थान दिलेले आढळते. पुढे संपूर्ण हिंदूस्थानावर इंग्रजाचे साम्राज्य निर्माण झाले, तरीही जेजुरीचे महत्व टिकून होते. अशा प्रकारे पुणे जिल्ह्यातील ऐतिहासिक डोंगरावर वसलेल्या जेजुरीचा खंडोबा या ऐतिहासिक पर्यटन स्थळावर प्रकाश टाकता येतो. समृद्ध निसर्गाचा सुंदर अविष्कार असणाऱ्या जेजुरी व तेथील खंडोबाचे देवस्थान हे पुणे जिल्ह्यातीलच नव्हे तर महाराष्ट्रातील एक पवित्र तीर्थक्षेत्र असून अनेक घराण्यांचे कुलदैवत असल्याने असंख्य पर्यटक व भक्त जेजुरीच्या खंडोबा या देवस्थानाला भेट देतात.

**स्वयं अध्ययन प्रश्न क्र.३**

१. कार्ले येथील लेणी समूहात .... शिलालेख सापडतात

अ) १८ ब) २८ क) ३८ ड) ४८

२. कार्ले येथील चैत्य लेणी .... यांनी कोरल्याचा उल्लेख मिळतो

अ) भूतपाल ब) भालिया क) ऋषभदत्त ड) अग्नीमित्रनक

३. ऐतिहासिक जेजुरी देवस्थान .... जिल्ह्यातील आहे

अ) सातारा ब) सांगली क) कोल्हापूर ड) पुणे

४. पुण्यातील शनिवारवाडा ... यांचे निवासस्थान होते

अ) छत्रपती ब) पेशवे क) सरदार ड) ब्रिटिश

५. महादजी शिंदे यांची छत्री पुण्यातील ... येथे आहे

अ) वानवडी ब) पर्वती क) आंबेगाव ड) निगडी

## २.३ परिभाषिक शब्द व शब्दार्थ

दुर्ग - किल्ले, भ्रमंती - भटकंती, मुख्यालय - राजधानी, संस्थान - राज्य, सर्किट - विभाग, तिर्थक्षेत्र - पवित्र धार्मिक स्थळ, विलीनीकरण - समाविष्ट होणे, गर्भगृह - मंदिराचा गाभारा, दक्षिण दिग्विजय - दक्षिणेकडील मोठा विजय, बंड- उठाव, तटबंदी - संरक्षण भिंत

## २.४ स्वयं अध्ययन प्रश्नांची उत्तरे

स्यंय अध्ययन प्रश्न क्र. १

१- अ. सातारा २- ब. औंध ३- ड. प्रतिनिधी ४- क. राजाराम महाराज ५- ब. १७२०

स्वयं अध्ययन प्रश्न क्र. २

१- ड. करवीर २- ब. दोन ३- अ. वाडी रत्नागिरी ४- ब. शिलाहार ५- अ. यमाई

स्वयं अध्ययन प्रश्न क्र. ३

१- ब. २८ २- अ. भूतपाल ३- ड. पुणे ४- ब. पेशवे ५- अ. वानवडी

## २.५ सारांश

सर्व जगाला वेड लावणाऱ्या भारतीय संस्कृतीची व उज्वल पार्श्वभूमीची ओळख करून घेण्यासाठी हजारो पर्यटक भारतातील ऐतिहासिक, धार्मिक, सांस्कृतिक, भौगोलिक अशा विविध पर्यटन स्थळांना मोठ्या प्रमाणात भेट देत असतात. भारताचा समृद्ध वारसा किल्ले, मंदिरे, लेण्या, स्मारके, समाध्या, वाडे, तलाव, मठ, पेठा, मशिदी, दर्गे, घाट इत्यादीत आहे. महाराष्ट्राचा विशेषता पुणे, सातारा व कोल्हापूर या विभागांचा ऐतिहासिक पर्यटनाच्या दृष्टीने अतिशय चांगला विकास झाला आहे. या तिन्ही विभागात ऐतिहासिक किल्ले, प्राचीन लेणी, उत्कृष्ट स्थापत्य कलेची मंदिरे, पूर्वजांचा इतिहास प्रत्यक्ष डोळ्यासमोर उभा करणारी संग्रहालये, तलाव, अपाट शौर्य व महान पराक्रमाची साक्ष देणारी स्मारके व समाध्या, मुस्लिम स्थापत्य कलेचे उत्तम नमुने असणाऱ्या मशिदी व दर्गे, उत्तम स्थापत्यकलेबरोबरच अनेक ऐतिहासिक घटनांचे प्रत्यक्ष साक्षीदार असणारे वाडे अशी अनेक ऐतिहासिक पर्यटन स्थळे पवयास मिळतात. त्यामध्ये प्रामुख्याने सातारा विभागातील ऐतिहासिक सातारा, पंतप्रतिनिधींचे संस्थान असणारे औंध, शिखर शिंगणापूर, कोल्हापूर विभागातील ऐतिहासिक कोल्हापूर, मराठी सत्तेच्या इतिहासातील सुवर्णपान असणारा किल्ले पन्हाळा, हजारो भाविकांचे श्रद्धास्थान व कुलदैवत असणारे ज्योतिबा देवस्थान आणि पुणे विभागातील ऐतिहासिक पुणे, प्राचीन काळात कोरण्यात आलेली अप्रतिम स्वरूपाची कार्ले लेणी आणि मार्तंड मल्हारी खंडोबाची परंपरा सांगणारी जेजुरी यांचा विशेष समावेश होतो. ही सर्व ऐतिहासिक, धार्मिक, सांस्कृतिक, स्थळे केवळ ऐतिहासिक पर्यटनाची स्थळे नसून समृद्ध इतिहासाची बोलकी प्रतिकेच आहेत. त्यामुळेच या ऐतिहासिक पर्यटन स्थळांना देश विदेशातील पर्यटक मोठ्या संख्येने भेटी देत असल्याने ती नेहमीच गजबजलेली दिसून येतात.

## २.६ सरावासाठी स्वाध्याय

प्रश्न–१) जोड्या जुळवा व खालील दिलेल्या पर्यायामधून योग्य उत्तर निवडा.

| | |
|---|---|
| १. कार्ले | अ. किल्ला |
| २. जेजुरी | ब. मंदिर |
| ३. पन्हाळा | क. लेणी |
| ४. ज्योतिबा | ड. खंडोबा |

अ) १. –अ, २. – ब, ३.– क, ४.– ड

ब) १.– ड, २. – क, ३.– ब, ४.– अ

क) १.– ब, २. – ड ३.– क, ४– अ

ड) १. – क, २.– ड, ३.– अ, ४.– ब

प्रश्न.२) खालील दिलेली विधाने वाचून योग्य पर्याय कोणता ते लिहा. –

पुणे येथील शनिवार वाडा हा फक्त स्थापत्य कलेचा उत्कृष्ट नमुना नाही तर मराठी सत्तेचे प्रमुख केंद्रही होते.. कारण

अ) शनिवार वाड्याचे बांधकाम हे स्थापत्य शैलीचे उत्तम उदाहरण आहे.

ब) शनिवार वाडा हे पेशव्यांच्या सत्तेचे मुख्य केंद्र होते.

१. विधान अ खरे आहे आणि विधान ब खोटे आहे.

२. विधान ब खरे आहे आणि विधान अ खोटे आहे.

३. दोन्ही विधाने खरी आहेत.

४. दोन्ही विधाने खोटी आहेत.

प्रश्न ३) टिपा लिहा.

१. शिखर शिंगणापूर २. औंध ३. प्राचीन कार्ले लेणी

४. कोल्हापूरची अंबाबाई (महालक्ष्मी) ५. तीर्थक्षेत्र जेजुरी ५. तीर्थक्षेत्र ज्योतिबा

प्रश्न ४) दिर्घोत्तरी प्रश्न सोडवा

१. सातारा या ऐतिहासिक पर्यटन स्थळाची माहिती द्या.

२. ऐतिहासिक पन्हाळा किल्ल्यावर चर्चा करा.

## २.७ अधिक वाचनासाठी पुस्तके


१. शिंदे खंडेराव, कोल्हापूर राज्याचा इतिहास, निर्मिती विचार मंच, कोल्हापूर, २००९

२. कोल्हापूर गॅझेटीयर, १८८३

३. पारसनीस द ब, अनु. देशपांडे सु.र., पेशवेकालीन पुणे, डायमंड पब्लिकेशन पुणे

४. बेहेरे ग. वा., हरवलेले पुणे, नौबत प्रकाशन मुंबई, १९६७

५. करमकर वी. वी., महाराष्ट्राचा पुण्यग्राम, वृत्तप्रसारक छापखाना पुणे, १९२५

६. जोशी रा. शा., मल्हारी महात्म्य तथा जेजुरीचा रश खंडोबा, १९७०

७. बारभाई आ. को., कुलस्वामी खंडोबा, मल्हारी प्रकाशन जेजुरी २००६

८. भावे वा. कृ., पेशवेकालीन महाराष्ट्र, भारतीय इतिहास अनुसंधान परिषद नवी दिल्ली, मुंबई, १९७६

९. चाफेकर गो.ना., श्री भगवानराव गौरव ग्रंथ, औंध स्टेट प्रेस, औंध, २००६

१०. गद्रे प्रभाकर, मंदिर स्थापत्याचा इतिहास, मंगेश प्रकाशन नागपूर, २०१०

११. खांडगे मंदा, वैभव पेशवेकालीन वाड्यांचे, साई प्रकाशन पुणे, २००२

१२. खरे ग ह, दक्षिणेकडील मध्ययुगीन इतिहासाची साधने, भारत इतिहास संशोधन मंडळ पुणे, १९३०

१३. करवीर सरकारचे नगदी वटहुकूम, १८४४ ते १९३६

१४. मोडकबा. प्र., कोल्हापूर राज्याचा इतिहास, १९९३

१५. गर्गे स. मा., करवीर रिया सतीची कागदपत्रे, १९७०


❑❑❑